रविवार, 16 ऑक्टोबर 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -71
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 16 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-71 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-16 ● PRICE-5

# पाकिस्तान जगातील सर्वांत धोकादायक

## महाशक्ती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी फटकारले

आधुनिक केसरी न्यूज

**वॉशिंग्टन : रशिया-युक्रेन यांच्यातील युद्धाचा संपूर्ण जगाने धसका घेतला आहे. या युद्धाची झळ संपूर्ण जगाला बसत आहे. खनिज तेल तसेच अन्य महत्त्वाच्या वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ होत आहे. याच युद्धाच्या संदर्भाने नाटोच्या फौजांची रशियाच्या लष्कराशी चकमक झाल्यास जगभरात विध्वंस होईल, असा इशारा रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी दिला आहे. असे असतानाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी रशिया, चीन या देशांना फटकारले आहे. विशेष म्हणजे त्यांनी पाकिस्तानवरही कठोर टीका केली असून पाकिस्तान हा देश जगातील सर्वांत धोकादायक देशांपैकी एक आहे, असे मत व्यक्त केले आहे.**



ते लॉस एंजेलिसमध्ये (कॅलिफोर्निया) एका कार्यक्रमात बोलत होते. जगातील महाशक्ती असलेल्या अमेरिकेने पाकिस्तानला सर्वात धोकादायक देशांमधील एक देश असल्याचे म्हटल्यामुळे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यासाठी हा धक्का असल्याचे म्हटले जात आहे. व्हाईट हाऊसने जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार जो बायडेन यांनी पाकिस्तानवर थेट टीका केली आहे. "आपल्या देशाला काय हवे हे चीनचे अध्यक्ष क्षी जनिपिंग यांना चांगल्या प्रकारे समजते. मात्र सध्या त्यांच्यासमोर अनेक समस्या आहेत. या समस्यांना आपण कसे तोंड द्यावे? रशियामध्ये सध्या जे सुरू आहे, त्या अनुषंगाने चीनमधील समस्यांना कसे सोडवावे, असा प्रश्न चीनला पडलेला आहे. यासोबतच पाकिस्तान हा सर्वांत धोकादायक देशांमधील एक देश आहे. कोणत्याही बांधिलकीशिवाय तसेच जबाबदारीशिवाय त्याच्याकडे अण्वस्त्रे आहेत," असे जो बायडेन म्हणाले. मागील काही दिवसांपासून पाकिस्तमधील शाहबाज शरीफ सरकार अमेरिकेसोबतचे आपले संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र एकीकडे हे प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे बायडेन यांनी वरील विधान केले आहे. त्यामुळे पाकिस्तानसाठी हा मोठा धक्का असल्याचे म्हटले जात आहे. बायडेन यांनी चीन आणि रशियालाही लक्ष्य केले आहे.

### महत्वाची बातमी

## गहू-ज्वारीचे दर भिडले गगनाला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दिवाळी सण तोंडावर आला आहे. करोना विषाणूच्या साथीनंतर पहिल्यांदाच कोणत्याही निर्बंधाशिवाय दिवाळी साजरी केली जाणार आहे. सध्या करोना विषाणूचे संकट दूर झाले असले तरी महागाईने मात्र सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. ऐन दिवाळीत गहू आणि ज्वारीच्या किमती गगनाला भिडत आहेत. यामुळे यंदाही सर्वसामान्यांची दिवाळी गोड होण्याची शक्यता कमी आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ज्वारी, बाजरी आणि तांदळाच्या किमतीत भरमसाठ वाढ झाली असून याचा सर्वसामान्य नागरिकांना फटका बसण्यास सुरुवात झाली आहे. अवकाळी पाऊस, इंधनांचे वाढते दर आणि साठेबाजीमुळे ज्वारी, बाजरी आणि तांदळाच्या किमती वाढल्या आहेत. गेल्या वर्षी एपीएमसीमधील घाऊक बाजारात ज्वारीचा दर २१ ते ३९ रुपये प्रति किलो इतका होता. आता हाच दर २८ ते ४५ रुपये प्रति किलो झाला आहे. याच कालावधीत गेल्या वर्षी बाजरीला १८ ते २५ रुपये प्रति किलो दर मिळत होता. आता बाजरीसाठीही जास्तीचे पैसे मोजावे लागत आहेत. सध्या बाजरीचा दर २४ ते ३५ रुपये प्रतिकिलो इतका आहे.

### चर्चेतली बातमी

## वाईट उद्देशाने लोकप्रतिनिधी कामे बंद पाडतात : गडकरी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** काही खासदार, आमदार हे विशिष्ट उद्देशाने तक्रारी करत विविध विकासात्मक कामे बंद पाडतात, अशा शब्दात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लोकप्रतिनिधींना सुनावले. यावेळी त्यांनी राज्य शासनाच्या कामाच्या पद्धतीसह कामात अडथळे आणणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांचेही कान टोचत त्यांना बडतर्फ करण्याची गरज असल्याचे सांगितले. मिनकॉन परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी केंद्रीय कोळसा व खाण मंत्री प्रल्हाद जोशी, राज्याचे बंदरे व खनिकर्म मंत्री दादा भुसे, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार कृपाल तुमाने, आमदार आशीष जायस्वाल, उद्योग व खान विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, विदर्भ इकॉनोमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे (वेद) अध्यक्ष देवेंद्र पारेख, राहुल उपगल्लावार, शिवकुमार राव उपस्थित होते. गडकरी पुढे म्हणाले, खाणीतून खनिजांच्या उत्पादनापासून रस्ते व विकासासाठी राज्य शासनाच्या बऱ्याच विभागांच्या परवानग्या लागतात. केंद्र सरकारने खनिज क्षेत्राशी संबंधित धोरणात बऱ्याच सुधारणा केल्या आहेत. त्यामुळे राज्याने हे काम डिजिटल करून त्यातील वेळ कमी करायला हवा. परंतु काही अधिकाऱ्यांच्या वेळखाऊ धोरण आणि भष्ट्राचारी वृत्तीने येथील उद्योजक आणि गुंतवणूकदार दूर जात आहेत. त्यासाठी शासनाने कामात पारदर्शकता आणायला हवी. राज्यातील ७५ टक्के खनिजे आणि ८० टक्के जंगल विदर्भात आहे. त्यामुळे येथील खाण व उद्योगांना परवानगीसाठी अडचणी येतात. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार येथे आहेत, त्यांच्या विभागाकडे गेल्या काही दिवसात खाणीसंदर्भात किती प्रकरणे आली याची माहिती घ्यावी. मी कालच एका वन विभागाच्या अधिकाऱ्यांला फोन केला असता त्याच्याकडेच १७ प्रकरणे प्रलंबित होती. या अधिकाऱ्यांना बडतर्फ केल्याशिवाय अद्दल घडणार नाही. काही आमदार, खासदार विशिष्ट उद्देशाने काम बंद पाडण्याची हल्ली फॅशन सुरू झाली आहे. हे प्रकार चुकीचे आहेत. विकासाच्या कामात लोकप्रतिनिधींनी अडथळे आणायला नको, असेही गडकरी म्हणाले.

महाराष्ट्रामध्ये विदर्भाएवढे खनिज व खाणी कुठेच नाहीत. त्यामुळे राज्याचे नवीन खनिज धोरण ठरवताना विदर्भात खनिजावर आधारित उद्योगधंद्यांची बांधणी करण्याला प्राधान्य देण्यात येईल. विदर्भात मोठ्या प्रमणात खनिज साठे आहेत. मात्र त्यावर आधारित उद्योग अन्यत्र आहेत. त्यामुळे येथेच खनिजावर आधारित उद्योग व्यवसाय उभे रहावेत. स्थानिकांना रोजगार मिळावा, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. खनिजामध्ये असणारे धातू व त्यावर असणारे प्रक्रिया उद्योग, त्याचे परीक्षण, संशोधन या संदर्भातील सर्व कार्यालये व संस्था विदर्भात उभी राहायल्या हव्यात, असा आपला प्रयत्न असून त्यासाठी केंद्राने मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# जनतेला हिशेब देणार की नाही?

## जदयुच्या राष्ट्रीय अध्यक्षांचा पंतप्रधानांवर हल्लाबोल!

आधुनिक केसरी न्यूज

**पटना :** केंद्रीय निवडणूक आयोगाने नुकत्याच हिमाचल प्रदेश निवडणुकांसाठीच्या तारखांची घोषणा करण्यात आली. त्यापाठोपाठ गुजरात विधानसभा निवडणुकांच्याही घोषणा लवकरच केल्या जातील. पुढील महिन्यात या दोन राज्यांमध्ये मतदान होणार आहे. या पार्श्वभूमवीर राष्ट्रीय पातळीवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण आता रंगू लागले आहे. निवडणुका जरी गुजरातमध्ये असल्या, तरी बिहारमध्येही त्याचे पडसाद उमटत असून सत्ताधारी जदयुचे राष्ट्रीय अध्यक्ष ललन सिंह यांनी पाटण्यामध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच, त्यांच्यावर खोचक टोलाही लगावला.

नरेंद्र मोदींनी पंतप्रधान झाल्यापासून कधीही केलेल्या कामांचा हिशोब दिला नसल्याचे ललन सिंह म्हणाले. एखादा माणूस



इतकी वर्ष देशाचा पंतप्रधान राहिल्यानंतर देशाच्या जनतेला काही हिशोब देणार की नाही? पाच वर्षांत निवडणुका होतात. त्यावेळी मते मागताना आपण पाच वर्षांत काय केले, हे सांगावे लागते की नाही? नरेंद्र मोदींनी लोकांसमोर जाऊन त्यांनी काय काय काम केले, हे सांगताना कधी तुम्ही ऐकले का? नाही, असे ललन सिंह म्हणाले. दरम्यान, देशातील महत्त्वाच्या मुद्द्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात असल्याची टीका सिंह यांनी यावेळी केली. देशात महागाई, बेरोजगारी वाढतेय. आहे ते रोजगारही संपवले जात आहेत. पण महागाईवर चर्चा होत नाही, विदेशातून आणलेल्या चित्त्यांवर चर्चा केली जाते. चित्ता काय नागरिकांची भूक भागवणार आहे का? केंद्र सरकारचे महागाईवर कोणतंही नियंत्रण राहिलेले नाही, असे ललन सिंह म्हणाले. हत्तीचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. २०१४च्या निवडणुकीत नरेंद्र मोदी देशभर फिरत म्हणत होते, 'मी अतीमागास आहे'. पण गुजरातमध्ये अतीमागास वर्गच नाहीये. गुजरातमध्ये मागस वर्ग आहे. पण हे त्या मागास वर्गातही नव्हते. ते जेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांनी स्वतःच्या समाजाला मागास वर्गात समाविष्ट करून घेतले. हे तर डुप्लिकेट आहेत, हे ओरिजिनल कसे झाले? असा खोचक सवालही ललन सिंह यांनी केला.

# कारखान्यांचे वजनकाटे ऑनलाइन करा

## राजू शेट्टींची मागणी : ऊस परिषदेत 13 ठराव मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** चालू गळीत हंगामात एकरकमी एफआरपीसह अधिकचे 350 रुपये प्रतिटन पहिली उचल द्यावी, गतवर्षीच्या ऊसाची एफआरपी अधिक 200 रुपये तातडीने जमा करा, कारखान्यांचे वजनकाटे ऑनलाइन करा यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या ऊस परिषदेत 13 ठराव मंजूर करण्यात आले. जयसिंगपूर येथील विक्रमसिंह मैदानावर दरवर्षी प्रमाणे यांदाही स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली स्वाभिमानीची 21 वी ऊस परिषद पार पडली. यावेळी शेतकऱ्यांची मोठी गर्दी होती. स्वाभिमानीचे प्रदेशाध्यक्ष जालिंदर पाटील यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. परंतु, स्वाभिमानीचे नेते रविकांत तुपकर ऊस परिषदेस गैरहजर होते. ऊस परिषदेत यंदा 13 ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. शिवाय अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकारने तातडीने मदत जाहीर करावी



अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली. अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत करावी, भारनियमन त्वरित रद्द करून शेती पंपाला विनाकपात दिवसा 12 तास वीज द्यावी, ऊस दर नियंत्रित अद्यादेश 1966 अ यामध्ये असणारा रिकव्हरी बेस 8.5 टक्के कायम ठेवून नंतरच्या सर्व दुरुस्त्या मागे घ्याव्यात, केंद्र सरकारने साखरेचा किमान विक्री दर 35 रुपये करण्यात यावा, कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा, अशा मागण्या या ऊस परिषदेतून करण्यात आल्या.

### ऊस परिषदेतील ठराव

1) महाविकास आघाडी सरकारने ऊस उत्पादक क्षेतकऱ्यांना दोन टप्प्यात एफआरपी देण्याची केलेली कायद्यातील बेकायदेशीर दुरूस्ती शिंदे फडणवीस सरकारने तातडीने रद्द करावा.

2) गतवर्षी तुटलेल्या उसाची एफआरपी पूर्णपणे देऊन अधिक 200 रूपये तातडीने देण्यात यावेत. महसुली विभाग सूत्राप्रमाणे 2020-21, 2021-22 या गळीत हंगामातील साखर कारखान्यांचा आरएसएफप्रमाणे निघणाऱ्या दराची घोषणा करावी.


3) साखर आयुक्तांच्या नियंत्रणाखाली राज्यातील सर्व साखर कारखान्यांचे वजन काटे तातडीने ऑनलाईन करून वैधमापन विभागाकडून साखर कारखान्यांचे वजनकाट्यांच्या कॅलिब्रेशनमध्ये एकसमानता सुसूत्रता आणि पारदर्शकता राहण्यासाठी सर्व साखर कारखान्यांना वजन काट्यांची कार्यान्वियिन संगणक प्रणाली एकच असणे व त्यांचे कॅलिब्रेशन नियंत्रण वैद्यमापन विभागाकडून व्हावे.

4) अवकाळी व अतिवृष्टी पावसाने उद्‌ध्वस्त झालेल्या जिरायत पिकाला हेक्टरी सात हजार रुपयांची केलेली मदत अतिशय तोकडी आहे. द्राक्ष, डाळींब, सोयाबिन, कापूस, तूर, धान, मका, माजीपाला आदी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना पीक विम्याच्या नुकसान भरपाईची अग्रीम रकम दिवाळीपूर्वी देण्यात यावी व भाषित पिकाला हेक्टरी 50 हजार रूपयांची मदत करण्यात यावी.

5) शेतीपंपाचे होणारे मारनियमन त्वरीत रद्द करून शेतीपंपाला विनाकपात दिवसा 12 तास बीज देण्यात यावे. तसेच प्रलंबित बीज पंपाचे कनेक्शन ताबडतोब देणेत यावे. व्याज, दंडव्याज, इंपन अधिभार, इतर कर बगळता उर्वरीत मुद्दलात 50 टक्के रकम सवलत म्हणून देण्यात यावी.

6) ऊस दर नियंत्रण अयादेश 1966 (अ) अस्तित्वात आला, त्यावेळी असणारा रिकव्हरी बेस 8 .5 टक्के तोच कायम ठेवून नंतरच्या सर्व दुरुस्त्या मागे घ्याव्यात.

7) केंद्र सरकारने साखरेचा किमान विक्री दर 35 रूपये करण्यात यावा. साखरेच्या निर्यातीस कोटा सिस्टीम न ठेवता ओपन जनरल लायसन्स अंतर्गत मान्यता देऊन गुन्हाळ प्रकल्पांना इथेनॉल उत्पन्नाची परवानगी देण्यात यावी.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अनंत अमुची ध्येयासक्ती...

आधुनिक केसरी

त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न ती करू लागली. आता तिच्या संवेदना जास्त सूक्ष्म आणि तरल झाल्या होत्या. अंधपणाचा तिला झालेला एक फायदा म्हणजे आता ती समोरच्या गोष्टीवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकत होती. आपण डोळस असलेली माणसे जेव्हा एखादी गोष्ट पाहतो, किंवा ऐकतो तेव्हा आपली नजर समोरच्या दृश्यामुळे विचलित होऊन एकाग्रता कमी होऊ शकते. तिच्या बाबतीत हा प्रश्न आता राहिला नव्हता. आता तिचे कान आणि तिच्या स्पर्शाच्या संवेदना या गोष्टी तिचे डोळे झाल्या होत्या. त्यामुळे मनाच्या नजरेने पाहण्यासाठी ' कसं ऐकायचं ', संवाद कसा साधायचा, समोरची गोष्ट कशी जाणून घ्यायची हे ती शिकली. तिची दृष्टी गेल्याचे तेवढे तिला वाईट वाटले नाही की जेवढे लोकांच्या अंध लोकांबद्दल असलेल्या दृष्टिकोनाचे वाटले.

अंधांसाठी असलेल्या एका सर्वोत्तम शाळेत तिने प्रवेश घेतला. तेथील शिक्षक अंध मुलांना शिकवण्यासाठी विशेष प्रयत्नशील होते. अभ्यासाच्या विषयांसोबतच साहसी खेळ सुद्धा मुलांना शिकवले जात. असे खेळ की जे विशेषतः अंध मुलांना दृष्टी नसल्याने खेळू दिले जात नाहीत, ते खेळ या शाळेत शिक्षकांनी शिकवले. पुढे इंग्रजी शिकण्यासाठी ती एक वर्ष अमेरिकेला गेली. तिच्या अथक प्रयत्नानंतर तीनचार महिन्यात ती इतर



मुलांच्या बरोबरीने इंग्रजीमध्ये तयार झाली. पुढे बॉन विद्यापीठात तिने पुढच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतला. आणि समाजशास्त्र, तत्वज्ञान या विषयांसोबतच तिबेटबद्दल अधिक अभ्यास केला. याच काळात ती मंगोलियन, चिनी भाषा शिकली. तिबेटबद्दलचा तिचा अभ्यास तिला तिबेटची ओढ लावत होता. म्हणून १९९७ मध्ये ती एकटीच तिबेटला आली.

तिबेटची राजधानी ल्हासापर्यंत विमान प्रवास केला. आणि पुढे दोन आठवडे घोड्यावरून तिबेटमध्ये रपेट मारली आणि तिबेट जाणून घेण्याचा प्रयत्न केला. १९९८ मध्ये ती तिबेटमध्ये परत आली ते काही एक मनाशी ठरवूनच. इथे तिने अंध मुलांसाठी काम करायचे ठरवले. याच दरम्यान तिची भेट पॉल क्रोनेनबर्ग याच्याशी झाली. दोघांनी एकत्र काम करायचं ठरवलं. आणि पाच मुलांसह सेब्रीची शाळा सुरु झाली.

(क्रमशः)



## आनंदी पहाट

# आकृतिप्रधान सौंदर्यतत्वाचे भान राखावे

आधुनिक केसरी

अगदी अलीकडच्या काळापर्यंत 'कला' ह्या शब्दाला काही एक अर्थ, मान होता. गायन, वादन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला यांना राजघराण्यात, सरकारदरबारी आश्रय होता. मात्र आधुनिकीकरण झाल्यामुळे कालांतराने परिस्थिती बदलली. अभिजात कलांना कोणी विचारेनासे झाले. अर्थात ह्याची जाणीव सर्वांना झाली असे नाही. एखाद्या कलेची साधना करणे म्हणजे आयुष्य वाया घालवणे, असा नवीन पिढीकडून विचार केला जाऊ लागल्याचे समजते, त्याचाच खेद वाटतो. त्यातच शिक्षणपद्धती देखील बदलली. गुरु शिष्य परंपरेने मैत्रीच्या नात्याची जागा घेतली. मरगळलेल्या वाटेवरून जाणे श्रेयस्कर ठरून योग्य वाटू लागले. त्यामुळेच चाकोरीबद्ध आयुष्य जगण्यातच धन्यता मानणारी पिढी निर्माण झाली आणि कलेचा आनंद घेणे म्हणजे काय? हेच आपण विसरून गेलो. कलेमुळे जीवन समृद्ध होते, ही कल्पनाच मागे पडत गेल्याचे आपण प्रत्येकजण अनुभवत आहोत. त्यासाठी भारतीय कलेची सर्वांगीण चर्चा करताना इतिहासातील महत्वाच्या स्थित्यंतरांचा मागोवा घेणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आधुनिक भारतावर पाश्चिमात्य वैज्ञानिक संस्कृतीचा प्रभाव पडलेला असल्याचे स्पष्ट होत असले, तरीही ह्या सर्वांचे भान ठेवून भारतीय कलेचा सातत्याने, साकल्याने, प्राधान्याने आपल्याला विचार करावा लागण्याची जाणीव होणे जरुरीचे आहे. शिवाय कलाविष्कारात 'आशय' म्हणून समाविष्ट असलेले 'सांस्कृतिक सारतत्व' आणि मूळ 'कलातत्त्व' ह्या दोन भिन्न बाबी असतात; ह्याचे भानही जागते ठेवावे लागेल. आंतराष्ट्रीय पातळीवर इतर देश, संस्कृती यांच्या कलेहून भिन्न अशी कोणती गुणवैशिष्ट्ये भारतीय कलेमध्ये आहेत; कलेतील भारतीयता म्हणजे काय? हे नवीन पिढीला त्यांच्यातील उणिवा दूर करण्यासाठी समजावून देण्याची गरज आहे. प्रत्येक कलेतील प्राणभूत अशा आकृतिप्रधान सौंदर्यतत्वाचे भान ठेवून आशय माध्यमाकृती सौंदर्य कसे शोधायचे ह्याची जाणीव त्यांना करून देणे आवश्यक आहे.

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-43

# मधाळ रसाळ लाघवी बोलणं

आधुनिक केसरी

प्रेमाने जग जिंकता येते. रसाळ वाणीने हृदय जिंकता येते.
आपल्या लाघवी वाणीने आपण दुसऱ्याच्या हृदयात स्थान मिळवू शकतो. पायाला चाके, डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर असेल तर यशाची गोडी सतत चाखता येते. नेहमी सरळ आणि गोड बोलावे. आपल्या जिभेवर सतत सरस्वती चा वास असतो. वाईट बोललो तर तिचा अपमान होतो. म्हणून नेहमी गोड बोलावे. गोड बोलण्याने अनेक कठीण कामे सोपी होतात. कडवट बोलूच नाही ना पण. कारले जिभेला कडू लागते तसं कडू बोलणं दुसऱ्यांना जाळतं.
शाब्दिक मार सहसा कोणाला देऊ नये. दुसऱ्यांना वाईट वाटेल असे बोलू नये. फारच वाईट वाटलं तर मौनात राहावं. चांगले तेवढेच बोलावे. हेच आपल्याला मुलांना शिकवायचे आहे. त्यासाठी आई बाबांनी मधाळ रसाळ गोड लाघवी बोलावं. मुलांशी पण आणि इतरांशी सुद्धा. काही लोकांना सतत दुसऱ्यांना नावं ठेवायला, टोमणे मारायला आवडतं. आपण असं वागल्याने आपलीच प्रतिमा जनमानसात खराब होते .आपले विचार कायम नकारात्मकते कडे वळतात. त्याचा परिणाम आपल्या शरीरावर होतो. गोड बोलायला पैसे लागत नाही. शिवाय गोड बोलण्याने समोरचा सुखावतो. अजीर्ण होईल एवढं गोड बोलू नका. मुलांना तर कधी रवाळ तर कधी मवाळ असं राहावंच लागतं. पण मुले मोठी झाली की मग मात्र कायमच प्रेमळ राहावं. ज्याप्रमाणे उपनयन संस्कार लग्न संस्कार या गोष्टी आपण विसरत नाही. त्याप्रमाणेच बाल संस्कार ही विसरू नये. जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न व नकळत केलेले संस्कार दोन्ही गोष्टी आपल्या पाल्यांसाठी आवश्यक आहे. गोड बोलण्याने नाती जुळतात. नाती टिकतात. सुखी होतात. सगळे आनंदी होतात.

## "निरुपण"

आधुनिक केसरी

### अंबानाम-महात्म्य

अंबाबाई अंबाबाई नाम घेता विघ्न जाई।
दीनांची तू कैवारी अनाथांची तूच आई।।
देवांवरी संकट येई अंबाबाई प्रकट होई।
असुरांसी ठार मारी घाव घालिते जिव्हारी।
अट्टहास अंबा करी भुई दुभंगून जाई।
शंखनाद करी तरी लोकत्रयी त्राहि त्राहि।।
भेदभक्तां ते न करी राजा वा रंक कोणी।
प्रसन्न होय सत्वरी नाम घेता चिंतनी।
जन्म घेतसे उदरी देवांचा तो देव बाई।
कधी तू गं रेणुकाई कधी अदिती तू माई।।
भार्या तू विधात्याची नाव तुझिये सावित्री।
कन्या तू सागराची वरी तुजसी मुरारी।
दक्षयज्ञ जी संहारी सदाशिवाची तू गौरी।
त्रिदेवा करी बालके ऐसी अनसूया माई।।
हिमाचलाची किशोरी काननी तप आचरी।
अनंगाचिया सोबती अवतरली वासंती।
शिव विवाहे लाजती पुलकितचि ते होती।
ऐसी तू पार्वतीमाई हासासी जवळी घेई।।




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# एक गरुड आणि एक घुबड

आधुनिक केसरी

एक गरुड आणि एक घुबड, फार दिवस एकमेकांशी भांडत असत. शेवटी त्यांनी परस्परांशी मित्रत्वाने वागण्याची शपथ घेतली व एकमेकांच्या पिल्लांस खाऊ नये असे ठरविले.
घुबड गरुडास म्हणाले, 'गडया ! पण माझी पिल्ले कशी असतात, हे तुला ठाऊक आहे ना? ठाऊक नसेल, तर ती दुसऱ्या एखादया पक्ष्याची आहेत असे समजून तू त्यांना गट्ट करशील, अशी मला भीति वाटते,' गरुड म्हणाला, 'खरेच, तुझी पिल्ले कशी असतात, हे मला मुळीच ठाऊक नाही.'
घुबड म्हणाले, 'ऐक तर. माझी पिल्ले फार सुंदर असतात. त्यांचे डोळे सुंदर, पिसे सुंदर, सगळेच काही सुंदर असते. या वर्णनावरून माझी पिल्ले कोणती हे तुला सहज समजेल.' पुढे एके दिवशी, एका झाडाच्या ढोलीत, गरुडास घुबडाची पिल्ले सापडली. त्यांजकडे पाहून तो म्हणाला, 'किती घाणेरडी, कंडाळवाणी आणि कुरूप पिल्ले ही ! आपली पिल्ले फार सुंदर असतात, म्हणून घुबडाने सांगितले आहे. तेव्हा, ही घुबडाची पिल्ले खास नव्हते. यास मारून खाण्यास काही हरकत नाही.' असे म्हणून त्याने त्या पिलांचा फडशा उडविला!
आपली पिल्ले नाहीशी झालेली पाहून घुबड गरुडाला म्हणाले, 'गडया ! माझी पिल्ले तूच मारून खाल्लीस, असे मला वाटते.' गरुड म्हणाला, 'मी खाल्ली खरी, पण तो माझा दोष नव्हे.
तू आपल्या पिल्लाचे जे खोटेचे वर्णन केलेस, त्यामुळे ती मला ओळखिता आली नाहीत. इतकी कुरूप पिल्ले घुबडाची नसतील, दुसऱ्या एखादया पक्ष्याची असतील, असे समजून मी ती मारून खाल्ली, यात माझा काय अपराध आहे बरे?'
तात्पर्य – स्वतःसंबंधाची खरी हकीकत लपवून ठेवून, भलतीच हकीकत सांगणारा मनुष्य शेवटी आपणास संकटात पाडून घेतो.

## ।। दासबोध स्तवन ।।



# अनिर्वाच्य निरुपण

आधुनिक केसरी

आपल्या सारख्या सर्व मानव जातीचे व्यवहार हे देहबुद्धी तुन होतात. देहबुध्दीतील द्रष्टा,द्रुष्य,आणि दर्शन ही तीन स्थित्यंतरे निरनिराळ्या स्वरूपात आपल्याला पहायला मिळतात. द्र्युष्य संपूर्ण खरे वाटते त्यास वेगळेपणाने पहाणारा द्रष्टा"मी"आपण वरवर पहातो तेव्हा खरा वाटतो.द्रष्टेपणाला द्रुष्याचा अनुभव येतो.
या अनुभवात द्वैत असते. आणि हे अनुभव सांगण्यासाठी भाषेचा वापर होतो. अनुभव सांगितले जाताना भावना प्रगट होतात.म्हणून द्रुष्य व विश्व हे मानवी भाषेचे क्षेत्र आहे. संत आत्मबुध्दीच्या भुमिकेत असतात त्यांना आत्मसाक्षात्कार झालेला असतो संताच्या जवळ मी पणा नसतो. संताच्या जवळ सर्व दुजपण जाऊन फक्त अद्वैत शिल्लक रहाते.सर्व भाषा विषयक अभ्यासकांच्या माहिती साठी समर्थाचा मोलाचा सल्ला घ्यावा. तो पुढील प्रमाणे.
सर्व दुजेपण नाहींसे.होऊन केवळ अद्वैत रहाते त्या स्थितीमध्ये अनुभव घेणे ही भाषा सुध्दा शिल्लक रहात नाही पण स्वस्वरूपाशी झालेली समरसता जेव्हा भाषेमध्ये सांगण्याचा प्रसंग येतो त्यावेळी खरी अडचण येते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ही अडचण निवारण्यासाठी माणसाची कल्पनाच उपयोगी पडते.हा कल्पनेचा प्रकार असल्याने खरा नसतो. पण त्याखेरीज गत्यंतर नसते. म्हणून संत आपली भाषा वापरतात तरी त्याचा अर्थस्वस्वरूपोन्मुख असतो. दासबोधाच्या अभ्यासकांनी ही गोष्ट कधीही विसरू नये.
मी अनुभव घेतला यामध्ये त्रीपुटी येते. ही द्वैतमय असते. द्वेत ही समजणारी स्थिती आहे. ती भाषेच्या कक्षेत येते. परंतु स्वस्वरूपाशी केवळ अद्वैत असल्याने तेथे द्वैत रहात नाही म्हणून भाषा पोहचू शकत नाही. स्वस्वरूप अनिर्वाच्य आहे ते शब्दांत सांगता येत नाही. सर्व शब्दांचे मुळ ओंकार आहे ओंकार लय पावला तर शब्द,बोलणें न बोलणें सर्व नाहींसें होईल. भावनेची आई माया आहे
मायेचे अस्तित्व मानून अध्यात्म सांगण्याची एक पध्दत आहे. तर माया मुळी नाहीचं असे मानुन स्वस्वरूपज्ञान सांगण्याची दुसरी पध्दत आहे. देहबुध्दीतील लोकांना विषय समजण्यास पहिली पध्दत उपयोगी पडते तर आत्मसुख झालेल्या साधकांना स्वतः च्या स्वस्वरूप कल्पना समजण्यासाठी दुसरी पध्दत उपयोगी आहे.
जय जय रघुवीर समर्थ

# प्रयत्न आणि परमेश्वर यांची सांगड घालावी

आधुनिक केसरी

जगात कुणीही सुखी नाही असे समर्थ सांगतात. पण एखादा राजाच्या पोटी जन्माला आला म्हणून सुखी झाला, असे आपण मानतो ! खाण्यापिण्याची अडचण नसली म्हणजे त्याला इतर काही काळज्याच नाहीत असे म्हणून कसे चालेल ? ' मागच्या जन्मी मी कुणाचा तरी घात केला म्हणून आज हे दुःख वाट्याला आले आहे, ' असे आपण म्हणतो, आणि त्याबरोबरच फलाशेने कर्म करून पुढील जन्माची तयारी आजच करू लागतो. पण त्यातून सुटण्याचा काही मार्ग दिसत नाही. कर्मामध्ये आजवर मोठेमोठे लोक गुंतून राहिले आहेत. जन्माला आलो तो जन्माचे सार्थक करून घेण्याकरिता; पण या फेऱ्यातच आपण अडकून पडलो तर काय उपयोग ? आपण एखाद्या कापडाच्या गिरणीत गेलो तर म्हणतो, 'काय धोटे फिरतात !' परंतु फिरवणारा तर दुसरीकडेच असतो, त्याप्रमाणे, देहाचे देहपण जीव असेल तोपर्यंत; त्यामधून तो जीवात्मा नाहीसा झाला की, देहाचे देहपणही नाहीसे होते. आत्म्याच्या संयोगाने सर्व काही चालते. एका गृहस्थाला फार काम असे, जेवायलाही फुरसत मिळत नसे. त्याच्या आईने त्याच्या खिशात बदाम, खडीसाखर, वड्या अशा जिनसा टाकल्या आणि



सांगितले की, "येताजाता, काम करता करता, एक एक तोंडात टाकीत जा." त्याप्रमाणे, संतांनी आम्हाला नामरूपी खाऊ दिला आणि सांगितले की, "येताजाता, काम करता करता, हा तोंडात टाकीत जा, म्हणजे लोभाची भूक लागणारच नाही, फार सुख होईल." एका गृहस्थाचे त्याच्या भावाशी भांडण होते. त्याने जेव्हा आपले मृत्युपत्र केले तेव्हा त्यामध्ये लिहिले की, "माझ्या शवाला माझ्या भावाचा हात लागू नये." काय ही देहबुद्धीची पराकाष्ठा ! आज आपल्याला जे करणे योग्य आहे ते करायचे सोडून, मनुष्य कालचे आणि उद्याचे पाहात बसतो. पुष्कळ लोकांना 'उद्या काय होणार ' हे कळायला पाहिजे असते. पण आपला पुढचा काळ चांगला यावा म्हणून आपण आज चांगले वागणे जरूर आहे; तसे न करता मागच्याचा किंवा पुढच्याचा विचार करीत बसणे म्हणजे जे करू नये ते करणे, हे मायेचे लक्षण होय. मायेच्या तावडीत जे सापडलेले आहेत ते लोक करू नये ते करतील, आणि उद्याची काळजी करतील. मनुष्याची एक स्थिती कधीच कायम राहात नाही. आजची वाईट स्थिती जाऊन चांगली स्थिती उद्या ना परवा येणारच असते. पण आपला प्रयत्न आपण कधी सोडू नये. व्यवहारात नेहमी प्रयत्न आणि परमेश्वर यांची सांगड घालावी. कर्माचा हेतू जाळून टाकावा ही पुढची पायरी. रामाच्या इच्छेने सर्व काही होते ही दृढ भावना ठेवून, मरणाची भिती बाळगू नये आणि जाण्याची काळजी करू नये. नेहमी नामस्मरणात राहण्याचा प्रयत्न करावा.

**बोधवचन :** कर्तव्यी असावे तत्पर । मुखी नाम निरंतर
॥श्रीराम समर्थ

–श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर

# उन्हाळी कांदा चाळीतच सडल्याने उत्पादक हवालदिल

## लाल कांदा बाजारात उशिरा येणार असल्याने यंदाही कांदा भाव खाऊन जाणार

आधुनिक केसरी न्यूज

**रामभाऊ आवारे**

**निफाड :** जगाच्या अन्नाची सोय लावणारा बळीराजा दरवर्षी येत असलेल्या अस्मानी-सुलतानी संकटांनी चिंतातुर झाला असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले असून सद्यस्थितीत आगामी पिकांच्या भांडवलाची नितांत गरज असल्याने व दरवर्षी डोक्यावर वाढत असलेला कर्जाचा डोंगर फेडायचा तरी कसा? या विवंचनेत सापडला असून शेती करावी की शेती करणं सोडून द्यावं ? अशी द्विधा मनस्थिती निर्माण झाली आहे. यंदाच्या वर्षी लाल कांदा बाजारपेठेत दाखल होण्यास दीड ते दोन महिने उशीराने येणार असल्याने यंदाही कांदा भाव खाण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आशा पल्लवी झाल्या आहेत. यंदा परतीच्या पावसाने संपूर्ण महाराष्ट्र नाशिक जिल्ह्यालाही झोडपून काढल्याने मका सोयाबीन टोमॅटो कांद्याची उळे, मिरची, व भाजीपाला आदी शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले आहे.अचानक ढगफुटी सारखे पाऊस झाल्याने तीन ते चार वेळा लागवड केलेला लाल कांदा मोठ्या प्रमाणात खराब झाला असून दुसरीकडे चांगल्या दराच्या अपेक्षेने चाळीमध्ये साठवलेला उन्हाळ कांदा देखील खराब होत चालल्याने बळीराजा उत्पादक बळीराजा पुरता हवालदिल झाला आहे.दरवर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत येणारा लाल कांदा यंदा तब्बल एक ते दीड महिने उशिराने डिसेंबर अखेरीस दाखल होण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर ते नोव्हेंबर या महिन्यात उन्हाळ व लाल कांद्याचा समतोल राखला जातो मात्र परतीच्या पावसाने यंदा तो राखला जाणार नसल्याने कांदा भावात तेजी निर्माण होण्याची शक्यता या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत. सध्या नाशिक जिल्ह्यातील बहुतांश बाजार समित्यांमध्ये कांदा चाळीत साठवलेला उन्हाळ कांदा विक्री होत आहे. उन्हाळ कांदा मार्च महिन्यापासून चाळीत साठवणूक केलेला असल्याने कांद्याचे वजन मोठ्या प्रमाणात घटले असून साठवलेल्या कांद्याला मोड येऊन कांदा खराब होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सध्या १५०० ते १७०० रुपये सरासरी भाव शेतकऱ्यांना मिळत आहे. या दराचा अंदाज घेऊन टप्प्याटप्प्याने शेतकरी कांदा विक्रीचा निर्णय घेतला असल्याने सर्वच बाजार समित्यांमध्ये कांदा आवक घटलेली आहे. जेमतेम २० ते २५ टक्के कांदा चाळीत शेतकऱ्यांच्या शिल्लक आहे. घट व कांदा सडण्याचे प्रमाण जास्त असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने चांगले बाजार भाव भेटले तरी जेमतेम खर्च निघू शकेल इतका पैसा शेतकऱ्यांच्या हातात मिळ मिळत असल्याने उन्हाळ कांद्याच्या बाबतीत शेतकऱ्यांचा नाराजीचा सूर दिसून येत आहे.

सध्या बाजारपेठेत विक्री होत असलेल्या उन्हाळ कांद्याला इतर देशातील कोलंबो, दुबई, मलेशिया,



सिंगापूर, सौदे अरेबिया, कुवेत, व्हिएतनाम या प्रमुख देशांमधून चांगली मागणी असून देशात पश्चिम बंगाल, बिहार, पंजाब, दिल्ली, हरियाणा येथे देखील नाशिक जिल्ह्यातील कांदा मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे. त्यामुळे गेल्या दोन आठवड्याच्या तुलनेत उन्हाळ कांद्याच्या भावात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

यंदा लाल कांद्याने शेतकऱ्यांना सुरुवातीलाच भर पावसाने रडवले आहे. सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात परतीच्या मुसळधार पावसाने अनेक शेतकऱ्यांना ३ ते ४ वेळा कांदा बियाणे लागवड करावी लागली. ढगफुटी सारख्या झालेल्या पावसामुळे लाल कांद्याच्या लागवडीसाठी केलेला सुमारे ५० ते ६० हजार रुपयांचा संपूर्ण खर्च वाया गेल्याने लाल कांदा उत्पादक देखील त्रस्त झालेला असून याच कारणाने यंदा लाल कांदा बाजारपेठेत येण्यास दीड ते दोन महिने उशीर लागू शकतो . दरवर्षी दसरा झाला की लाल कांद्याचे आगमन बाजारपेठेत होत असते मात्र यंदा लाल कांदा बाजारात येण्यासाठी वाट पाहावी लागणार आहे.

उन्हाळ कांदा चाळीत सडतो आहे तर लाल कांदा जमिनीखाली अशी परिस्थिती शेतकऱ्याची झालेली असताना कांद्याचा समतोल यंदा राखला जाणार नसल्याने कांद्याच्या भावात तेजी निर्माण होण्याची शक्यता या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत. अशा परिस्थितीत उन्हाळ कांद्यासाठी लागवड व साठवणुकीसाठी केलेला खर्च तर लाल कांद्याचे तीन ते चार वेळा झालेले कांदा बियाणे व इतर खर्चाचे नुकसान भरून निघाले तरी बळीराजा थोडाफार खुश होणार आहे अशी परिस्थिती यंदा आहे.सध्या बाजारपेठेत विक्री होणा-या उन्हाळ कांद्याला चांगली मागणी होत आहे.नाशिक जिल्ह्यातील देवळा, सटाणा, कळवण व चांदवड तालुक्यातील कांदा यंदा उशिराने बाजारात दाखल होणार असल्याने नाशिक जिल्ह्यातील कळवण, सटाणा,देवळा, चांदवड या तालुक्यांमधून सर्वात प्रथम लाल कांदा बाजार समित्यांमध्ये विक्रीस येत असतो. यंदा मात्र परतीच्या पावसाने लाल कांद्याला मोठ्या प्रमाणात तडाखा बसलेला असल्याने अजूनही काही ठिकाणी कांदा रोपे तयार करण्याचे काम सुरू असल्याने कांदा पूर्ण तयार होऊन बाजारपेठेत येण्यास डिसेंबर उजाडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे चाळीत साठवणूक केलेला जो कांदा आहे तो विक्रीवरच शेतकऱ्यांची मदार आहे.महाराष्ट्र बरोबरच मध्य प्रदेश व राजस्थान मध्ये लाल कांदा ऑक्टोबर महिनाअखेरीस बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल होत असतो.यंदा राजस्थान मधील अलवर येथील बहुतांश भागात परतीचा पावसामुळे लाल कांदा पीक धोक्यात आलेले असल्याने जशी परिस्थिती महाराष्ट्रात पावसाने लाल कांद्याची केली तशीच परिस्थिती तिकडे झाल्याने कांद्याची स्थिती बाजारपेठेत उशिरा दाखल होणार असल्याने कांदा तेजी निर्माण करू शकतो अशी शक्यता व्यक्त होत आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करा अन्यथा तीव्र आंदोलन

## नाना पटोले : राज्यातील दळभद्री सरकारच्या नाकर्तेपणामुळे शेतकऱ्याची दिवाळी अंधारात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था यंदा अत्यंत बिकट झाली असून अतिवृष्टीने शेतमालाचे प्रचंड नुकसान केले. विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी तर नैसर्गिक संकटामुळे हतबल झाला आहे. शिंदे-फडणवीस सरकारने जाहीर केलेल्या मदतीचा छदामही अजून मिळालेला नाही, पंचनामे करण्यातही प्रशासन ढिम्म असून आता परतीच्या पावसानेही शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. राज्य सरकारने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा अन्यथा काँग्रेस पक्ष तीव्र आंदोलन करेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

यासंदर्भात बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, यावर्षी शेतकऱ्यावर निसर्गाने अवकृपा केली. राज्यातील विदर्भ, मराठवाड्यासह काही भागात अतिवृष्टी झाली, त्यात शेतातील उभे पीक वाया गेले. सोयाबीन, कपाशी, तुर, मका, बाजारी पिकं



हातातून गेली. फळबागा व पालेभाज्यांनाही या पावसाचा फटका बसला, पशुधनाचेही नुकसान झाले. राज्य सरकारने मंत्रालयात बसून पंचनामे करण्याचे आदेश दिले पण स्थानिक पातळीवर प्रशासन कामच करत नसल्याचे चित्र आहे. मी स्वतः विदर्भ व मराठवाड्यातील अतवृष्टीग्रस्त भागाला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. अधिकारी पंचनामे करण्यास येतच नाहीत, जे काही पंचानामे होत आहेत ते वस्तुस्थिती पाहून केले जात नाहीत यात शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. राज्य सरकारने जास्त मदत दिल्याची घोषणा केली पण ही मदतही तुटपुंजीच आहे आणि तीसुद्धा अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नाही. अतिवृष्टीनंतर शेतकऱ्यांचे झालेले नुकसान पाहता राज्य सरकारने तातडीने हालचाली करून शेतकऱ्यांना मदतीचा हात देणे गरजेचे होते पण तसे झाले नाही. महाविकास आघाडी सरकारने नैसर्गिक आपत्ती ओढवताच तात्काळ दहा हजार रुपयांची रोख मदत दिली व नंतर १० हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. मविआचे सरकार येताच पहिला निर्णय शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा केले. अटी, शर्थी, नियमांचे अडथळे निर्माण करुन शेतकऱ्याला ऑनलाईनच्या रांगेत दिवसरात्र उभे केले नाही. काँग्रेस पक्षाने याधीच ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती पण राज्यातील ईडी सरकारने शेतकऱ्यांकडे साफ दुर्लक्ष केले. काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून सरकारने लवकारत लवकर ओला दुष्काळ जाहीर करून शेतक-यांना मदत केली नाही, तर मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# दिवाळी पहाट कार्यक्रमावरून रोहित पवारांचा सरकारला टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दसऱ्या मेळाव्यानंतर आता ठाण्यातील दिवाळी पहाट कार्यक्रमावरून पुन्हा शिंदे गट विरुद्ध ठाकरे गट असा संघर्ष सुरू होण्याची शक्यता आहे. दरम्यान, यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी शिंदे गटाला टोला लगावला आहे. दसरा मेळाव्याच्या वेळीही शिंदे गटाने शिवाजी पार्क मैदानासाठी हट्ट धरला होता. त्यावेळी त्यांनी मोठ्या मनाने उद्धव ठाकरे यांना दसरा मेळावा घेऊ द्यायला हवा होता. मात्र, हे प्रकरण न्यायालयात गेलं. अंधेरी निडवणुकीच्या उमेदवारीवरूनही त्यांनी हाच प्रकार केला. अखेर न्यायालयाने ठाकरे गटाच्या बाजुने निकाल दिल्यानंतर ऋतुजा लटके यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला. मात्र, आता दिवाळी पहाट कार्यक्रमासाठीही न्यायालयात जावं लागेल की काय, अशी परिस्थिती आहे. अशा छोट्या छोट्या गोष्टीसाठी जर न्यायालयात जावं लागत असेल, तर जनता निडणुकीच्या माध्यमातून त्यांना उत्तर देईल. मोठ्या मनाचे लोक निवडून येतील आणि सारखं आडवाआडवीचे काम करणाऱ्यांचा पराभव होईल", असा टोला रोहित पवार यांनी शिंदे सरकारला लगावला आहे. राज्य सरकारने ८३० कोटींच्या प्रकल्पांना स्थगिती दिल्यावरूनही रोहित पवार यांनी शिंदे सरकारवर टीका केली. राज्य सरकारने ज्या प्रकल्पांना स्थगिती दिली आहे. त्यापैकी बरेच प्रकल्प हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या मतदार संघातले आहे. यामध्ये रस्ते, शाळा, मंदिरे यासारख्या कामांचा समावेश आहे. या कामांसाठी जर हे पैसे खर्च झाले असते, तर सर्वसामान्यांची अनेक महत्त्वाची कामे पूर्ण झाली असती. त्यामुळे सरकारचा हा निर्णय योग्य नाही, असेही ते म्हणाले.

# उद्धव ठाकरे यांना मत म्हणजे काँग्रेस – राष्ट्रवादीला मत

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी



मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेससोबत हातमिळवणी केली व त्यांचे विचारही स्वीकारले. त्यामुळे अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत उद्धव ठाकरे यांना मत देणे म्हणजे काँग्रेसला व राष्ट्रवादी काँग्रेसला मत असेल. भारतीय जनता पार्टीचे युवा कार्यकर्ते घरोघर जाऊन याबद्दल जागृती करतील, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी सांगितले. ते मुंबई येथे प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील व नवनियुक्त भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर उपस्थित होते. ते म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीचे सरकार असताना अडीच वर्षात काँग्रेसचे विचार स्वीकारण्यासोबतच काँग्रेस वारंवार स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करत असताना त्या पक्षाला साथ दिली. आता त्यांच्या गटाने राहुल गांधी यांच्या यात्रेला पाठिंबा दिला आहे. उद्धव ठाकरे यांची सेना बाळासाहेबांच्या विचारांपासून फार दूर गेल्याचे आम्ही घरोघर जाऊन मतदारांना सांगू. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार यांच्या नेतृत्वात भाजपा अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणूक जिंकेल. आगामी निवडणुकीत आदित्य ठाकरे यांचा वरळी मतदारसंघ, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा साकोली व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांच्या बारामती मतदारसंघातही चमत्कार झालेला दिसेल. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेत आमदार नाराज असल्याचा केलेला आरोप तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शिंदे – फडणवीस सरकार टिकणार नसल्याचे केलेले भाकित याविषयी एका पत्रकाराने प्रतिक्रिया विचारली. त्यावेळी मा. बावनकुळे म्हणाले की, महाविकास आघाडी सरकार असतानाही ते म्हणत होते की, भाजपाचे आमदार त्यांच्या संपर्कात आहेत पण प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. अजित पवार आणि जयंत पाटील यांनी त्यांच्या पक्षाच्या आमदारांमध्ये काय चालले आहे ते आधी पहावे. त्यांच्या पक्षातून भाजपामध्ये प्रवेशाचे बॉम्बस्फोट होतील तेव्हा त्यांना कळेल.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

● घाऊक आणि किरकोळ
● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे
● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# युवक महोत्सव



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**युवक म्हणजे उत्साह, ऊर्जाशक्ती, निर्भीडपणा, काहीतरी करून दाखवण्याची धमक, बेफिकिरी, जिंदादिली आणि बरंच काही. याच युवकांच्या सकारात्मक प्रयत्नातून उद्याचा सुजलाम सुफलाम भारत घडणार आहे. युवकांच्या कलागुणयुक्त संघशक्तीला योग्य वळण मिळावे आणि संस्कृती व सभ्यतांचा प्रवाही झरा अखंडपणे प्रवाहित राहावा, यासाठीचे प्रयोजन म्हणजे युवक महोत्सव होय. हा महोत्सव युवकांच्या एकत्र येण्याने, संगनमताने आणि मैत्री भावातून पूर्ण होत असतो. इथेच अनोळखी व्यक्ती ओळखीची होऊन आयुष्यभर मैत्री भावात परिवर्तित होत असतात.**

तारुण्य आणि अस्थिरता या समांतर चालणाऱ्या गोष्टी आहेत. जे सळसळते असते ते स्थिर कसे असेल. स्थिरत्व आणि वृद्धत्व हे एकत्र असणार, पण तारुण्य कोणत्याही परिणामाची तमा बाळगत नाही. मग तुम्ही त्यांना हवे तर कितीही नावे ठेवा. महाविद्यालयीन जीवनात तारुण्य सांभाळून अभ्यासही करायचा, ही तरुणांसाठी मोठी तारेवरची कसरत असते. कारण कोणतीही गोष्ट सांभाळताना ताण तर येणार हे नक्की. दरिद्री नारायणाला रात्रीला शांत झोप लागते, पण त्याच्याकडे थोडीबहुत जमापुंजी आली की, झोप उडते. कारण त्याला ती रक्कम सांभाळायची असते. सांभाळण्यातून निर्माण होणारी चलबिचल, अस्थिरता दोन्हीकडे सारखीच. तारुण्य, संपत्ती, सौंदर्य सांभाळणे म्हणजे हिवाळ्यात ऊब न घेता शेकोटीचे दुरून रक्षण करण्याचा प्रकार. दूर बसलात तर तडपत रहाल आणि जवळ गेलात तर वितळून जाल, अशी अवस्था. त्याचा सुवर्णमध्य कसा साधायचा आणि आनंदी व मैत्रीपूर्ण आयुष्य कसे घालवायचे याचा जणू वस्तुपाठच युवक महोत्सवामधून शिकायला मिळतो. महाविद्यालयीन युवक म्हणजे केवळ हुल्लडबाजी, धिंगाणा आणि अरेरावी असेच चित्र आहे का? नाही. या जगाचे जे काही थोडेबहुत चित्र चांगले, गोजिरे दिसत आहे, ते युवकांमुळेच, हे आपणास विसरता येणार नाही. कारण कल्पना आणि चिंता या दोन्ही गोष्टीपेक्षा आजचे वास्तव युवकासाठी महत्त्वाचे असते. लहान मुले कल्पनेत जगतात तर म्हातारी माणसे इतिहासात व चिंतेत हरवून जातात, परंतु युवक आज आणि या क्षणाचा परिपूर्ण उपभोग घेण्यास आतूर असतात. आपले काम फक्त या उपभोगामुळे इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही, एवढेच पाहण्याचे असते. ओरबडणे किंवा कुस्करणे म्हणजेच उपभोग घेणे हा जो निर्दयी अर्थ वर्तमानावर घोंगावत आहे, त्याला फुली मारून कलासक्त आणि संयमी उपभोग कसा घ्यायचा हे शिकायचे आणि शिकविण्याचे कार्य म्हणजेच युवक महोत्सव होय. आजकालचे तरुण फारच उच्छाद मांडतात, असा एक आरोप नेहमी तरुणांवर केला जातो. जे विद्रोही असतात ते उच्छाद मांडणारच. विद्रोह हा तारुण्याचा स्थायीभाव आहे. म्हातारी माणसे जास्तीत जास्त कुथू शकतात, पण विद्रोह करावा तो युवकांनीच. आपण जाणती माणसे म्हणून आपले काम एवढेच की, हा विद्रोह सकारात्मक आहे की विध्वंसक एवढेच पाहण्याचा.

आपली आजची शिक्षणव्यवस्था कशी चालू आहे, यावर तर काही बोलणेच नको. कारण घोकमपट्टी आणि त्या अनुषंगाने येणारी तांत्रिकता या आवर्तातच आजचा युवक घिरट्या मारत आहे. आपणही त्यातूनच आलो आहोत. भीती, जरब, चिंता, अनिश्चितता आणि घुसमट यात प्रेम कोठे आहे. संपूर्ण शिक्षणव्यवस्था प्रेमपूर्वक केल्याशिवाय आपण प्रेममय नागरिक घडवू शकणार नाही. आमच्या शिक्षणात प्रेमाला अजिबात स्थान असू नये आणि तरीही आम्ही जगाला प्रेम अर्पावे असे म्हणत असू तर ही विसंगती आहे, हेही आमच्या लक्षात येत नाही. प्रफुल्लित वातावरणात मस्तिष्क हजार पटीने काम करते तर दडपणात आणि चिंतेत आहे तेही घालवून बसते, हे शास्त्र आम्हांस अजूनही अवगत होऊ नये, हा दैवदुर्विलास म्हणावा लागेल. या वातावरणातून मग युवक त्यांच्या पध्दतीने मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. समाज म्हणून आपण वाह्यातपणाचा शिक्का मारून मोकळे होतो. जिथे प्रेम नसते तिथे अश्लीलता वाढते आणि अश्लीलतेत प्रेम असत नाही. हे दोन्ही नेहमी व्यस्त प्रमाणातच असणार. आपण ठरवायचे की आपणांस कोणती बाजू घ्यायची. कलेची, सौंदर्याची जाणीव माणसाला प्रेमपूर्वक बनवते, त्यासाठी महाविद्यालयीन युवकामधील कलाबीजाचे संवर्धन होण्यासाठी युवक महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावते.

स्थानिक महाविद्यालयात आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकल्यानंतर गुणानुक्रमे जे अव्वल येतील त्यांची निवड केंद्रीय पातळीवरील युवक महोत्सवात होत असते. विविध कलाप्रकारात वेगवेगळ्या रंगमंचावर ह्या कला सादर होत असताना केवळ कलाकार विद्यार्थीच नाही तर उपस्थित प्रेक्षकही तहानभूक हरवून आस्वाद घेतात.

भविष्यात हीच मुले वेगवेगळ्या क्षेत्रात आपले नाव कमावतात. आजच्या घडीचे अनेक दिग्गज कलाकार हे अशा स्वरूपाच्या माध्यमातूनच पुढे आलेले आहेत. कला माणसाला गैरवर्तनापासून परावृत्त करते. चरितार्थ चालविण्यासाठी तुम्ही काय करावे, हा ज्याच्या त्याच्या वकुबाचा आणि कौशल्याचा भाग आहे; परंतु हे करत असताना आपल्यासोबत जर एखादी कला असेल तर जगणे सुसह्य होते, हे नक्की. कलाकार माणूस परमनप्रवेशबुद्धीशी परिचित होतो, किंबहुना त्यास तीही कला अवगत होते. त्याशिवाय त्याचा जो कोणता कलाप्रकार असेल त्यास पूर्णत्व प्राप्त होऊ शकत नाही. आणि या विद्याभ्यासाची पायाभरणी महाविद्यालयीन जीवनापासूनच झाली तर भविष्यकालीन जगणे सुसह्य होण्यास निश्चितच मदत होते. युवक महोत्सव म्हणजे जगणे सुकर होण्याची कला अवगत करण्याचे ठिकाण होय, असे म्हटले तर वावगे ठरू नये. त्याकडे




विद्यार्थ्यांनी एक साधना प्रकार म्हणून पहावे आणि साधनेसाठी ज्या शिस्तीची आवश्यकता असते, ती पूर्वअट पार करावी. कारण गोंधळ घालण्याचे शास्त्र शिकायचे असले तरी तरी ते शांततेत आणि शिस्तीतच शिकावे लागते. प्रसन्नता, प्रफुल्लता आणि उच्छृंखलता जोपासताना आपल्या कलामूल्यास बाधा पोहचणार नाही, एवढी काळजी मात्र युवक कलाकारांनी नक्कीच घेतली पाहिजे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# ‘हिजाब’ला धार्मिक कुबड्यांचा आधार ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**देशातील ‘हिजाब’चा वाद अजून संपलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाचे दोन न्यायमूर्ती हेमंत गुप्ता व सुधांशू धुलिया यांनी हिजाबबाबत दिलेल्या निर्णयात मतभिन्नता आहे. न्या. धुलिया यांनी निकालात हिजाब घालणे किंवा न घालणे, तो व्यक्तीचा अधिकार आहे. मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न महत्वाचा आहे.यात धार्मिक प्रथेचा वाद अनावश्यक आहे. त्यांनी तो निर्णय रद्द केला. तर न्या. गुप्ता यांनी कर्नाटक उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवला. हिजाब हा इस्लाम धर्मातील पंरपराचा भाग नाही. तेंव्हा शैक्षणिक संस्थात हिजाबला बंदी घालणे योग्य असल्याचे मत नोंदविले. आता हे प्रकरण सरन्यायाधीशांकडे जाईल. ते तीन सदस्यीय खंडपीठाकडे जाण्याची शक्यता आहे.**

हिजाब या प्रथेला जगातील बारा राष्ट्रात बंदी आहे. इराणमध्ये हिजाबच्या सक्तीच्या विरोधात मुस्लिम महिला रस्त्यावर उतरल्या आहेत. या महिला ‘हिजाब’चा काळे कपडे जाळून निषेध व्यक्त करीत आहेत. विशेष म्हणजे या प्रथेच्या विरोधात मुस्लिम महिलांनी उठाव केलेला आहे. यात २ ऑक्टोबरपर्यंत १३३ जणांनी बलिदान दिलेले आहे. या उठावाचे मुख्य कारण हिजाबचे नियम न पाळल्याने इराणच्या पोलिसांनी महसा अमिनी (२२ वर्षे) तरूणीला अटक केली होती, ती १६ सप्टेंबर २२ रोजी पोलिस कस्टडीत मृत्यू पावली. त्यामुळे महिला संतप्त व आक्रमक झाल्या आहेत. हिजाब विरोधी लोण इतर मुस्लिम राष्ट्रातही पोंहचले आहे. या उलट भारतात ‘हिजाब’ला धार्मिक रंग देऊन समर्थन केले जात आहे. याला काही मुस्लिम संघटनांची, नेत्यांची फूस आहे. तर विरोधी पक्ष भाजपा मुसलमानांना लक्ष्य करत आहे, अशी चिथावणी देत आहेत. यातून विरोधी पक्ष यातूनही राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत आहे. ‘हिजाब’चा हा वाद कर्नाटकपासून सुरु झाला आहे. राज्यातील उडप्पी येथील महात्मा गांधी मेमोरियल कॉलजमध्ये १ जानेवारी २२ मध्ये काही मुस्लिम विद्यार्थिनी हिजाब परिधान करून गेलेल्या होत्या. तेंव्हा कॉलेज प्रशासनाने त्यांना रोखले व गणवेश घालून घ्यावे, असे सूचित केले. पण हिजाब परिधान करणे इस्लाम धर्माचा भाग आहे, त्यावर बंदी घालता येणार नाही, असा पवित्रा त्यांनी घेतला. यातून वाद सुरू झाला. यातून हिंदू तरूणांनी भगवी शाल घालून ‘जय श्री राम’च्या घोषणा देण्यास सुरूवात केली. यावेळी दोन्ही विद्यार्थ्यांचे गट समोरासमोर आले व घोषणाबाजी झाली. या प्रकरणाचा व्हिडिओ जाणीवपूर्वक व्हायरल करण्यात आला. त्यात एक मुस्लिम तरूणी हात वरे करून ‘अल्ला हो अकबर’च्या घोषणा देत आहे. ही एक तरूणी हिजाब विरोधकांचा सामना करत आहे, असे चित्र उभे केले गेले. त्यात हिजाब परिधान करणे, हा इस्लाम धर्माचा भाग आहे, असे म्हणत इस्लाम कट्टरवावादी लोकांनी यात उडी घेतली.त्यांनी त्या मुलीला ‘शेरनी’ गौरव केला गेला. हा वाद राज्यभर पसरला व हिंसक प्रदर्शन सुरू झाले. हे सर्व वाद नियोजनबध्द पध्दतीने निर्माण केला गेला. कर्नाटक सरकारने यासाठी समिती स्थापन केली. या समितीने शालेय प्रशासनाचा ‘ड्रेस कोड’ अंतर्गत सर्वांना गणवेश घालणे बंधनकारक आहे. तेंव्हा हिजाब घालता येणार नाही, असे निर्णय दिला. त्यानुसार कर्नाटक राज्य सरकारने शिक्षण क्षेत्रात हिजाब घालण्यास बंदी घातली. यामुळे तर कट्टरपंथी मुस्लिम व नेते भडकले व त्यांनी विरोध करून ‘आगीत तेल टाकले’ हिजाब प्रकरणाला भाजपा विरोधात वातावरण निर्माण केले गेले. कर्नाटक सरकारच्या निर्णयाला मुस्लिमांनी कर्नाटक उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने दि. ५ फ्रेब्रुवारी रोजी निकाल दिला. यात हिजाब हा इस्लाम धर्माचा अविभाज्य भाग नाही.शाळा प्रशासनाला गणवेशाचे नियम करण्याचे अधिकार आहेत.हिजाबला बंदी घातली. हिजाब बंदी शिक्षणक्षेत्रापुरती मर्यादीत आहे.याला कट्टरपंथी मुस्लिम नेते विरोध करत आहेत. भाजपा सरकार मुस्लिमांना लक्ष करण्यासाठी हिजाबवर बंदी घालत आहे, असा प्रचार सुरू आहे. यावरून हिजाब प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेण्यात आले. वास्तविक देशात व राज्यात सार्वजनिक जीवनात हिजाबला अजून तरी बंदी घातली गेलेली नाही व तसा कायदा केला गेलेला नाही.

हिजाब हा अरबी शब्द आहे. हिजाब आणि बुरख्यात फरक आहे. मुस्लिम महिला काळ्या कपड्याने चेहरा झाकतात, स्कार्फ बांधतात. त्या पध्दतीला हिजाब व ‘नजरोंको हिजाब’ म्हंटले जाते. हिजाब आणि बुरखा यात फरक आहे. मुस्लिम महिला अंगभर काळा झबला घालून चेहरा झाकतात, त्याला ‘बुरखा’ म्हणतात. यात सुन्नी मुस्लिम महिला काळा तर शिया महिला रंगबेरंगगी बुरखा घालतात.हिजाबचे प्रकारात नकाब, बुरखा, अल अमिरा, शायला, खीमार आणि चादोर असे प्रकार आहेत. कुराण व इस्लाम धर्मात हिजाबचा अर्थ डोके झाकणे एवढाचा मर्यादीत आहे. पुरूषांनी स्त्रीकडे वाईट नजरेने पाहू नये. हेच नियम मुस्लिम पुरूषांना लागू आहेत. त्यांनीही स्त्रीकडे वाईट नजरेने पाहू नये, असाही नियम आहे.



हिजाब विषयावरुन मुस्लिम समाजातही मतभेद आहेत. बुरखा ही प्रथा पुरूषप्रधान मानसिकतेतून आलेली आहे. स्त्री माझी मालमत्ता आहे. माझ्या मालमत्तेकडे इतरांनी पहाता कामा नये, ही भावना आहे. ही प्रथा इस्लाम संस्कृती, परंपरेनुसार चालत आलेली आहे.याबाबत घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिजाब व बुरखा ही प्रथा अप्रगत समाजाचे लक्षण आहे. मुस्लिमांनी यात सुधारणा करण्याची अत्यंत गरज आहे! असे ‘पाकिस्तानबाबत विचार (Thoughts on Pakistan) या पुस्तकात म्हंटलेले आहे. भारतीय संविधानात वस्त्र परिधान करण्याचा हक्क कलम १९ (१) (अ) मध्ये नमुद केले आहे.पण कलम १९(६) नुसार मर्यादा येवू शकतात. आपल्या आवडीचे कपडे घालणे याला’ राईट ऑफ टू प्रायव्हसी’ असे म्हंटले जाते. पण यात राज्य सरकारला मात्र कलम१९, २५, ४० अन्वये सामाजिक हितासाठी धार्मिक पध्दतीत सुधारणा करण्याचा अधिकार आहे.त्यात ड्रेस कोड नियम शिक्षण क्षेत्रात लागू आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी ‘ड्रेस कोड’ लागू केला आहे.तसेच लष्कर, पोलिस, रूग्णालय, विमानसेवा, खासगी कंपन्यात ‘ड्रेस कोड’ लागू केले आहेत. तेंव्हा तेथे धर्माच्या आधारावर कपडे घालता येतील काय? धर्म ही अफूची गोळी आहे, असे म्हंटले जाते. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, बंधूभाव, समता या तत्वाचा स्वीकार केला .त्यांनी प्रथम देश नंतर धर्माला महत्व दिले शंकराचार्यांनी, धर्माची व्याख्येत ‘समाजव्यवस्था उत्तम राहणे. प्रत्येक प्राणीमात्राची ऐहिक व पारलौकीक उन्नती ज्या गोष्टीनै साध्य होते तो धर्म आहे’. असे म्हंटले आहे. तर संत गाडगे महाराज यांनी’ भूकलेला अन्न, ताहन्हल्याले पाणी, बेघरवाल्यासनी आसरा, दुःखी माणसाला आधार देणे हा रोकडा धर्म आहे’. असे म्हणाले. तसेच थोर समाजसेवक, साहित्यिक साने गुरूजींनी तर ‘खरा तो एकची धर्म! जगाला प्रेम अर्पावे! अशी प्रार्थना लिहिली. तेंव्हा काळानुसार धर्मात परिवर्तन व बदल करता आले पाहिजे. पुरातन काळापासून हिंदू धर्मातही अस्पृश्यता, कुप्रथा, रुढी व पंरपरा चालत होत्या.पण त्या विरोधात केंद्र व राज्य शासनाने अनेक कायदे केले आहेत. यात सतीची जाण्याची प्रथा, हुंडा, बालविवाह अश्या कुप्रथावर बंदी घातली गेली. तसेच पुरोगानी महाराष्ट्रात अंधश्रध्दा निर्मुलन कायदा करण्यात आला तसेच महिलांना मालमत्ता, शिक्षण, नोकरी आदी क्षेत्रात पुरुषाप्रमाणे समान अधिकार देण्यात आले आहेत. याला हिंदुधर्मातील कट्टरपंथी लोकांनी विरोध केला होताच ना! माझे असे मत आहे की, पतीच्या मृत्यूनंतर महिलेला ‘विधवा’ म्हणणे चुकीचे आहे. हा शब्द वापरणे म्हणजे महिलेचा अवमान, अनादर करणारा आहे. तेंव्हा ‘विधवा’ या शब्दावर राज्य सरकारने बंदी घातली पाहिजे. त्या ऐवजी ‘श्रीमती’ शब्दाचा वापर करता येतो. हिंदू धर्मातील प्रथेविरोता कट्टरवाद्यांनी विरोध केला होता. आता मुस्लिम समाजातून तीन तलाक, नागरिक सुधारणा कायदा, मुलींच्या विवाह वयोमर्यादेत वाढ, नवीन येणारा लोकसंख्या नियंत्रण कायद्याला धर्माच्या कुबड्या घेवून विरोध केला जात आहे. धर्म कोणताही असो, त्यातील कुप्रथा ह्या समाजासाठी घातक व देशाच्या प्रगतीत बाधा आणणारे असतात. देशाच्या विभाजनानंतर १९५० मध्ये पाकचे तत्कालिन पंतप्रधान लियाकत अली आणि भारताचे नेहरू यांनी दोन्ही देशातील अल्पसंख्याकांच्या सुरक्षेबाबत करार केला होता. पाक या कराराचे पालन करत नाही.भारतात घटनेनुसार अल्पसंख्याकांना समान अधिकार दिले जातात.यात कोठेही भेदभाव केला जात नाही. पण स्वातंत्र्यानंतर ‘काँग्रेसने ‘व्होट बँक’साठी मुस्लिम हिताचे कायदे केले. यात प्रथम हज यात्रेसाठी अनुदान देण्यास सुरुवात केली. १९६४ मध्ये वक्फ बोर्डला मान्यता दिली. या वक्फ बोर्डाकडे लष्कर व रेल्वेपेक्षा अधिक जमीन आहे. या जमिनीची किंमत अब्जावधी रूपये आहे.त्यात पुन्हा २०१४ निवडणुकीपूर्वी दिल्लीतील करोडोची जमीन दान दिली गेली. १९७२ मध्ये मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड स्थापना केली गेली. १९८४ मध्ये मुस्लिम महिलांना पोटगीत सर्वोच्च न्यायालयाचा निकालाच्या विरोधात जाऊन कायद्यात सुधारणा केली. इतकेच नव्हे २०११ मध्ये काँग्रेस सरकार दंगल नियंत्रण नवीन कायदा होते, यात बहूसंख्य हिंदूंना जबाबदार ठरविणारी यात तरतूद होती. संसदेत भाजपाने हिंदू विरोधी काळा कायद्याच्या विरोधात आवाज उठविला, त्यामुळे हा कायदा संमत झाला नाही. त्याचप्रमाणे बेकायदेशीर धार्मिक स्थळांना संरक्षण मिळावे, या उद्देशाने १९४७ मध्ये देशातील धर्मस्थळाची जी स्थिती होती, ती कायम राहतील. धार्मिकस्थळांचे रूपांतरास मनाई करणारा कायदा १९९१ मध्ये आणला. १९७८ मध्ये अल्पसंख्यांकासाठी आयोग आणला गेला. यात मुस्लिम बरोबर शीख, ख्रिश्चन,जैन, बौध्द, पारशी येतात. याचा अधिक फायदा मुस्लिम देण्यात येतो, अल्पसंख्याक समाजाचा विचार केला जात नाही. आज हेच धर्माचे ठेकेदार भारतात धर्माच्या आधारावर कायद्याचा आग्रह धरला जात असून तसा दबाब केंद्रातील भाजपा सरकारवर आणला जात आहे. भारतात घटनेच्या आधारावर कायदे संसदेत केले जातात, ते धर्माच्या आधारावर नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.भारतीय घटनेत समान नागरी कायद्याची तरतूद आहे. तेंव्हा या कायद्याची आवश्यकता आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# काळानुसार शिक्षकांना ‘सजग’ होणं आवश्यक



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये, व्यावहारिक ज्ञान, विषयाचे सखोल आकलन, प्रायोगिक कौशल्ये, विषयाची आवड यांचा अभाव आणि कुठलीही दिशा नसणारे अध्ययन अशा शिक्षणामुळे तरुण पिढीचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे. शिकून निष्क्रिय आणि निकामी झालेल्या तरुणांची संख्या समाजात वाढू लागली तर सर्वसामान्य माणसाच्या मनातील शिक्षणाविषयीची आस्था कमी होईल. असे झाले तर भारतासारख्या विकासाकडे वाटचाल करणाऱ्या राष्ट्रावर त्याचा विपरीत परिणाम होईल, त्यामुळे आजचे शिक्षण आणि शिक्षक याविषयी सखोल विचार करून त्यामध्ये योग्य ते बदल घडून आणणे ही काळाची गरज आहे.

उत्कृष्ट शिक्षक कसा असावा हे ठरवण्याआधी शिक्षण म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. कारण शिक्षकाची भूमिका व त्याचे कार्य हे शिक्षणाशी व विद्यार्थ्यांशी जोडलेले आहे. शिक्षक आणि शिक्षण हे हातात हात घालून चालत असते. शिक्षणातून काय साध्य करायचे आहे हे ध्यानी घेतल्याशिवाय कुठलाही शिक्षक उत्कृष्टतेकडे वाटचाल करू शकणार नाही. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा विकास कसा होतो याची व्यवस्थित कल्पना असल्याशिवाय शिक्षक विद्यार्थी घडवू शकणार नाही.आजच्या काळात निरनिराळ्या प्रकारची माहिती देणे यालाच शिक्षण समजले जाते. त्यामुळे विविध प्रकारची माहिती आपल्या विद्यार्थ्यांना पुरवणे हेच आपले काम आहे असा समज शिक्षकांनी करून घेतलेला आहे. परिणामी अधिकाधिक माहिती विद्यार्थ्यांना पुरवणारा शिक्षक आपल्याला उत्कृष्ट शिक्षक समजतो. परंतु ज्ञान आणि माहिती या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत हे लक्षातच घेतले जात नाही. त्याही पुढे जाऊन जीवनात प्रत्यक्षात उपयोगी पडणारा शहाणपणा हासुद्धा शिक्षणातला महत्त्वाचा बिंदू आहे, हे नव्या शिक्षकाच्या ध्यानातही नसते. माहितीचे रूपांतर ज्ञानात करण्यासाठी अनुभव देण्याची व त्या ज्ञानाचे शहाणपणात रूपांतर करण्यासाठी विचार करण्याची एक महत्त्वपूर्ण पायरी असते, हे ध्यानात घेऊन आपले काम करणारा शिक्षकच उत्कृष्ट शिक्षक ही बिरुदावली मिरवू शकतो. कारण शिक्षणाचा उपयोग शेवटी जीवन जगताना करायचा असतो.

शिकणाऱ्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, त्याचप्रमाणे एखाद्या विषयात पारंगत होण्यासाठी चांगल्या शिक्षकाची गरज असते. निसर्ग, पुस्तक, अनुभव यांनाही गुरू मानले गेले आहे. प्राण्यांच्या वर्तनाचे निरीक्षण करूनही अनेक गोष्टी शिकता येतात. परंतु या प्रकारचे शिक्षण हे अनेक दृष्ट्या अपूर्ण असण्याचा धोका असतो. याचे मुख्य कारण एखादी गोष्ट आत्मसात करण्यात निरीक्षणाची साठवण, त्याचे विश्लेषण, विश्लेषणातून निघणारे निष्कर्ष आणि त्या निष्कर्षातून निघणाऱ्या संकल्पनांची निर्मिती या घटकांचा समावेश होतो. निष्कर्ष, विश्लेषण आणि संकल्पनानिर्मिती यासाठी योग्य त्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्यामुळेच शिक्षक अथवा गुरू यांचे स्थान औपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये अधोरेखित होते. मानवी संस्कृतीचा विकास होत असताना ज्या संस्था उदयास आल्या त्यांमध्ये शिक्षणसंस्था ही महत्त्वाची मानली जाते. या संस्थेचा उदय प्राचीन काळामध्ये झाला असला तरी त्याची व्याप्ती खूपच सीमित होती. कारण शिक्षण हे काही लोकांपर्यंतच सीमित होते. मुख्यतः राजपुत्र आणि काही धनिक व्यक्ती यांनाच सुनियोजित पद्धतीने शिक्षण घेणे शक्य होते. इतर कला कौशल्ये वंशपरंपरागत पद्धतीने शिकविली जात. इ.स.पूर्वी आणि त्यानंतर अनेक थोर विभूती होऊन गेल्या. त्यांनी आपल्या विचारांमधून समाजामध्ये प्रचंड परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या विचारांची परिणती मुख्यतः धर्मसंस्था स्थापन होण्यामध्ये झाली. या विभूतींमध्ये गौतम बुद्ध, आद्य शंकराचार्य, महावीर वर्धमान, येशू-ख्रिस्त, महम्मद पैगंबर या व्यक्तींचा समावेश होतो, हे एका अर्थाने समाजशिक्षकच होते. त्यांच्या ठायी असणारे सखोल ज्ञान, वैचारिक बैठक, समाजापर्यंत जाण्याची क्षमता आणि विचारांतून परिवर्तन घडवून आणण्याची ताकद असल्यामुळे कुठल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नसताना व प्रतिकूल परिस्थिती असताना त्यांनी आपल्या विचारांची छाप समाजावर प्रस्थापित केली.

त्यानंतरच्या काळातही शिक्षण हे बहुजनांपर्यंत काही प्रमाणात पोहोचले असले तरी त्याची व्याप्ती खूपच मर्यादित होती. त्या काळात होऊन गेलेले अनेक शास्त्रज्ञ, संत आणि इतर विचारप्रवर्तन करणारे लोक यांनी शिक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. पारंपरिक शिक्षण पद्धतीचा उदय हा गेल्या 300 ते 400 वर्षांत अधिक प्रमाणात झालेला दिसून येतो. इंग्लंडसारख्या प्रगत देशामध्ये 400 वर्षांपूर्वी विद्यापीठाची स्थापना झालेली नव्हती. त्यामुळे आज आपण ज्या शिक्षकांचा विचार करू इच्छितो ते शिक्षक ही अगदी अलीकडच्या काळाची देणं आहे.

शिक्षणाचे संस्थात्मक रूप तयार झाल्यानंतर शिक्षक हा त्यातील महत्त्वाचा घटक बनतो. संस्थात्मक स्वरूपामुळे शिक्षणाला साचेबद्ध स्वरूप आले. त्याचे अनेक फायदे आहेतच. परंतु या साचेबद्ध स्वरूपामुळे आजच्या शिक्षण आणि शिक्षकांमध्ये ज्या त्रुटी निर्माण झाल्या त्याचा परिणाम आजच्या शिक्षणावर झाल्याचे दिसून येते. विसाव्या शतकाच्या पार्श्वभूमीवर विचार केला असता 21 व्या शतकात शिक्षकांच्या पुढे असणारी आव्हाने ही वेगळ्या प्रकारची आणि अधिक आव्हानात्मक आहेत. 20 व्या शतकातील शिक्षणामध्ये माहिती वितरित करण्यावर अधिक भर होता. त्याचे कारण माहितीची उपलब्धता तितक्याशा प्रमाणात नव्हती. विशेषतः भारतात शिक्षण त्या मानाने अविस्तारित स्वरूपात आणि निम्न स्तरावर उपलब्ध होते.



शिक्षणाकडे वळणारे विद्यार्थी प्रामुख्याने शिक्षणाची आवड आणि क्षमता असणारे होते त्यामुळे शिक्षकांकडून मिळालेल्या थोड्याशा प्रोत्साहनावरही ते आपले ध्येय गाठण्यात यशस्वी झाले. याचा अर्थ 20 व्या शतकामध्ये सक्षम, व्यासंगी, उच्च दर्जाचे शिक्षक नव्हते असा होत नाही. परंतु अशा शिक्षकांची संख्या मर्यादित होती. शिक्षणाबद्दल असणारी आस्था आणि आचरणामध्ये असणारी शुद्धता यांचा परिणाम विद्यार्थ्यांवर चांगला होत असे. याउलट 21 व्या शतकामध्ये माहितीची प्रचंड प्रमाणामध्ये उपलब्धता आहे. शिक्षणाचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणात झाला आहे. त्यामुळे शिक्षकांची संख्याही प्रचंड प्रमाणात वाढली आहे. शिक्षकांची लागणारी पात्रता ही आता उच्च दर्जाची असून त्यांना विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण घेणेही बंधनकारक आहे. परंतु त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढली आहे काय, या प्रश्नाचे उत्तर मात्र दुर्दैवाने नकारात्मक आहे.

शहरी आणि ग्रामीण दोन्ही पातळ्यांवर शिक्षणाची गुणवत्ता खालावलेली दिसून येते, या परिस्थितीला शिक्षक पूर्णपणे जबाबदार नसला तरी त्याचा वाटा 70 टक्के एवढा निश्चित आहे. ग्रामीण भागातील शिक्षकांमध्ये शिकवण्याकडे असणारा कल कमी होत आहे. पूर्वी शिक्षक हा राजकीय, सामाजिक आणि इतर वादविवादांपासून अलिप्त असे. समाजामध्ये त्याचे स्थान मार्गदर्शकाचे असल्यामुळे समाजाचा त्याला आधार आणि पाठिंबा असे.अलीकडच्या काळात शिक्षणाचे अयोग्यरीत्या सरकारीकरण झाल्यामुळे शिक्षकांना शिकवण्याव्यतिरिक्त अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यातच समाजाचा शिक्षकांविषयी असणारा दृष्टिकोन बदलल्यामुळे राजकीय आणि सामाजिक दबावापासून आपले संरक्षण त्यांना स्वतःलाच करावे लागते. शिक्षकांची गुणवत्ता आणि ते त्यांच्या कर्तव्यात करत असणाऱ्या कसुरीबद्दल समाज त्यांच्यावर टीका करत असला तरी समाजाकडून अपेक्षित असणाऱ्या मूल्यांमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. या मूल्य ऱ्हासांचा परिणामही शिक्षकांवर होणे साहजिकच आहे. या गोष्टी तूर्त बाजूला ठेवू. तरी त्या शिक्षकांचा कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल होणे गरजेचे आहे. माहितीच्या उपलब्धतेमुळे विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देणे हा शिक्षणाचा उद्देश मागे पडला आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः माहिती गोळा करून त्यावर विचार करणे अपेक्षित आहे. वर्गामध्ये शिक्षकांनी त्या विद्यार्थ्यांना तो विषय अधिक चांगला कसा आत्मसात करता येईल याविषयी मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. याचाच अर्थ असा की शिक्षकांना तो विषय नीटपणे समजायला हवा एवढेच नव्हे तर त्या विषयाशी आनुषंगिक अशा इतर गोष्टींचे त्याला ज्ञान हवे.

आपण जो विषय शिकतो त्या विषयाची उपयोगिता, त्याचा तात्कालिक संदर्भ आणि त्या विषयामध्ये पुढे होऊ घातलेले बदल यांचे ज्ञान शिक्षकाला हवे. विद्यार्थ्यांना केवळ विषय माहीत होणे अपेक्षित नसून त्यातील संकल्पना त्यांना स्पष्टपणे कळायला हव्यात, किंबहुना त्या संकल्पनांचे त्यांना आकलन व्हायला हवे. यासाठी शिकवण्याच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल अपेक्षित आहे. वर्गातील शिक्षण विद्यार्थ्यांच्या सहभागाने व्हायला हवे, विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची पूर्ण मुभा असायला हवी. त्यांच्या प्रश्नांचे निरसन चर्चेद्वारे आणि शिक्षकांना अवगत असलेल्या ज्ञानाच्या आधारे व्हायला हवे. असे झाले नाही तर 21 व्या शतकामध्ये शिक्षकांची गरजच काय असा प्रश्न उपस्थित होईल. परंतु माहितीची उपलब्धता असली तरी विषयाच्या आकलनासाठी विद्यार्थ्यांना चांगल्या आणि व्यासंगी शिक्षकांची निश्चितच गरज भासणार आहे, पण त्यासाठी शिक्षकांनी व्यासंग जोपासायला हवा. शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व हे बहुआयामी असायला हवे. परंतु शिक्षकांचे या गोष्टींकडे बऱ्याच वेळा दुर्लक्ष होते. विद्यार्थी हा वर्गात आणि वर्गाबाहेर शिक्षकांचे निरीक्षण करीत असतो. शिक्षकांच्या शिकवण्यामधून व त्याचप्रमाणे त्यांच्या वर्तनातून विद्यार्थी प्रेरणा घेतात. शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनावर दूरगामी परिणाम करतात. त्यांना ध्येयनिश्चितीसाठी आणि ते ध्येय साध्य करताना येणाऱ्या संकटांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी सक्षम बनवितात. एक चांगला शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनात संपूर्ण परिवर्तन घडवून आणतो. आज शिक्षण पद्धतीमध्ये अनेक बदल होत आहेत. शिक्षण हे आता त्यागवृत्तीने सेवा करण्याचे क्षेत्र राहिले नाही, त्याची वाटचाल ही सेवावृत्तीपासून व्यवसायाकडे आणि व्यवसायाकडून आर्थिक उत्पन्नाच्या साधनाकडे होऊ लागली आहे.

(उर्वरित मंगळवारच्या अंकात)

# मॅटवानाचा ड्रायव्हर (वऱ्हाडी लघुकथा)

आधुनिक केसरी

**(मागील अंकावरून)**

“ क्या साहाब मरने को इतना डरते हो ..... मौत तो ऊपर वाले के हात में है...”

लोणावळा पार करून आम्ही पून्याच्या जवळपास आलो होतो . एकशे सत्तर एकशे ऐंशी च्या स्पीडन थो गाळी पीटायत होता . कृष्णा भौ न त्याच्या खांद्याले पकळून गाळी थांबवाले लावली . गाळी थांबताच कृष्णा भाऊ तावातावान खाली ऊतरले अन जोर्यात गाळीच दार पायानं लावलं.

“ ओय साल्या मॅट झाला काय बे ! इतक्या स्पीड न गाळी चालवते काय कोनी , तुले यवळ सांगूनही काही कयत नाह्यी काय बे.”

हे सारे वऱ्हाडी शब्द मोहम्मद च्या कानावरून पार आभायात गेले . त्यानं रस्त्याच्या कळेन गाळी ऊभी केली होती. मले वाटल आपल्या अस थांबन्यान ट्राफिक जाम होवू शकते . म्या कृष्णा भौ ले समजावल तेयले गाळीत बसाची इनवनी केली . मोहम्मद ले डावा डोया मारून खोटनाट झापल.

“ देखो मोहम्मद भाई आप ऐसे इतने स्पीडसे अगर गाडी चलाओगो तो हम पुना से मुंबई ट्रेन से आयेगे. कृष्णा भाई बोल रहे तो जरा धीरे चलावोना यार. हमे देर नही हो रही तो आप को क्या तकलिफ हो रही है ..जरा लेट पहुचेगे ...’ दुर्घटना से देर भली.’....

मंग कृष्णा भौ ले समजावून गाळीत बसोल .. म्या मोहम्मद ले समजावल होत. त्याचा आनंद कृष्णा भाऊ च्या तोंडावर दिसत होता . आम्ही बसलो गाडी चा वेग पयल्या परीस जरा मंदावला होता . हळूवारपणे गाळी मोहम्मद चालवत होता . गानंही जुन्या काळातल लागल होतं...’ खुदा भी आसमा से जब जमी पर देखता होगा..मेरे मेहबूब को किसने बनाया सोचता होंगा..’ आता गाळी जरा दमान चालली पाचच मिनीट झाली अन नवीन काळातल गानं लागल ...’ तुम दिलकी धडकन मे रहते हो रहते हो...मेरे इन सासो से कहते हो कहते हो ..’ अन नवं गान लागताच गाळीची ईस्पीड वाहाळली ....सत्तर , ऐंशी , नव्वद ..... अन पार एकशे सत्तर च्या पुळे गेली . गाळी हवेसंग बोलत हवेचा मुका घेत होती... मोहम्मद गान गुनगुनत होता ....कृष्णा भाऊ माह्यातोंडाकळे पाह्यत होते . मी नकळत हासलो..माह्य हासू म्या दाबलं ...अन मोहम्मद ले कृष्णा भाऊ न डबल दम देन चालू केल..

“ अबे ओय ! भाई तुझे समज मे नही आ रहा क्या मै क्या कह रहा हूँ....अहो सु.पुं. भाऊ त्याले तुमच्या भाषेत सांगा ना बुवा नाह्यी त हा आपल्याले मारून टाकनं..”

पुळ एक पाटी आली मोहम्मद न मले इशारा केला ..” साहाब जरा देखो पाटी आयी है.”

म्या जरा मान खाली घेतली डोये वदर फिरोले तीथसा लिवून होतं..’ सावधान पुढे नागमोडी वळन आहे .वाहने हळू चालवा...’ मोहम्मद ले म्या म्हतल ...

“ मोहम्मद भाई अब गाडी धीरे चलावो आगे नागमोडी वळन है..”

त्याले नागमोडी वळन काह्यी केल्या समजल नाह्यी . कृष्णा भौ न मले म्हतल.

“ ओ सुपुं भौ त्याले समजत नाह्यी नागमोडी वळन काहाले म्हनतात त . त्याले त्याच्या भाषेत सांगा..” म्या होकारार्थी मान हालवून मोहम्मद ले नागमोडी वळण काय असते समजावाले लागलो..” मोहम्मद भाई आगे का रस्ता साप कैसा चलता है वैसा है..” मोहम्मद मिश्कीलपणे गालात हासत होता. थो ऊलटून मलेच म्हनाला.

“ साहाब झीकझॅक बोलेना शीधा.”

मले वाटल सायाच्याले इंगरजी येते मंग बोर्ड कामून वाचता येत नाही.थो बंबईत राह्यत असल्यानं त्याच्यावर इंगरजीचा प्रभाव पळला असन असं मले वाटून गेल. गाळी पुळे धावत होती कृष्णा भाऊ च्या तोंडावरली चिंता काही केल्या कमी होत नोती . तेयच्या मनाले एकच चिंता होती की हा मॅट ड्रायव्हर आज आपल्याले ॲक्सीडेंट मंधी मारनार हाय. मंग मले ही जरा कृष्णा भौ ची मजाक कराची हुक्की आली होती ...

“ कृष्णा भौ आजचा आपला दिवस ह्या मातीवरला आखरीचा हायं . आपण संध्याकायचं जेवन स्वर्गात करूया....” मंग कृष्णा भौ च्या तोंडावर भेव मले अधीक जादा प्रमाणात दिसून येत होता..कृष्णा भौ मोहम्मद कळे अधिकच रागान पाह्यत होते. मोहम्मद ले आता समजावन्यात काहीही अर्थ नाही असा माह्या समज झाला होता . मोहम्मद च्या मनाप्रमान गाळी चालू द्याव. अस आता मले वाटत होत . मोहम्मद दोघाचही आयकत नोव्हता त्याच एक वाक्य होत... “ मुझे हौफ है गाडी कैसे चलाने की.”

ह्या त्याच्या एका वाक्यान मले जरा हायसं वाटत होतं . गाळी सुसाट चाल्ली होती सकाळचे नवू वाजले होते . वारा माह्या केसा सोबत खेयत होता..एक गानं लागल गानं गुनगुनत होतो. नाकपुड्यात वार घुसत होतं..कृष्णा भौ मातर चिंतेत होते की , कवा पुना येईन अन कवा ह्या गाळीच्या बाहेर पळनं .... मोहम्मद त्याच्याच तालात गाळी चालवत होता. लोणावळा पार झाला होता . गाळी ले ब्रेक मोहम्मद लावतच नोता. ॲक्सीलेटर च्या मुंडीवरला ऊजवा पाय काह्यी केल्या मोहम्मद काळातच नोता . पुळे एक ऊथळ स्पीड बेकर आलं मोहम्मद ले गाळी चालोन्याच्या धुंदीत थे काह्यी दिसल नाही . गाळीनं ऊच्ची ऊळी मारली स्टिअरिंग हालली अन गाळी जावून एका हिरो होंडा ले ठोकली. नवीनच जोळप होतं . बहुतेक हनीमून ले लोणावळ्यात चाललं होतं. दोघही नवरा बायको खाली पळले होते. मोहम्मद न गाळी थांबवली कृष्णा भौ जोर्यात मोहम्मद वर डाफरले मी ही मोहम्मद ले बोलू लागलो...

“ अरे! ये भाई लोगोको मारेंगा क्या.” स्पीड बेकर वरून गाळी गेल्यानं आमच्या दोघाचे टाळू गाळीच्या वरच्या छपराले लागले होते . बर झाल गाळीच छप्पर नरम होत . आम्ही खाली ऊतरलो मोहम्मद ले कृष्णा भौ झापत होते. मी गाळीच्या खाली ऊतरून थ्या नव्या जोडप्याले हात देवून ऊभं केल . दोघालेही चांगलच लागल होतं. हिरो होंडा च्या टाकीतून पेट्रोल गयत होतं. जोर लावून गाळी ऊभी केली . रूमालानं थ्या मानसाच आंग झटकल. त्याले काह्यी लागल काय इचारल. त थो कमरीले हात लावून कन्हत होता . मले मनातल्या मनात मोहम्मद चा राग येत होता. नवीन जोळप बीचारं फिराले चाललं अन ह्या सलीमन त्याच कंबळक मोळल होतं. कृष्णा भौ ले आता राग अनावर झाला होता . थे मोहम्मद ले घालून पाळून बोलत होते. पन मोहम्मद ले कायचच सोयरसुतक नोत. थो डोयातल्या डोयात मिश्कीलपणे हासत होता . कृष्णा भौ म्हणाले..

“ बस्स झाल आता . मी आता काही केल्या गाळीत बसनार नाह्यी . मारून टाकीन लेकाचा हा. याले कितीक समजावा याले अक्कल नावाची गोष्ट काय असते थेच माहित नाही. आता मी ॲटो , बस जे भेटन त्यानच पुन्याले येईन..काय जब्बर मानूस हायं लेकाचा काह्यी केल्या आयकूनच नाह्यी राह्यला ....हे देवा काय करावं आता ..

“ कृष्णा भौ चा दिनवाना अन केविलवाना चेहरा पाहून मले खराब वाटलं . आता पुना वीसच किलोमीटरवर होतं . म्या मोहम्मद ले समजावल ऐंशी नव्वद च्या स्पीड न गाळी चालवाची ताकीद देल्ली.. कृष्णा भौ ले समजावून गाळीत बसवल . कसतरी पुरस्कार वितरण सोहळ्याच्या जागी पोहोचलो . कृष्णा भौ न भल्लामोठ्ठा श्वास घेतला . सुटलो बुवा एकदाचं. विधानसभा अध्यक्ष मा.ना. दिलीप वळसे पाटील ययच्या हातान २०१७ चा शांताबाई शेळके साहित्य जीवनगौरव पुरस्कार घेतला . लापशी अन कांद्याची चटनी सोहोळ्याच्या ठिकानी खाल्ली .

“ आता मी परत मुंबई ले त्याच्या गाळीत येनार नाही सु.पुं. तुम्हाले जा च असन त जा मी येनार नाह्यी . “ अस् कृष्णा भौ बोल्ले.

आम्ही तीघायन लापशी अन कांद्याची चटनी खाल्ली पन लापशी गोळ असल्यान म्या काही जास्त खाल्ली नाह्यी . पुन्याची मीसळ अवघ्या महाराष्ट्रात फेमस हाय मंग म्या मिसळ पाव खाल्ली. मोहम्मद ले जौळ बलावल त्याले. चारशे रुपये भत्ता देला आठशे रूपये मजुरी देल्ली अन वरून तीनशे रुपये बक्षीस म्हनून देल्ले अन त्याले म्हतल ..

“ आप जावो बंबई हम लक्झरी से आयेंगे. .. “

कृष्णा भौ ले आता आनंद होत होता . की सायाच आपन वाचलो . मोहम्मद न एक सिगरेट फुकली ..

“ ठिक है साहाब .” ...

अस म्हतल मिश्कीलपणे कृष्णा भौ कळे पाहून हासला. आम्ही चाकन वरून लक्झरी त बसलो मुंबई ले जा साठी. मी अन कृष्णा भौ लक्झरीत खिडकी सीटवर बसलो . कृष्णा भौ न खिडकीतून बाहेर पायल त मोहम्मद गाळी चालवत धुंदीत चालला होता. अन कृष्णा भौ ले अखिनं धळकी भरली आणि मी जोरात पोट दुकेलोग हासलो.

# “वहाँ कौन है तेरा...”

आधुनिक केसरी

**एकोणीसशे साठला आलेल्या एका चित्रपटाने हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासावर आपलं नाव सुवर्णाक्षरानेच कोरलं! चित्रपट होता बिमल रॉय निर्देशित ‘सुजाता’. तरलतेचे आणि संवेदनशीलतेचे मापदंड रचणारा हा चित्रपट सचिन’दांच्या संगीत प्रतिभेचा जणू कळस आहे. त्यातलं तलत यांनी गायलेलं हे गाणं मी आजही ऐकतो तेव्हा नुतनच्या डोळ्यांतील आसवं आपल्याच डोळ्यांतून ओघळताहेत की काय असा भास मला होतो.**

‘अल्ला मेघ, दे पानी दे, छाया दे रे तू रामा मेघ दे...” काळीज फाडून जाणारे या गाण्याचे स्वर ऐकले आणि मी या गायकाच्या प्रेमातच पडलो. ‘गाईड’ चित्रपटातलं छोटसंच; पण चित्रपट संपल्यानंतरही अंतरात एखाद्या वादळांसारखं घोंगावत राहणारं हे गाणं! या गीताचे शब्द, संगीत अन आवाज हे दुष्काळाचं असं काही भीषण चित्र उभं करतात की, हे गाणं मी जेव्हाही ऐकतो डोळ्यांत पाणी आल्याशिवाय राहत नाही. न कळत्या वयात देव आनंद यांचे मी तसे बरेच चित्रपट पाहिले, पण ‘गाईड’ हा चित्रपट माझ्या तेव्हा पाहण्यात आला जेव्हा माझी पावलं तारुण्याच्या उंबरठ्यावर नुकतीच पडली होती. औरंगाबाद चित्रकला महाविद्यालयातल्या त्या सतरंगी दिवसांना जणू सोन्याचा वर्ख चढला होता.

‘गाईड’... हा अख्खा चित्रपट जेवढा अफलातून आहे तेवढीच त्यातली गाणीही जबरदस्तय! त्यातल्या ‘अल्ला मेघ...’नं तर मला झपाटूनच टाकलं होतं. मात्र; तारुण्याच्या त्या दिवसांत गाण्यांच्या गीतकाराबद्दल वा संगीतकाराबद्दल जाणून घ्यावं एवढी सवड अन आवडही नव्हती. जसा जसा मी प्रगल्भ होत गेलो आपसूकच या गोष्टींचं महत्व कळत गेलं, त्यावर मंथनही करु लागलो. त्यानंतरही ‘गाईड’ हा तीन चार वेळेस पाहण्यात आला. तेव्हा, सचिन देव बर्मन या महान संगीतकाराबद्दल आणि गायकाबद्दल बऱ्याच गोष्टी कळाल्या.

मग काय, सचिन’दांच्या जीवनाविषयी आणखी जाणून घेण्याचं माझं कुतुहल जागं झालं. हिंदी आणि बंगाली चित्रपटसृष्टीतले असीम प्रतिभा लाभलेले, एक मशहूर संगीतकार आणि गायक होते सचिन’दा! हिंदी चित्रपटसृष्टीचे पितामहच जसे काही! त्रिपुरातील राज परिवारात ०१ ऑक्टोबर १९०६चा सचिन’दांचा जन्म. आपल्या पाच भावांमध्ये ते सर्वात धाकटे होते. त्यांची पहिली शाळा म्हणजे त्रिपुरातलं आगरतला येथील कुमार बोर्डिंग स्कूल. अत्यंत श्रीमंत आणि राज घराण्यातील व्यक्तींसाठीच हे स्कूल होतं. मॅट्रिकपर्यंतचं आपलं शिक्षण कोमिलातील जिल्हा शाळेत घेवून कोमिलालाच व्हिक्टोरिया कॉलेजमधून आय. ए. आणि बी. ए. करुन एम. ए.साठी ते कलकत्याला निघून आले.

एकोणीसशे पंचवीस आणि तीस या पाच वर्षांच्या काळात संगीतकार के.सी. देय यांच्याकडे संगीताचे धडे घेवून, पुढे सारंगी वाजवण्यात मास्टर असलेल्या भीष्मदेव चटोपाध्याय यांच्या अधिपत्याखाली सारंगी वाजवण्याचं कौशल्य त्यांनी आत्मसात केलं. मात्र एवढ्यावरच ते थांबले नाही तर, उस्ताद अल्लुद्दीन खान यांच्याकडे सरोद वादनाचं प्रशिक्षणही त्यांनी घेतलं.

संगीताच्या या अफाट विश्वात, सितारवादकाच्या रुपात त्यांनी आपलं पहिलं पाऊल ठेवलं. १९३२ला कलकत्ता रेडिओ स्टेशन येथे गायक म्हणून सचिन’दा रुजू झाले. पुढे १९३४ला अलाहाबाद युनिव्हरसिटीने दिलेलं निमंत्रण स्विकारुन अखिल भारतीय संगीत परिषदेला त्यांनी हजेरी लावली. नामांकितांच्या या संगीत परिषदेत ठुमरी गाऊन त्यांनी भल्या भल्यांचं लक्ष वेधून घेतलं. मग, त्याच्या पुढच्याच वर्षी कलकत्ता येथे भरणाऱ्या बंगाली परिषदेसाठीही त्यांना बोलावण्यात आलं. रविंद्रनाथ टागोर यांनी उदघाट्न केलेल्या या कार्यक्रमातही त्यांनी ठुमरी गाऊन सुवर्ण पदकावर आपल्या नावाची मोहोर उमटवली. पुढे कलकत्ता शहरालाच त्यांनी आपलं निवासस्थान केलं. वयाच्या अडतीसाव्या वर्षी आपलीच शिष्या असलेल्या मीरा दास गुप्ता यांच्याशी ते विवाहबद्ध झाले, आणि याच कारणामुळे राजपरिवाराच्या आपल्या वारसा हक्काला त्यांना मुकावं लागलं.

संगीतकार म्हणून ‘सती तीर्थ’ आणि ‘जननी’ या बंगाली नाटकांना त्यांनी संगीत दिलं. त्यांनी संगीत दिलेला पहिला चित्रपट (रिजगी) सुद्धा बंगालीच होता. राजपरिवारातील संबंध संपुष्ठात आल्याने त्यांच्या जीवनाला इथूनच खरी कलाटणी मिळाली. आपल्या भवितव्याचा विचार करता, फिल्मिस्तानचे शशाधर मुखर्जी यांच्या सांगण्यावरुन सचिन’दा १९४४ला मुंबईला आले ते जणू; दिवस रात्रीच्या भागदौडीत मश्गुल असलेल्या मुंबईच्या अंतरातलं संगीत जागवण्यासाठीच! उज्ज्वल भविष्यातील आपल्या स्वप्नांच्या दिशेने पडलेलं सचिन’दांचं ते पाऊल, हिंदी चित्रपटसृष्टीसाठी सुद्धा एक टर्निंग पॉईंट ठरला.




स्वातंत्र्य-संग्रामाचा तो काळ, सचिन’दांनी संगीत दिलेला पहिला हिंदी चित्रपट म्हणजे १९४७साली आलेला फिल्मिस्तानचा ‘दो भाई’! यातील गीता दत्तने गायिलेल्या, ‘मेरा सुंदर सपना बीत गया...’ या गाण्याचे गीतकार राजा मेहंदी अली खान होते. १९५०नंतर मात्र सचिन’दांच्या संगीत रचना मानाचं स्थान मिरवू लागल्या. पुढे १९५०च्याच दशकात नवकेतन प्रॉडक्शनच्या बॅनरखाली आलेल्या देव आनंदच्या ‘बाजी’ने जणू बाजीच मारली. ‘तदबीर से बिगड़ी हुयी तक़दीर बना ले...’ गीता दत्तने गायिलेल्या या लक्षवेधी गाण्याने सचिन’दांच्या मुकुटात मानाचा तुरा खोवला. गीता बालीच्या चेहऱ्याची गाण्याच्या लयीत सचिन’दांनी अशा काही नजाकतीने पेरलीये आहे की, गीता बालीचं ते रसभरं ‘हे हे हे हे..हे हे...’ अजूनही आठवत राहतं. खरं तर, साहिलने हे गाणं गझलच्या रुपात लिहिलं होतं, पण जेव्हा या गाण्याचा पाश्चिमात्य बाज साहिरने ऐकला तेव्हा तोही स्तब्धच झाला! पुढे, नवकेतनसोबत जणू सचिन’दांचा बर्मन दौरच सुरु झाला. ‘नौ दो ग्यारह’, ‘काला पानी’, ‘टॅक्सी ड्राइव्हर’ या चित्रपटातील गाणीही रसिकांना चांगलीच भावली. ‘टॅक्सी ड्राइव्हर’ चे गीतकार होते साहिर लुधियानवी.

सचिन’दा आणि देव आनंद हा मेळ पुढे चांगलाच बहरला. ‘बंबई का बाबू’, ‘तेरे घर के सामने’, ‘तीन देवियाँ’, ‘गाईड’, ‘ज्वेल थीफ़’ सचिन’दांनी संगीतबद्ध केलेले हे चित्रपट चांगलेच गाजले. ‘पेइंग गेस्ट’च्या गाण्यांनी सचिन’दांच्या लोकप्रियतेत चार चाँद तर लावलेच, शिवाय किशोर’दांच्या कारकिर्दीचा सुगंधही दाही दिशा पसरविला. ये रात ये चांदनी फिर कहाँ...’ हेमंत कुमारने स्वरबद्ध केलेलं ‘जाल’ (१९५२) चित्रपटातलं हे क्लासिक गाणं सदाबहार देव आनंदच्याच ओठी शोभलं. या गाण्याचं संगीत मला खूप आवडतं. मी स्वतः जेव्हा हे गाणं गातो तेव्हा, गिटारच्या त्या धूनमध्ये ‘उहंहू...’ ‘उहंहू...’ हा असा काही मिसळून जातो की, शब्द आणि संगीत एक होवून जातं. मनाची बांसरी सुद्धा तृप्तीच्या रसात डुब डुब डुबून घेते. सचिन’दा, गुरु दत्त आणि साहिर या त्रिमूर्तींच्या मिलाफातून उतरलेलं हे गाणं मग रात्रीच्या पिठूर चांदव्यागत अंतरात पाझरत राहतं. ‘प्यासा’ नंतर मात्र या त्रिमूर्तींच्या मेळ कधीच जुळला नाही.

एकोणीसशे साठला आलेल्या एका चित्रपटाने हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासावर आपलं नाव सुवर्णाक्षरानेच कोरलं! चित्रपट होता बिमल रॉय निर्देशित ‘सुजाता’. तरलतेचे आणि संवेदनशीलतेचे मापदंड रचणारा हा चित्रपट सचिन’दांच्या संगीत प्रतिभेचा जणू कळस आहे. त्यातलं तलत यांनी गायलेलं हे गाणं मी आजही ऐकतो तेव्हा नुतनच्या डोळ्यांतील आसवं आपल्याच डोळ्यांतून ओघळताहेत की काय असा भास मला होतो. मजरूह साहेबांच्या तरल शब्दांइतकंच हळुवार असं संगीत आणि त्यावर तलतचे कोमल स्वर...

‘दिल में रख लेना इसे, हाथों से ये छुटे ना कहीं
गीत नाजुक है मेरा, शीशे से भी टूटे ना कहीं...’

व्वा! शब्द आणि संगीत... अमृतारसासारखं मनात कसं घोळत राहतं! सचिन’दांच्या संगीताची जादूच अशी काही अवीट आहे की, हॅटस ऑफ त्या दिग्गज व्यक्तिमत्वाला! ‘जलते है जिसके लिये...’ या गाण्यालाच नाही तर ‘सुजाता’ या चित्रपटाला अजरामर करण्यात बिमल रॉय इतकंच, नुतन आणि सुनील दत्तचंही तेवढंच योगदान होतं हे विसरुन चालणार नाही.

‘प्यासा’, ‘बंदिनी’, ‘कागज़ के फूल’, ‘देवदास’, (दिलीप कुमार) ‘अभिमान’, ‘नया जमाना’, ‘चुपके चुपके’, ‘प्रेम पुजारी’, ‘शर्मिली’, ‘अनुराग’ सचिन’दांनी संगीतबद्ध केलेल्या चित्रपटांची यादी तशी मोठठीचंय! ते एक अनुठे संगीतकारच नाही तर महान गायकही होते. लोकगीतांची परंपरा जपण्यात त्यांचं महत्वपूर्ण योगदान होतं. लोकवाद्यांचा सुंदर-सुरीला मेळ जमवून आणण्यात ते माहिर होते. त्यांनी गायिलेली आणि त्यांनीच संगीतबद्ध केलेली काही लोकप्रिय गाणी - ‘वहाँ कौन है तेरा...’, ओ रे माझी...’, ‘सफल होगी तेरी अराधना...’, ‘आराधना’ चित्रपटातल्या या गाण्याला, सर्वक्षेष्ठ पुरुष गायकाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. बंगाली आणि हिंदी मिळून जवळ जवळ शंभर पेक्षा जास्त चित्रपटांना सचिन’दांनी संगीत दिलेलं होतं.

हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रभावी व्यक्तिमत्वापैकी एक होते सचिन’दा! त्यांचा मुलगा, राहुल देव बर्मन (आर डी.) हाही एक प्रसिद्ध संगीतकार होता. असं म्हणतात की, सचिन’दा जरा काटकसरीच होते. त्यांना पान खायचा खूप शौक होता, आणि त्यांचं ते आवडतं पान मिळायचं भारतीय विद्या भवन चौपाटी येथे. फुटबॉलचा खेळ सुद्धा त्यांना इतका आवडायचा की, त्यांची आवडती टीम कधी चुकून हरलीच, तर त्या दिवशी ते आनंदाचं गाणं गावू नाही शकायचे. त्यांची निष्ठा त्यांच्या तल्लीनतेशी अतिशय सच्ची आणि प्रामाणिक होती.

काही कारणाने लता मंगेशकरच्या प्रभावातून सचिन’दा पुढे बाहेर पडले. त्यांनी अशा भोसले, किशोर’दा आणि मजरूह सुलतानपुरी यांच्यासोबत काम सुरु केले. या टीमने पुढे कितीतरी लोकप्रिय युगलगीतांचा नजराणाच चाहत्यांना दिला. ‘चलती का नाम गाड़ी’ची सगळीच गाणी हिट झाली होती. अशा भोसले यांना लोकप्रिय करण्यात ओ. पी. इतकाच सचिन’दांचाही हात होता.

सचिन’दा हे एकमेव असे संगीत दिग्दर्शक होते ज्यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार (सुजातासाठी) मिळाला होता. १९६०नंतर मात्र त्यांच्या तब्बेतीच्या तक्रारी वाढल्या अन त्यांच्या कारकिर्दीला जशी काही नजरच लागली. आर.डीं.च्या ‘छोटे नवाब’ या चित्रपटातील गाण्याच्या निमित्ताने सचिन’दा आणि लताजी पुन्हा एकत्र आले होते.

सचिन’दांना मिळालेल्या पुरस्कारांची यादी तशी बरीच मोठीये. संगीत नाटक अकादमीच्या पुरस्काराशिवाय, बंगाल ऑल इंडिया म्युझिक कॉन्फरन्स, कोलकत्ता इथलं गोल्डमेडल, आशिया फिल्म सोसायटी, संत हरिदास, दोन वेळेस नॅशनल फिल्म - एक संगीतकार आणि दुसरं गीतकार म्हणून, बेस्ट म्युझिक डायरेक्टर म्हणून फिल्मफेअरचे दोन पुरस्कार, भारत सरकारतर्फे १९६९ला पद्मश्री पुरस्कार! खरं तर, पंचवीस, तीस पानं सहज लिहिली जातील असं सचिन’दांचं व्यक्तिमत्व, त्या व्यक्तिमत्वाला मी चार पानांमध्ये कितीसा न्याय देवू शकेल? ऋषितुल्य असं हे व्यक्तिमत्व ३१ ऑगस्ट १९७५ला आम्हा चाहत्यांना नेहमीसाठी सोडून गेलं. संगीतकार म्हणून तर ते ग्रेट होतेच पण त्यांचा आवाजही अंतरात पार खोलवर रुतणारा होता. ‘बंदिनी’ चित्रपटातलं त्यांचं


‘ओ.. ओ...
मन की किताब से तुम, मेरा नाम ही मिटा देना
गुन तो न था कोई भी, अवगुन मेरे भुला देना...’

हे गाणं; मी जेव्हा आजही ऐकतो तेव्हा चिरंजीव झालेल्या त्या आवाजात मन हरवून जातं. विधात्याने या जगातून सचिन’दांना जरा लवकरच नेलं, नाही? आता, इंद्र दरबाराची शान झालेल्या सचिन’दांना या दुनियेची आठवण करताना पाहून, इंद्रही त्यांना म्हणत असले का -

वहाँ कौन है तेरा
मुसाफ़िर जायेगा कहाँ...’

**संदर्भ : विकिपिडीया, यु-ट्युब.**

## मला भावलेली सिनेरत्न



मनोहर मंडवाले, संपर्क क्र. 8879123236

# बार आणि ते लोक



सु. पुं. अढाऊकर
अकोला

आधुनिक केसरी

**दारू, मदीरा म्हणजे पुरूषाला झिंग आणणारं द्रव्य पदार्थ. काही स्त्रिया अत्यल्प प्रमाणात अपवादीत आहेत. थकवा, ताण, दुःखात तसेच आनंदात सुध्दा मनाची अगतिकता, घालमेल कमी करण्यासाठी दारू पिल्या जाते. दारूचे गावठी, मोहाची दारूपासूनं ते थेट स्कॉचपर्यंत विविध प्रकार आहे. जसे मोहाची, ताळाची, देशी, बिअर, वाईन, व्हिस्की, स्कॉच. चला तर आपण आता मूळ कथेकडे वळू.**

गुत्था, बार, डान्सबार, ठिय्या, अड्डा, संगीत अश्या विविध नावाने हे ठिकाण ओळखल्या जाते. माझा तसा ह्या ठिकाणी जाण्याचा एकदा योग जुळून आला. योगच म्हणावं लागेल. कारण मी कधी पीत नाही. सहकारी मित्राचा वाढदिवस होता. सर्व कलिगनी बारमध्ये जावून पिवून जेवण करण्याचा बेत आखला. सायंकाळी सहा तीसला ऑफिस सुटलं कुणी मोटारसायकलीवर तर कुणी मोटारकारने ठरलेल्या ठिकाणी नवी मुंबईतील वाशी ठिकाणचा चिराग नामक बारमध्ये पोहचले. सायंकाळचे साधारणतः सात वाजले होते. एखाद्या शहरात एखादा नवखा व्यक्ती एकटा येतो तसे माझे झाले होते. सर्वजण टेबलावर हात धूवून बसले. नेहमी पीत असलेल्या धनंजयने वेटरला ऑर्डर दिली. व्हिस्की, रम व स्कॉच, साध-थंड बाटलीबंद पाणी, स्नॅक्स इत्यादी इत्यादी. तद्नंतर चकचकीत सहा काचाचे ग्लास टेबलवर आले. बाटलीच्या बुळाला तळहात मारला गेला. थर्टी, फोर्टी फाय, सीक्सटी एम एल दारू पिणाऱ्यांच्या म्हणण्यानुसार ग्लासात ओतल्या गेली. पाणी, सोडा, थम्सअप, लिम्का, रेडबूल आपापल्या आवडीनुसार वतण्यात आलं. माझी दारू पिण्याची पहिलीच वेळ होती. चव कशी असेल, चक्कर येईल काय? घरची मंडळी काय म्हणेल अश्या बऱ्याच विचारांनी मनात पिंगा घातला होता. सर्व सहकाऱ्यानी भरलेले ग्लास हातात घेतले आणि ग्लासावर ग्लास आदळत ‘चिअर्स’ शब्द उद्गारून ग्लास तोंडाला लावले. मी ही तसेच केले पण् फक्त ग्लासाचे काठ ओठाला लावले नि न पिताच ग्लास टेबलावर ठेवला ओठसुध्दा भिजला नव्हता.

माझी नजर आजूबाजूला गेली. मंद दिव्याच्या प्रकाशात लोकं दारू पिताना मला दिसले. आपापल्या तंद्रीत गुंग असलेले लोकं. माझ्या डावीकडे मी पाहिले. संपूर्ण टेबलवर एकटाच व्यक्ती होता. दारूचा एक घोट पिवूनं चकलीचा टुकडा हिरव्या चटनीच्या वाटीत बुडवून मिटक्या मारत खात होता. कुठल्यातरी मोठ्या संकटात असल्यासारखा तो वाटत होता. तो एक घोट पिल्यावर मोबाईलमधे बघत होता आणि मोबाईल आपटत होता. तर शर्टाच्या अस्तीनीने डोळ्यातील अश्रू पुसत होता. कुठले संकट असेल याला. कशासाठी हा तरूण मुलगा दारू पितोय. बहुतेक पोरीचं किंवा नोकरीचं टेंशन असेल असा मी विचार करीत होतो.



तितक्यात अजयने मला दंडाला हलवत म्हटले.
“ काय आनंदराव कशी वाटली ही नवखी दुनिया. माझ्या माहितीप्रमाणे तू पहिल्यांदाच आला असावा इथे.”
मी जरासा मिशीत ओठ विस्फारत हसलो.
“ हो रे. धिस इज ए माय फस्ट टाईम.”
आणि परत मी नजर उजवीकडे फिरवली. एक म्हतारा अंदाजे वय साधारणपणे साठी पूर्ण केलेला असेलं. दोन ऊकडलेली अंडी, मॅक्डॉलचे एक क्वाटर,कांदा, निंबू, काकडी, गाजर आणि शेंदे मिठाची त्याने वेटरला ऑर्डर दिली. वेटर म्हाताऱ्यापुढे अंत्यत अदबीने ऊभा राहूनं सर्व काही सांगीतलेल्या वस्तू नोटडाऊन करीत होता. सर्व काही सांगीतल्याप्रमाणे आणण्यात आले. म्हातारा बहुतेक शासकीय नोकरीतून सेवानिवृत्त झालेला असेल असा अंदाज मी बांधला. अंत्यत खुश असा दिसत होता. मी विचार करायला लागलो. मुलाबाळांचे लग्न झाले असतील. रोजरोजच्या बॉसच्या कटकटीतून सुटकारा झाला असेल. मस्त दणकट पेंशन मिळत असेल. अवघ्या दहा मिनीटात पिण्याचा कार्यक्रम अटपूनं म्हातारा चालता झाला.

मग मी माझी समोरच्या टेबलावर नजर गेली. दोघेजण बसले होते. एकमेकांशी थट्टा मस्करी करत करत स्कॉच पीत होते. एक अंत्यत हळूवार बोलत होता तर दुसरा बोलताना झिंगत मोठ्याने बोलत होता. दोघे मित्र वाटत नव्हते. कारण दोघही एकमेकांशी शब्द राखून बोलत होते. एकजण पॅकवर पॅक मारत होता तर दुसरा थोडासा घोट खूप वेळ थांबून पीत होता. न पिणारा पिणाऱ्याचा काही तरी घातपात नक्की करेल असे मला वाटत होते. कारण पोलिस टाईम्समध्ये वाचलेल्या सत्य घटनांचा प्रत्यय वारंवार येत होता.

आमची सहकारी मंडळी यांचे दोन दोन पॅक झाले होते. माझ्या माहितीप्रमाणे अवघ्या सात मिनीटात दारू चढते. आमच्या टेबलावरील आवाज वाढायला लागले. धनंजय, विजय, रवी, जगन्नाथ यांच्या बोलण्याचा ट्यूनिंग वाढला. अडखळत थांबून नी काही शब्द गिळून ते बोलायला लागले. मग वेटरला विजयने चिकन लॉलीपॉप, व्हेज स्क्रीस्पी, आलू तंदूरी, पनीर पकोडा, पनीर सेजवान डर्या, पनीर चिज पकोडा, फ्राय पॉपलेट, मसाला बांगडा अश्या विविध पदार्थांची ऑर्डर दिली.

माझ्याही मनात आले चला एक घोट आज घेऊनचं बघू. एक घोट घेतला. रॉयल स्टॅग व्हिस्की होती पाण्यातील. अंत्यत कडवट होती. एक घोट पिवूनं मी लगेच खारे बेदाने तोंडात टाकले. बरे वाटले. बार मधील कोंदट वातावरणानेच मला झिंग यायला लागली होती.

मग माझी नजर एका दुरवरच्या टेबलावर गेली. दोन व्यक्ती अक्षरशः हैदोस घालत होते. वेटर आणि मॅनेजर सोबत हुज्जत घालत हुल देत होते. कारण होते. बिअर जास्त थंड नसल्यामुळे. दाढी व डोक्यावरील केस वाढलेला तरूण तर अक्षरशः गलिच्छ शब्दात वेटरला शिव्या हासळत होता.
“मादरचोद, बहेनचोद, झवाळ्या साल्या बिअर गरम असते की थंडी रे. और साले ने दिखाये बगर बॉटल ओपनर से कैसे खोला. साला बैल बुध्दी. “असा तो तरूण त्या वेटरला हिंदी व मराठी मिश्रित बोलत होता. मॅनेजरचा आवाज वाढल्यावर अक्षरशः चिराग बार कुरूक्षेत्रचे रूप धारण केल्यागत वाटत होता. अहंकारी व वाचाळवीर त्या दाढीवाल्या ग्राहकाने अक्षरक्षः टेबलावरील बिअर ग्लास ऊचलले आणि फेकायला सुरूवात केली. एक ग्लास येवून माझ्या डोक्यावर आदळला. हात लावूनं बघतो तर काय रक्ताची धार. सहका-यानी पाहिले रक्त जास्तच निघत आहे. मग काय विचारता. ग्लास फेकणा-या दाढीवाल्याला सर्व सहकारी मिळून मारायला लागले. संपूर्ण चिराग मधे धावाधाव, पळा-पळा. मला विजयने नवी मुंबईस्थीत तेरणा हॉस्पिटलला नेले आणि ओला कारने घरी सोडले. घरी आल्यावर सर्व पट्टी गीट्टी पाहूनं आई, पत्नी व दोन्ही मुले रडायला लागली. तेव्हापासून मी शप्पत घेतली बार मधे कधीही जाणार नाही. आज पर्यंत मी कधीही बार मधे गेलो नाही आणि दारू

# मानवी जीवन आणि अध्यात्म यांची सहजसुंदर गुंफण



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**शारीरिक स्वास्थ्य सुद्दढ़ असले म्हणजे मनुष्य निरोगी आहे असे नाही तर शरीरासोबतच मनाचं स्वास्थ्य जपणं ही तितकेच महत्वाचे आहे, याची जाणीव करून देणारे पुस्तक म्हणजे डॉ. गौरी जोशी लिखित ‘ट्रंककॉल टू कृष्णा’. पुस्तकाच्या शीर्षकात कृष्णा हा शब्द वाचल्यानंतर वाचकांच्या मनात त्याचे सुंदर, निरागस रुप उभे राहते आणि सुरु होतो कृष्णमय प्रवास... पुस्तकाच्या लेखिका डॉ. गौरी जोशी ह्या आध्यात्मिक हिलर आहेत, ईएनटी सर्जन आहेत तसेच त्या रेकी ग्रैंडमास्टर देखील आहेत. त्या ज्योतिष शास्त्रही जाणतात, त्या ज्योतिष पंडित आहेत, त्या वास्तुशास्त्रही शिकल्या आहेत, त्या प्रसिद्ध टैरो रीडर आणि ट्रेनर ही आहेत.**

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात अस्थिरता दिसून येते. प्रपंच करण्यासाठी, अर्थासाठी मनुष्य धावपळ करतो आहे. अनेक सुख- सोयी आपल्याला उपलब्ध झाल्या आहेत. पण कुठेतरी मानसिक स्थिरता, समाधान , मनःशांती या गोष्टींचा अभाव जाणवतो. अनेक नकारात्मक गोष्टींनी मन पूर्णपणे व्यापले आहे. जीवनात अनेक गोष्टी घडत असतात, चांगल्या - वाईट इत्यादी... आणि या गोष्टींचा परिणाम थेट मनावर होत असतो. जीवनाला अर्थ देण्याचं आणि मार्गदर्शन करण्याचं काम अध्यात्म करत असते. अध्यात्म म्हणजे परमेश्वराशी संवाद साधण्याची संधी. अध्यात्म कुठल्याही ठराविक घटकांसाठी किंवा ठराविक वयातील लोकांसाठी नाही तर संपूर्ण मानवजातीसाठी आहे.


सर्व सुख - सोयी जवळ असूनही काही व्यक्ती समाधानी नसतात , काही व्यक्तिंकडे डोक्यावर छप्पर नसुनही चेहऱ्यावर हास्य असते. ते कसे ? हा फरक असतो विचारांचा, दृष्टिकोनाचा. अडचणी तर येत राहतात पण आपण त्यांना कसे सामोरे जातो, त्यावर तुमचं सुख, आनंद अवलंबून असते. जगण्यासाठी फ़क्त अर्थ , संपत्ती महत्वाची नसते तर मनःशांती सुद्धा आवश्यक असते. हा मनःशांतीचा मार्ग अध्यात्म दाखवते.

शारीरिक स्वास्थ्य सुदृढ़ असले म्हणजे मनुष्य निरोगी आहे असे नाही तर शरीरासोबतच मनाचं स्वास्थ्य जपणं ही तितकेच महत्वाचे आहे, याची जाणीव करून देणारे पुस्तक म्हणजे डॉ. गौरी जोशी लिखित ‘ट्रंककॉल टू कृष्णा’. पुस्तकाच्या शीर्षकात कृष्णा हा शब्द वाचल्यानंतर वाचकांच्या मनात त्याचे सुंदर, निरागस रुप उभे राहते आणि सुरु होतो कृष्णमय प्रवास... पुस्तकाच्या लेखिका डॉ. गौरी जोशी ह्या आध्यात्मिक हिलर आहेत, ईएनटी सर्जन आहेत तसेच त्या रेकी ग्रैंडमास्टर देखील आहेत. त्या ज्योतिष शास्त्रही जाणतात, त्या ज्योतिष पंडित आहेत, त्या वास्तुशास्त्रही शिकल्या आहेत, त्या प्रसिद्ध टैरो रीडर आणि ट्रेनर ही आहेत. अनेक व्यक्ती त्यांच्या समस्या घेऊन किंवा लेखिकेकडे येतात तेव्हा त्यांना मार्गदर्शन करताना लेखिकेला आलेले अनुभव या पुस्तकात शब्दबद्ध केले आहेत.

आपणास माहित आहे, भगवत्गीता हा हिंदुस्थानातला अतिशय महत्त्वाचा व मानवी इतिहासातल्या ग्रंथांपैकी अतिशय तत्त्वज्ञानावर आधारलेला महत्त्वाचा संदर्भग्रंथ आहे. हा ग्रंथ संस्कृत भाषेत काव्यस्वरूपात लिहिलेला आहे. ‘महाभारत’ या महाकाव्याचा एक भाग असलेला हा ग्रंथ १८ अध्यायांचा (७०० श्लोक) आहे. हा ग्रंथ मानवाला परमोच्च ज्ञान देतो आणि जीवन कसे जगावे यांचे मार्गदर्शन करतो असे मानले जाते.कुरुक्षेत्रावर रणांगणामधे युद्धाच्या सुरुवातीला सांगितली गेलेली गीता हा श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यातला संवाद असून त्यामधे श्रीकृष्णाने अर्जुनाच्या शंकांचे निरसन केले आहे. विविध उदाहरणे आणि उपमांचा आधार घेत श्रीकृष्णाने अर्जुनाला योग आणि वेदान्त यांबद्दल मार्गदर्शन केले आहे. यामुळे हिंदू धर्मातील एक अत्यंत महत्त्वाचा मार्गदर्शकपर ग्रंथ आणि मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान सुखकर करण्याकरता उपयुक्त ठरेल असा संदर्भग्रंथ असे गीतेचे स्वरूप आहे.

‘ट्रंककॉल टू कृष्णा’ या पुस्तकात एकूण ३० लेखांचा समावेश असून भगवदगीतेतील मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान लेखिकेने अगदी सोप्या शब्दात विविध उदाहरणे, कथा याद्वारे विशद केले आहे. भगवदगीतेतील निवडक अध्याय , श्लोक, त्यांचा नेमका अर्थ सहज - सोप्या शैलीत विशद केले आहे. भगवदगीतेतील सार , त्यातील भावार्थ यांचा आणि बदलत्या जीवनशैलीमुळे जगण्याचे बदललेले संदर्भ यांची गुंफण यात अनुभवायला मिळते. या लेखात संत कबीर यांचे निवडक दोहे आणि त्यातील भाव लेखिकेने अचूक टिपला आहे.

मानवी मन हे दिसत नसले तरी त्यांचं अस्तित्व असते. मन चंचल असते. विचारांचं चक्र सतत सुरु असते. कोणताही मनुष्य परिपूर्ण नाही. प्रत्येक मनुष्यात षड्रिपुचा वास असतो. राग, लोभ, मत्सर, ईर्षा,मोह, मद, कामवासना या भावनांवर नियंत्रण ठेवून जीवन कसे व्यतीत करावे, याचा सोपा मार्ग या पुस्तकात सापडेल. कार्यालयात काम करताना असो किंवा वैवाहिक जीवनातील, नात्यांमधील समस्या असो यात येणाऱ्या अडचणी, त्यावेळी असणारी मानसिक अस्वस्थता यामुळे मानवी जीवन निरस बनत चालले आहे. नकारात्मक शक्ती वाढते आहे. विविध कारणांमुळे मनातील भीती मोठी होते आहे आणि त्यामुळे मन तणावाखाली जगू




लागले आहे. या तणावामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे.

ताण - तणाव व्यवस्थापनासाठी तसेच एकूणच निरोगी जीवनशैलीसाठी ध्यानधारणा तथा साधना करणं गरजेचं आहे. साधनेचं महत्त्व तसेच साधना कशी करावी, हेसुद्धा यात सांगितले आहे. मनातील अपेक्षा,अहंकार या भावनेतील मीपणाची भावना दूर करण्यासाठी समर्पणाची भावना मनात निर्माण होणे गरजेचे आहे. मन एका ठिकाणी स्थिर करणं कठीण असलं तरी साधनेतील सातत्याने ते शक्य आहे, हे अनेक उदाहरणाद्वारे लेखिकेने पटवून दिले आहे. मनःशांतीसाठी रोजच्या धावपळीत सहज करता येईल असा ध्यानाचा सोपा मार्ग लेखिकेने सांगितला आहे.

बदलती जीवनशैली त्यात सोशल मिडियाचा वाढता प्रभाव यामुळे मनातील नैराश्य, ताण, असुरक्षितता वाढते आहे. या भौतिक सुखाच्या मागे धावताना मानसिक सौख्य कमी होत चालले आहे, याची जाणीव करून देऊन जीवन सुकर करण्यासाठी साधना, ईश्वराप्रति प्रेमभाव, समर्पण करण्याची वृत्ती जपण्याचे सहज - सोपे निरूपण म्हणजे ‘ट्रंककॉल टू कृष्णा’ हे पुस्तक. या पुस्तकात लेखिकेने सांगितलेल्या सत्यघटना, त्यातील व्यक्ती, त्यांच्या समस्या , त्यांचे विचार आणि लेखिकेने सांगितलेला साधा - सोपा उपाय यामुळे त्या व्यक्तीच्या आयुष्यात कसे बदल घडून आले, हा प्रवास वाचताना वाचक सहप्रवासी होतो.

ह्या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांचा ट्रंककॉल श्रीकृष्णाशी जोडला जातो आणि स्वतःची स्वतःला नव्याने ओळख होते. स्व- अस्तित्वाची प्रचिती येते. साधी- सोपी शब्दरचना, ओघवती लेखनशैली आणि प्रवाही निवेदनशैली यामुळे पुस्तक वाचताना मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. भगवदगीतेतील तत्वज्ञान हे कोणत्याही काळाशी सुसंगत आहे.लेखिकेन सांगितलेले भगवदगीतेतील सार आणि त्याचा आजच्या काळातील विविध समस्यांशी असणारा संबंध विचारप्रवण आहे. मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी ही कार्यप्रणाली आपल्या दैनंदिन जीवनात अमलात आणायला हवी.

सकारात्मक आणि आनंदी जीवन जगण्यासाठी प्रेरित करणारा हा ट्रंककॉल आपण जरूर घ्यावा, आयुष्याकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन सापडेल. मानवी जीवन सुकर करणारा हा ट्रंककॉल नक्कीच परिवर्तन घडवेल !

प्रस्तुत पुस्तकाला डॉ.मोहन आगाशे यांनी मौलिक प्रस्तावना लिहिली आहे. नितीश भारद्वाज यांनी अल्प शब्दात पुस्तकाचे योग्य विवेचन केले आहे.पुस्तकाचे मुखपृष्ठ मनोज्ञा मेहेत्रे यांनी समर्पक साकारले आहे. श्रीकृष्णाने धारण केलेल्या मोरपिसामध्ये जसे विविध रंगांची आकर्षक रचना आपण पाहतो, तसेच मानवी मनाचे, वृत्तिचे विविधांगी रंग या पुस्तकात अनुभवायास मिळतील.

**(ट्रंककॉल टू कृष्णा –लेखसंग्रह / डॉ. गौरी जोशी / प्रकाशक : उद्वेली बुक्स / मूल्य : २०० रुपये )**

## ।।बहीणीची वेडी माया।।



भाऊबहीणीला लहानपण दे रे देवा।
लहानगेभाऊबहीण करायचे खुप मस्ती।।
दुनियेने कितीही रंग बदलले तरीही।
लहानपणीची खुशी खुप मस्त होती।।

नात्यामध्ये ना ईर्षा होती, ना अभिमान।
आपुलकीचे ते होते हिरवेगार रान।।
ते जणू पावसातील कागदाची होडी।
पण कायम पुढे बहीणभावाची जोडी।।

सदानकदा दादा दादा असा सूर ।
अन मग दादा सांभाळे ताईचा नूर ।।
अरे वेड्या बहीणीची वेडी माया।
म्हणे ओवाळीते तुज भाऊराया ।।

नको भाऊबीज,नको मज रक्षाबंधन।
पाठीशी राहू दे तुझ्या मायेचं गंठन।।
नको नेऊ मज दिवाळी अन दस-याला।
पण भेट मला, जसा कृष्ण भेटे द्रौपदीला।।

फिरून फिरून सय येई जीव वेडावतो।
चंद्रकळेचा ग शेव ओलाचिंब होतो।।
भावाला झाल्या लेकी मग बहीण नको पाठी।।
खोटी ठरो देवा ही एक आस मोठी।।

-वाळू रघुनाथ आहेर,
नासिक, मो. 9958782982




## ढग गाती नादब्रम्ह...



हिरव्या शालूत नटेल
धरतीचा अणूरेणू
गळा चढविता गोठ
सप्तरंगी इंद्रधनू....!!

आसमंती जलधारा
उठे जलधी तरंग
इथे शिवारी शेतात
राबे माझा पांडुरंग..!!

वखर चाले नामधातूचा
माती गातीया अभंग
नांगऱ्या झुलतो खुशीत
पहाटे भूपाळीचा संग...!!

असं नशीब उजळावं
दारी सोनियाची रास
दशदाने भोगताना
ओठी मोतीयाचा घास..!!

वारा फुंकतोय पावा
स्वर निघे सा-रे-ग-म
झाडे वाजविती टाळ
ढग गाती नादब्रम्ह...!!

-रज्जाक शेख ,
श्रीरामपूर अहमदनगर
मो. 9665778558

## नोटा बंदी

नोटा बंदी झाली ...
काहींची चांदी झाली..
निवडणुकीची नांदी झाली..

कावळा बसल्यावर
मोडणारी फांदी झाली..

अर्ध्यापेक्षा जास्त जनता
अंधी झाली....
फुकटचे रेशनने मिंधी झाली..

पंधरा लाख खात्यावर
येण्याची नजरबंदी झाली

आहो फक्त विरोध करणारांची
नसबंदी झाली
देशात कुठं नोटबंदी झाली

-अॅड. नितीन पोळ
मो. 9860733420





परब्रह्म शोभे
सावळ्या रुपात
तीर्थ पंढरीत
विराजित ।

पाहता विठ्ठल
लोभ वाटे मनी
त्रेलोक्याचा धनी
विटेवरी ।

विठु माय बाप
पंढरी माहेर
मायेचा पदर
चंद्रभागा ।

अद्वैताचे रूप
प्रकटले आज
वैकुंठाचा साज
श्री विठ्ठल ।

बलराज संघई...




## अवकाळी



हल्ली कधीही येते टिपटिप पावसाची
अवकाळी उग्र होते झिमझिम पावसाची

यावे खुशाल त्याने शेतात उगवणीला
मग सर्वांना आवडते रिमझिम पावसाची

उन्हाळ्यात हिवाळा नि हिवाळी पावसाळा
मना असह्य होते गिचमिड पावसाची

बरसावे रात्रभर वरून धो धो उजाडणी
दिवसा नकोच आम्हां चिकचिक पावसाची

कांदा,तुरी,गव्हाची आली रे पिके सुगीला
नुकसानदायी ठरते रिपरिप पावसाची

बिघडवून टाकले ते वक्र कालचक्र मानवाने
का झोप मोडता हो निपचित पावसाची

-रज्जाक शेख श्रीरामपूर, मो. 9665778558

## मग तेथे कर माझे जुळती।



रंजल्या गांजलेल्यांना ,पददलितांना आपलंसं करा
दीनदुबळ्यांना ,पतितपावनांना मदत करा
मग तेथे कर माझे जुळती।।१।।

अनाथांना,अपंगांना,पोरके झालेल्यांना
वाटेच्या वाटसरूला मायेची पाखर द्या ना
मग तेथे कर माझे जुळती।।२।।

ऊन वारा पावसाला मात देणारे तरूण हवे
कष्टकरी श्रमिकांच्या कष्टाचे मोल व्हावे
मग तेथे कर माझे जुळती।।३।।

खुप शिकावे, काम करावे नाव कमवावे
परस्पर मैत्री अन सत्कर्म करावे
मग तेथे कर माझे जुळती।।४।।

दुष्टांचे मतपरिवर्तनाने सुख वाढावे
पापी लोकांचे अज्ञान दुर व्हावे
मग तेथे कर माझे जुळती।।५।।

संतसज्जनांचा, गुणी जनांचा सत्संग करा
प्राणीमात्राच्या मंगल इच्छा पुरी करा
मग तेथे कर माझे जुळती।।६।।

-वाळू रघुनाथ आहेर,
नासिक, मो. ९९५८७८२९८२



लय भारी **सुगरण**

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345



# पंचामृताची धपाटी

शरदातील शितल चांदण्यांचा हवाहवासा वाटणारा गारवा. ती मामा-मामींच्या सहवासात असते. लाड, काळजी करणारा मामा, प्रेमाने, आग्रहाने खाऊ घालणारी मामी. अजून काय आजोळचे सुख ! आजोळच्या नात्याची खुपच श्रीमंती अनुभवली. मनात भरभरुन साठवली. प्रेमळ, मायाळू वेळप्रसंगी कठोर अशी मऊशार घट्टविणीची न गुंतणारी रेशमीलड !! मामा, मामी, भावंड यांनी गच्च भरलेले उत्पात गल्लीतले घर !

आमच्या मोठ्या काकू, सासुबाई नेहमी म्हणायच्या माहेर, आई, मामा हे शब्द म्हणताना आपण श्वास आत घेतो. आतड्याची आणी कातड्याची माणसे ! गमतीचा भाग तसे दोन्ही बाबतीत मी नशिबवान ! दोन्ही कडची सासरमाहेरची माणसे मायाळू प्रेमळ. आई आणि बाबांकडच्या नात्यात भरगच्च श्रीमंती चार मामा, चार मामी. पाच मामे बहीणी, पाच मामेभाऊ. बाबांकडे तर सख्खे चुलत मिळून एकवीस काका आणि सोळा आत्या. आणि सासरी एका छताखाली तीस जण एकत्र शिवाय मदतनीस माणसं मिळून पाच ते सात जण! असो नमनाला घडाभर तेल! सांगायचं कारण आजोळ आणि सासर एकाच गावात! लग्नाला कारणीभूत मामाच!

आजोळी खेळ, भांडण, ऐकमेकांची, गमतीजमती गुपीते, आठवणींचा खजिना म्हणजे गच्ची ! संध्याकाळ झाली की आम्हा भावंडांचा मुक्काम गच्चीत ! आता सारखे खाण्याचे चोचले नव्हते ! दाण्याची चटणी त्यावर तेल कधी तूप कधी दही, कारळाची चटणी, लावलेला चिवडा जोडीला कांदा, लोणचे पोळी, काहीही चटकन संपायचे ते भरल्या पोटी आनंदाने, हवेहवेसे. याची सर आजकालच्या पिझ्झा, बर्गर, मगी, पास्ता, नुडल्सला अजिबातच नाही.




आजोळ समृद्धीने नटलेले, म्हणजे सुखाचं झाड आहे. कल्पतरूच म्हणा ना !, प्रेमाचा जिव्हाळा अखंड देणारा वाहता झरा आहे. मायेची ऊब देणारे आजी-आजोबा मला मात्र या आजी-आजोबांचा सहवास मिळाला नाही पण ती कसर भरुन काढणारे व लाड करणारे मामा-मामी आणि मावशी, त्यांची मुलं यांनी बहरलेलं माझे आजोळ, पंढरपूर. श्रीमंती थाट, गाडी, बंगला ह्यात सुख आहेच पण मनाची श्रीमंती. भावंडाचे प्रेम अनुभवलेली आमची पिढी नात्याने अधिक श्रीमंतीत घनाढ्य आहे हे वेगळे सांगायला नको.

एक तीळ वाटून खाणारी भावंड बरणीतून खाली सांडलेल्या मोहरी सारखी विखुरली असलो तरी मनाच्या खोलवर कप्प्यात अजून एकत्रच आहोत. आठवणींच्या कप्प्यातला सगळ्या मामींचा हातखंडा असलेला पदार्थ "पंचामृताची धपाटी". घ्या लिहून साहित्य आणि कृती.

**"पंचामृताची धपाटी**

**साहित्य :** दोन वाट्या ज्वारीचे पीठ, अर्धी वाटी कणिक, अर्धी वाटी बेसन पीठ, पाववाटी दूध, पाववाटी दही, दोन चमचे साखर, दोन चमचे तूप, दोन चमचे मध ह्याचे एकत्र करुन "पंचामृत" तयार करुन घ्या. हिंग, हळद, लाल तिखट, ओवा, मीठ, जिरेपूड, धणेपुड, कोथिंबीरीच्या काड्या, बारिक चिरलेली कोथिंबीर, दोन चमचे तीळ इत्यादी.

**कृती :** परातीत सर्व पीठ घ्या त्यात हिंग, हळद, मीठ, जिरेपुड, धणेपुड घाला. तयार केलेले पंचामृत घाला. मिक्सरमध्ये लसुण पाकळ्या, कोथिंबीरीच्या काड्या, आल्याचा तुकडा, किसुन घेतलेल्या कांद्या यांचे वाटण करुन पिठात घालून घ्या, त्यात तीळ घाला. भाकरीसारखे थापुन घ्या, तव्यावर दोन्ही बाजुनी तेल लावुन भाजुन घ्या. दाण्याची चटणी, ठेचा, दह्याबरोबर खा. बघा चव नक्की आवडेल.

# प्रवास एका नावारुपास आलेल्या शाळेचा



श्रीमती प्रतिभा सुभाष नवले
जि. प. प्राथ. शाळा,
जि : सोलापूर
मो. नं:-७२७६४२४४३०

आधुनिक केसरी

**दोन वस्त्यांच्या मध्ये वसलेली शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित असलेली शाळा म्हणजे केदार वस्ती शाळा. १९ मे २०१८ रोजी अशा ठिकाणी माझी बदली झाली. मुख्य रस्त्यापासून फक्त 50 फूट अंतरावर असणारी शाळा परंतु, काटेरी झाडांच्या जंगलात झाकलेली, रस्त्यावरून सहजासहजी न दिसणारी, शाळेसमोर एखाद्या मोठ्या तळ्याप्रमाणे खड्डा, दोन वर्ग खोल्या परंतु, एका खोलीचा स्लॅप धोकादायक झाल्याने ती वर्गखोली कायमची बंद, चालू वर्गखोली व पडवी यांच्या फरशांमध्येही भेगा, जुनाट रंगकाम अशी स्थिती असलेल्या या शाळेत मी हजर झाले. पूर्वी माढ्यातील मोठ्या शाळेत काम केल्यामुळे गजबजलेल्या वातावरणातून अगदी निरसपणा स्वीकारताना दहा-पंधरा दिवस मीही गोंधळून गेले. परंतु मुलांच्या केविलवाण्या , अपेक्षित नजरा मला खुणावू लागल्या मी माझ्या मनाशी निश्चय केला की आपण यामध्ये बदल घडवून आणायचा..... आणि त्यातूनच आमच्या शाळेचा प्रवास सुरू झाला.**

सुरुवातीला पत्र्याचे किचन सेड आणि झाडाखालची शाळा हीच माझी वर्गखोली. शाळेसमोर असणाऱ्या समस्या जाणवायला आणि सोडवायला पालकाची खूपच उदासीनता दिसून येत होती. कोणीही पालक शाळेकडे अजिबात फिरकत नव्हता. पालकांना शाळेविषयी आपलेपणा व ओढ निर्माण झालीच पाहिजे त्याशिवाय आपला प्रश्न सुटणार नाही याची पूर्णतः जाणीव मला होतीच. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्ता विकासासाठी विविध कल्पक आणि नाविन्यपूर्ण अशा उपक्रमांचे आयोजन केले त्यातून विद्यार्थ्यांमध्ये घडणारा गुणात्मक बदल पालकांच्या लक्षात येऊ लागला. मुलांच्या शैक्षणिक प्रगती बाबत पालकांमध्ये आपापसात चर्चा घडू लागली. आपली मुले चांगली शिकू शकतील असा आत्मविश्वास पालकांच्या मनातही येऊ लागला.अन्..... हळूहळू सहज पालक, माता- पालक शाळेकडे आपली पावले वळवू लागली. मुलांच्या प्रगतीवर चर्चा करत-करत मी शाळेच्या समस्या ही सांगायला सुरुवात केली. प्रथम धोकादायक वर्ग खोली दुरुस्ती विषयी पालकांना सहकार्य मागितले. पालकही सहकार्यास आनंदाने तयार झाले. शासकीय अनुदान व पालकांनी लोकवर्गणीतून ३०,०००/-रुपये जमा करून वर्गखोलीचे स्लॅब काढून पत्रा टाकला आता मुले पक्क्या इमारतीत बसून शिकू लागली. शाळेसमोर तलावासारखा असणारा मोठा नैसर्गिक खड्डा, सोबत काटेरी झुडपांची गर्दी यांना हटवण्यासाठी पालकांनी श्रमदान व अर्थ दान दोन्हीही केले. अन्.... मुलांना खेळायला लहानच पण, सुंदर मैदान तयार झाले. इमारत आणि मैदान तयार तर झाले पण आता यांना सुशोभीत करण्याचे मोठे आव्हान आमच्यासमोर हात जोडून उभे होते. हीच गोष्ट पालकांच्याही लक्षात येत होती. पालक ,शिक्षक, माजी विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्यातून शाळेला आकर्षक अशी रंगरंगोटी करण्यात आली. यासाठी जवळजवळ ४७,०००/-रु खर्च झाला. हळूहळू गुणवत्तेचं रोपटही आकार घेऊन फुलं लागलं. मंथन, आय टी एस, एटीएस, ऑलिंपियाड यांसारख्या स्पर्धा परीक्षेत तब्बल 17 विद्यार्थ्यांनी यश मिळवले. तसेच जिल्हास्तरावरून घेण्यात येणाऱ्या व्यक्तिमत्व विकास स्पर्धा, टॅलेंट हंट स्पर्धा, थँक्स टू टीचर, किशोरी मेळावे यामध्ये शिक्षक, विद्यार्थी यांनाही यश मिळत गेले. विद्यार्थ्यांबरोबरच पालकांमध्येही



उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. माढ्यासारखे शहर जवळ असतानाही आमच्या छोट्याश्या वस्तीशाळेकडे सर्वांचे लक्ष जाऊ लागले. शाळेत अधिकारी येऊन भेटी देऊ लागले. लोकसहभागातून दोन संगणक, भारत फोर्स कंपनीकडून स्मार्ट टीव्ही, जिल्हा परिषदे कडून एक स्मार्ट टीव्ही असे ई लर्निंग साहित्यही उपलब्ध झाले. पण यासाठी आवश्यक विद्युत कनेक्शन शाळेत नव्हते. सर्वांच्या प्रयत्नातून जिल्हा परिषदेकडून विज कनेक्शन मिळाले तर पालकांनी लोकवर्गणीतून लाईट फिटिंग करून दिली. शाळे शेजारील शेतकऱ्याने पाण्याची देखील सोय करून दिली. त्यामुळे शाळेत लहानशी परसबाग फुलली अशा पद्धतीने शाळेचे बदललेले रुपडे पाहून शाळा ही एखाद्या निसर्गरम्य प्रेक्षणीय स्थळासारखी भासू लागली. गुणवत्ता वाढीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांबरोबरच मुलांना सुसंस्कारक्षम, स्वावलंबी घडवण्यासाठी ही विविध उपक्रमांचे सातत्य चालू आहे.

मान. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी साहेब व शिक्षणाधिकारी मान. किरण लोहार साहेब यांच्या संकल्पनेतील “दशसूत्री कार्यक्रमाची” अंमलबजावणी प्रभावीपणे चालू आहे. त्यामध्ये मुलांना संस्कारक्षम घडविण्यासाठी राबवलेल्या उपक्रमांतर्गत घडलेल्या घटनेची बातमी जिल्हास्तरावर प्रसिद्ध झाली आहे .त्यामुळे जिल्हाभर शाळेचे कौतुक केले गेले. ही शाळा-'स्वच्छ शाळा -सुंदर शाळा', उपक्रमशील शाळा, आदर्शवत शाळा बनवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ,पालक वर्ग यांचे या शाळेच्या प्रवासामध्ये अनमोल असे सहकार्य लाभले. त्यामुळेच ही शाळा एक आदर्श शाळा म्हणून सर्वांच्या नजरेसमोर ताठ मानेने उभी असलेली पहावयास मिळते. म्हणूनच म्हणावेसे वाटते की, “माझी शाळा -माझा अभिमान”

# नवे वृध्दाश्रम.... नवी यातनाकेंद्रे

आधुनिक केसरी

**ज्यांनी आयुष्यभर खस्ता खाऊन, ओढग्रस्तीने संसार करत स्वत:च्या मुलाबाळांना वाढवलं आहे... मोठं करुन स्वत:च्या पायावर उभं केलं आहे अशांच्या अनेक मुलांनी अत्यंत हुशारीने वागून त्यांना वृध्दाश्रमाचा रस्ता दाखवला नाहीये, पण स्वत:च्या मुलांच्या जबाबदाऱ्या म्हाताऱ्यांच्या अंगावर टाकून त्यांचा अनेकवेळा गैरफायदा घेतला आहे आणि घरातच नवे वृध्दाश्रम काढले आहेत. सोनेरी पिंजऱ्यात आईबापांना बंद करुन टाकले आहे आणि हक्काचे बिनपगारी नोकर बनवले आहेत....**

आसपास घडणाऱ्या काही घटना बघितल्या की अक्षरशः अंगावर काटा उभा रहातो. माझ्या माहितीतील कित्येक मुलांनी म्हाताऱ्यांच्या वात्सल्याचा आणि प्रेमाचा गैरफायदा घेऊन, त्यांना Taken for granted धरुन स्वतःची मुले त्यांच्या जबाबदारीवर टाकून स्वतःच्या करिअरकडे लक्ष दिले आहे. साधारणतः साठी पासष्ठीनंतर मनुष्य मग तो स्त्री असो की पुरुष इतक्या वर्षाच्या संघर्षाला थकलेला असतो, कंटाळलेला असतो, वैतागलेला असतो....मुले मोठी झालेली असतात, त्यांचे संसार सुरु झालेले असतात. अशावेळी या संध्याछायेच्या कातरवेळी त्याला स्वतःसाठी थोडा वेळ हवा असतो, विश्रांती हवी असते...पण नकळतपणे आणि अलगदपणे नातवंडांच्या जबाबदाऱ्या पुनश्च अंगावर येऊन पडतात आणि तो पुन्हा गुरफटला जातो....

म्हाताऱ्या अजीआजोबांना नातवंडांबद्दल अपार प्रेम आणि माया असते, नाही असं नाही. पण वयोमानामुळे, थकलेल्या शरीराने त्यांना रोज नातवंडांना न्हाऊमाखू घालणं, जेवण देणं, त्यांच्या उत्स्तवाऱ्या करणं, त्यांना हवं नको ते पहाणं हे शक्य होईलच असं नाही. पण मुलांच्या इमोशनल ब्लॅकमेल खाली दबून जाऊन त्यांना हे स्विकारणं भागच होऊन जातं, तोंडा दाबून बुक्क्यांचा मार होतो. सेटल झालेला बिझी मुलगा, बक्कळ पगाराची सुनबाई यांना करिअरमधुन वेळ नसतो, मग आपल्या नातवंडांचं कसं होणार? डे-केअरमध्ये त्यांची देखभाल कोण आणि कशी करेल? दिवसभराची मोलकरीण ठेवली तर ती मायेने करेल का? असे अनेक प्रश्न म्हाताऱ्यांनाच पडतात आणि त्याभरात त्यांना स्वतःला न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या स्विकाराव्या लागतात.....

एकदा जबाबदारी स्विकारली की मग स्वतःचं आरामाचं वैयक्तिक आयुष्य नातवंडांच्या दावणीला बांधलं जातं...लफ्फेदार ड्रेस घालून सुनबाई कार घेऊन कामाला गेल्या की नातवाला किंवा नातीला ब्रेकफास्ट बनवून देणे, त्याचा डबा भरुन देणे, त्याला स्कूलबसपर्यंत सोडायला जाणं इथपासुन ते दुपारी आडनिड्या वेळेला नातू किंवा नात शाळेतून परत आली की स्वतःची वामकुक्षी टाळून त्याला आंघोळ घालणे, जेवायला देणे, झोपवणे ही कामं करावी लागतात..

नातवंडांची इतकी प्रचंड काळजी घेऊनही जरा कुठे काही कमीजास्त झालं किंवा त्याची तब्येत बिघडली की..."लक्ष कुठे असतं हो तुमचं?" किंवा “तुमच्याच आईने काहीतरी खाऊ घातलं असेल माझ्या पोराला...” असे खडे बोलही ऐकावे लागतात म्हाताऱ्यांना...

कधीकधी तर संध्याकाळी सुन किंवा मुलगा आला की स्वतःचा लॅपटॉप उघडून बसतात आणि मग



कधीकधी रात्रीच्या जेवणाचंही सासुबाईंनाच बघावं लागतं....सुन असते हाय-क्वालिफाईड...त्यामूळे तिला बोलून चालणार नसतं...एखादा शब्द जर कमीजास्त झाला तर स्वतःचाच मुलगा डोळे वटारुन बघू लागतो....वर वर छान दिसणाऱ्या आयुष्यांचे हे असले सोनेरी बंदिस्त वृध्दाश्रम आता जागोजागी दिसायला लागले आहेत...इथे सर्व सुखे हात जोडून उभी आहेत पण विश्रांती नाही, जबाबदाऱ्या संपलेल्या नाहीत, थकलेल्या शरीराला आराम नाही. अमेरिकेत मुलाकडे कौतुकाने गेलेले आईबाप चार महिन्यांनी उतरलेल्या चेहऱ्याने एअरपोर्टवर आलेले मी स्वतः बघितले आहेत. कालपरवापर्यंत मुलाच्या अमेरिकन नोकरीचं कौतुक करणारे काकाकाकू यानंतर पुन्हा अमेरिकेला जायचं नावही घेत नाहीत त्यामागे हीच कारणं आहेत.

तुम्हाला मुलंबाळं जन्माला घालून जर त्यांचं करणं झेपत नसेल तर एकतर नोकरीचा राजीनामा देऊन घरी बसा किंवा हृदयावर दगड ठेऊन मुलांना डे-केअर सेंटरवर ठेवा की....तुमचं करिअर हेच जर तुम्हाला अतिशय महत्वाचे असेल तर मुलंच जन्माला घालु नका हे बेस्ट नाही का?...आपण जन्माला घातलेल्या मुलांची काळजी आपल्याच म्हाताऱ्या आईबापांवर सोपवून स्वतः करिअरच्या नावाखाली नामानिराळे राहिलेल्या सुनामुलांची मला अक्षरशः कमाल वाटते. हे नवे “बंदिस्त सोनेरी वृध्दाश्रम” आता साठीसत्तरीच्या वयातील वृध्दांसाठी यातनाकेंद्रे बनली आहेत असं माझं स्पष्ट मत आहे. आणि यातील दुर्दैव म्हणजे या वृध्दांचा होत असलेला कोंडमारा हा असह्य असला तरी त्याची घनता किंवा तीव्रता ही शब्दात व्यक्त करता येत नाही हा सर्वात मोठा त्रास आहे....!!!

सचिन मधुकर परांजपे

# मुलांवर बोलू काही....!

आधुनिक केसरी

पालक म्हणून मुलांचं संगोपन करताना आपण त्याच्या भौतिक गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करतो. चांगली शाळा, चांगले क्लासेस, कपडे, शूज, दप्तर आणि त्याच्या आहाराकडे ही काळजीपूर्वक लक्ष देतो. मात्र हे सर्व करत असताना नकळतपणे आपलं त्याच्या मानसिक गरजांकडे दुर्लक्ष होत जात. मुलाच्या जन्मानंतर त्याला नेमकं वाढवायचं कसं? याबाबत त्याचे आई-वडील म्हणून आपले दृष्टिकोन परस्परपूरक आहेत की, परस्पर विरोधी आहेत हे महत्त्वाचे असत. मुल घडत असताना त्याला आधार देणाऱ्या आईला वाटतं की मूल पडूच नये, त्याला लागूच नये. मात्र वडिलांना वाटतं की, थोडं लागल्याशिवाय... पडल्याशिवाय खर्चटल्याशिवाय त्याला अनुभव कसे येणार. अगदी इतकी शूल्लक गोष्ट ही कधी कधी पालकांच्या वादाला कारणीभूत ठरते. आणि हा वाद जर मुलासमोर झाला तर अशी मुलं पुढे भविष्यात आई-वडिलांना भावनिक ब्लॅकमेल करण्याची दाट शक्यता असते. टीन एज म्हणजे भावनिक वादळांच वय.... या वयात मुलं प्रचंड आक्रमक होतात. पालकांचे ऐकत नाही. कधी कधी पालकांना उलटून बोलतात. अशा प्रसंगी मुलांना पालकांच्या भावनिक आधाराची भक्कम गरज असते. याप्रसंगी पालकांनी समस्या समजून घेत सामोपचाराने मार्ग काढला तर ठीक आहे. नाहीतर मुलाच्या अशा वर्तनाला पालक, पती-पत्नी एकमेकांना दोशी पकडतात, आणि नवीन वादाला सुरुवात होते. मुलाचे उत्तम भविष्य या विषयावर दोघांचा एकच विचार असताना फक्त त्याला घडवण्याच्या भिंन्न दृष्टिकोनामुळे या समस्या निर्माण होत असतात. मुलाचं यशस्वी करिअर ही पालक म्हणून आमचीच जबाबदारी आहे, या अविवेकी विचाराचे ते बळी असतात. याऐवजी त्याच्या यशस्वी भविष्याबाबत पालक म्हणून आपली भूमिका काही मर्यादित असते. बाह्य परिस्थिती, मुलाचा करियर कडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्याचे अंगभूत गुण वैशिष्ट्य, सामाजिक, भौगोलिक, आर्थिक अशी इतर अनेक घटक यासाठी जबाबदार असतात. या विवेकी विचाराने आपल्या अविवेकी दृष्टिकोनाची पडताळणी केली तर सुजाण पालकत्व आपल्याला चांगल्या पद्धतीने पार पाडता येईल.

ज्ञानेश्वर वाघचौरे



# आठवणीचे फूल



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

आज पुन्हा एकदा वाटते त्याच रस्त्याने चालावे, लिंब, बाभळ, कारं घाणेरी नि वाळलेल्या त्या गवतातून नि काट्यातून आठवणींचे ते फुल पुन्हा एकदा फुलावे. खर सांगायचं तर एक अनुभव शेयर करतेय. खरं तर दहा बारा वर्षापूर्वीचे हे लिखान आहे,पण का कुणास ठाऊक ती आडवी सडक पाहण्याची आजही तीव्र इच्छा होते. या रस्त्याचे चित्रं पाहिले.आणि आठवणीतले ते फुल आज पुन्हा एकदा फुलले. गावापासून जवळजवळ एक दिड किमी वर डोंगरपायथ्यालगत च आमचे एक शेत आहे. खूप लहानपणापासून आमच्या एका शेतात जायचे.प्रत्येकाच्या बालपणीच्या भ्रामक कल्पना असतात. अशीच माझीही होती.

शेतातून डोंगर दिसायचा आणि त्याच डोंगरात एकेठिकाणी माती वाहून गेल्यामुळे एक नैसर्गिक घसरगुंडी तयार झाली होती. ती मी नेहमी शेतातून पहायचे. आणि त्याच्या दोन्ही बाजूला असलेली घाणेरीच्या झाडाची फुले.आणि त्याच्यामुळे ती घसरगुंडी खूप सुंदर नि मोहक दिसायची.तिथे जायची खूप उत्सुकता असायची. पण लहान असल्यामुळे तिथे जाता येत नसे.पण थोडे मोठे झाल्यानंतर एक दिवस काका काकीसोबत शेतात गेलो होतो तेव्हा तिथून जावून आले आणि त्यादिवशीचा तो रस्ता आजही....अगदी जसाच्या तसा मनाच्या एका कोपर्‍यात... रस्त्याच्या दुतर्फा असलेले ते पूल आजूबाजूला असलेल्या काराच्या झाडांच्या जाळ्या घाणेरीची झुडपे,ते रस्त्यावरचे वेड्यावाकड्या आकारात वाळलेले गवत, ते खूप जुनं वडाचं झाड, तो ओढा, त्या भल्या मोठ्या सिमेंटच्या पाईप आणि त्याच्यावरचा तो दगडी रस्ता पश्चिम दिशेला मोठमोठाले दगड असलेला सोंजाईचा डोंगर.... पाईपमधली लपाछपी. तो भला मोठा दगडी नंदी त्या नंदीची ती ऐकीव कथा, अधेमध्ये कुठे घाणेरीची, काराची, बाभळीची, लिंबाचे ते मोठे झाड आणि त्याखालची सिमेंटची छोटी भिंत भिंतीवर बसून मी मोठी बहिण आणि तिच्या मैत्रीनीने केलेलं जेवन अशा कितीतरी आठवणी. तो ही असाच एक सुट्टीचा दिवस होता.सकाळपासून नेहमीप्रमाणे आमचा आमचा नेहमीचा झाडाखाली बसून अभ्यास खेळ आमचा उद्योग दिवसभर चालू असताना, दिवस कधी सरायला आला ते सुध्दा कळले नाही. दिवस हळूहळू कलू लागला होता, अशातच आमच्या गाईचे वासरु चरत चरत डोंगरात खूप दूरवर गेले. माझ्या बहिनीने मला तिथेच बसायला सांगितले. सर्व डोंगर अगदी शांत निस्तब्ध झाला होता. मी खूप घाबरले, माझ्या बहिणीने तिच्या मैत्रिणी ला घरी जायला सांगून माझी बहिण पश्चिम दिशेला असलेल्या 'सोंजाई'चा डोंगर त्या डोंगरात वासराला शोधायला गेली.

एक किलोमीटरच्या अंतरात असलेला घाणेरी कारांच्या लिंबांच्या नि बाभळीच्या झाडांमध्ये लपलेला दक्षिण उत्तर असा तो लांबच लांब शांत निरव असा तो दगडी रस्ता मी खूप घाबरले,अगदी रडकुंडीला आले होते. हळूहळू अंधार पडायला होता, "ताई, ताई" करुन मी ओरडायला लागले .शिरवाळ असल्याने आणि जवळच ओढ्यातल्या पाईपमुळे आवाज घुमू लागला. मी अजूनच घाबरले. थोड्या वेळाने ताई आली. आम्ही झपाझप कसले



पळत पळतच दहा मिनीटांच्या अंतरावर असलेल्या आमच्या शेताजवळ आलो. तिथे काका आणि काकी होती.काकूने शिरवाळं असल्यामुळे माझा आवाज ऐकला होता. आल्या आल्या तिने मला विचारले , काय झाले.तू ताई ला हाका मारत होती ना! मग तिला सगळं सांगितलं.

***"बर चला आता लवकर"***
***"अंधार पडायला लागलायं"***

काकाची बैलगाडी थोड्या अंतरावर चालत होती.

आम्ही निघेपर्यंत पूर्ण अंधार पडला,सगळे साहित्य घेवून शेतातून बाहेर पडले.चालता चालता कानात बैलाच्या गळयातील घुंगरा चा आवाज तेवढं घुमत होता.आणि त्यावेळेला एक अनामिक भीती वाटत होती.की आपल्या पाठीमागे कोण आहे कि काय?आणि थोडे चालत गेल्यानंतर सहज म्हणून मागे फिरुन पाहिले.तर त्या भयाण अंधारात किलकिलणारी ती छोटीशी लाईट( अर्थात ती लाईट एका टूव्हीलरची होती.हे खूप दिवसानंतर लक्षात आले.) त्या लांब लचक रस्त्यावरून जाताना दिसली. आणि त्यामागची त्या काळाकुट्ट डोंगराची ती काळीकुट्ट अशी डोंगराची प्रतिकृती अगदी जशीच्यातशी समोर येते.एखादी गोष्ट किती जिव्हारी भिडलेली असतेना!पण एखादी भ्रामक कल्पना अगदी जिव्हारी भिडते त्याच्यानंतर कित्येकदा शेतात गेल्यानंतर मला शेतातून घरी परतताना कित्येक दिवस घरी परतताना मला खूप भीती वाटायची, अर्थात हळूहळू मोठे झाल्यानंतर ती भीती कमी झाली. पण आत्ता कधीतरी असे वाटते कि खरचं पुन्हा एकदा तोच अनुभव घ्यावा. खर तर माझ्या मुलींसाठी हे असे अनेक अनुभव लिहून ठेवले आहेत. पण या मुलांच्या कल्पनाच वेगळ्या !त्यांना या गोष्टी खर्‍या वाटत नाहीत.पण ते मनमोकळं आयुष्य जगतानाचे वेगवेगळे आनंद त्यांना लिखितरुपाने देण्याचा प्रयत्न करते आणि खरं सांगू तर ही मुले त्याचा आनंद ही घेतात. खरं तर मी कित्येक वर्षे तिकडे गेली नाही पण खरचं एकदा जायची अगदी तीव्र इच्छा आहे बघुया कधी योग येतोय तो...!

निसर्गाच्या सानिध्यात जीवनातल्या अनेक नवनवीन वाटा नवनवीन अनुभव त्यांना देण्याचा एक छोटासा प्रयत्न.....

# आरोग्यदायी 'बीट'



आधुनिक केसरी

'बीट' च्या सेवनाने, अशक्तपणा, खाज सुटणे आणि थकवा दूर होतो. शरीर निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येकाला जीवनसत्त्वे, सोडियम, पोटॅशियम, लोह आणि कॅल्शियमची नितांत गरज असते. या घटकांची कमतरता किंवा जास्तीमुळे आरोग्य खराब होऊ शकते. शरीरातील या गोष्टींची कमतरता दूर करण्यासाठी तुम्ही अनेक गोष्टींचे सेवन करता, परंतु हे सर्व घटक बीटमध्ये एकत्र आढळतात. चला तर मग आज या लेखात तुम्हाला बीटचे फायदे सांगूया. आजकाल प्रत्येकजण तणावाखाली जगतो, ज्याचा त्यांच्या शरीरावर नकारात्मक परिणाम होतो. हा प्रभाव टाळण्यासाठी तुम्ही दररोज बीटचे सेवन केले पाहिजे, असे केल्याने तुम्हाला ताण येणार नाही, कारण यामध्ये असलेले पोषक तत्व तुमचा मेंदू पूर्णपणे निरोगी ठेवतात. त्यामुळे डोक्यात ऑक्सिजनचा प्रवाह वाढतो. मुख्य घटक बीट आहे. टोमॅटो, काकडी, गाजर आणि आवळ्याचा एक चतुर्थांश रस बीटच्या रसात मिसळून दिवसातून 3 तासांच्या अंतराने घेतल्यास लघवीची सूज नाहीशी होते. काही लोकांना जननेंद्रियाच्या क्षेत्रामध्ये खूप फायदा होईल. बीटची पाने केसांसाठी खूप फायदेशीर असतात. बीटची पाने मेंदीमध्ये मिसळून पेस्ट बनवा. ही पेस्ट केसांना नियमित लावा. केस गळणे थांबेल. यासोबतच बीटची पाने हळद पावडरमध्ये मिसळून टाळूवर लावल्याने केस गळण्याची समस्याही दूर होते. चरबीचे प्रमाण कमी करण्यासाठीही बीट फायदेशीर आहे. बीट आणि गाजरचा रस प्यायल्याने शरीराची ताकद वाढते हे फार कमी लोकांना माहिती असेल. बीट, गाजर किंवा काकडीचा रस सकाळ संध्याकाळ प्यायल्याने मूत्रपिंड, यकृत आणि पित्ताशयाचे विकार बरे होतात. यकृताच्या समस्यांवर उपचार करण्यासाठी पांढरा बीट अधिक प्रभावी आहे. बीट्स आपल्या रक्तातील साखरेची पातळी कमी करतात. बीटमध्ये नायट्रेट्सचे प्रमाण जास्त असते. सेवन केल्यावर त्याचे नायट्रिक ऑक्साईडमध्ये रूपांतर होते. हे दोन्ही घटक रक्तवाहिन्या रुंद करण्यास आणि रक्तदाब कमी करण्यास मदत करतात. दररोज 500 ग्रॅम बीट खाल्ल्याने व्यक्तीचा रक्तदाब सुमारे 3 तासांत कमी होतो. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी बीटचे सेवन करावे. बीटमध्ये भरपूर पोटॅशियम असते. त्यामुळे शरीरातील स्नायू चांगले काम करतात. शरीरातील पोटॅशियमच्या कमतरतेमुळे अशक्तपणा, खाज आणि थकवा दूर होतो. जर शरीरात कोलेस्टेरॉलची पातळी जास्त असेल तर बीटचा रस खूप फायदेशीर ठरतो. अशक्तपणाचा त्रास असलेल्या लोकांसाठी बीट वरदानाचे काम करते. बीटची 5 ते 7 पाने आणि अर्धा चमचा हळद यांची पेस्ट टाळूवर पाणी न घालता लावल्यास टाळूवर केस वाढू लागतात. चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करण्यासाठीही बीट फायदेशीर आहे, यामध्ये असलेले अँटी-ऑक्सिडेंट चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करण्यास मदत करते. या समस्येवर मात करण्यासाठी बीटचा रस नियमितपणे चेहऱ्यावर लावा. बीटमध्ये 'बीटिन' नावाचे तत्व असते जे कर्करोग आणि ट्यूमरची शक्यता नष्ट करते. याशिवाय, शरीराची रोग प्रतिकारशक्ती विकसित करण्यासाठीही ते फायदेशीर आहे. त्यात खूप कमी कॅलरीज असतात त्यामुळे ते फॅट फ्री असते. मधुमेहींसाठी ही खूप चांगली भाजी आहे. गर्भवती महिलांना बीटचा रस पिण्याचा सल्ला दिला जातो जेणेकरून त्यांचे हिमोग्लोबिन अबाधित राहील, कारण लोहाच्या कमतरतेमुळे महिलांमध्ये अशक्तपणा होतो. बीट मेंदूच्या नसा सक्रिय ठेवण्यास मदत करतात. बीटच्या रसामध्ये नायट्रेट्स असतात, जे आपल्या शरीरात नायट्रिक ऑक्साईडमध्ये बदलतात. हे नायट्रिक ऑक्साईड मेंदूच्या मज्जातंतूंच्या परस्परसंवादाला उत्तेजित करते. जे आपली स्मरणशक्ती वाढवते.



डॉ. ज्योती शेप-सिरसाट

# कारले खाण्याचे आरोग्यदायी फायदे...



कारले म्हटलं की, अनेक जण नाक मुरडतात. परंतु चवीने कडू असलेले कारले शरीरासाठी उत्तम असते. विशेष म्हणजे कारले लहान मुलांनी खाव यासाठी गृहिणी वेगवेगळ्या युक्त्या देखील लढवतात. मात्र, असे केल्याने बऱ्याचदा त्या काऱ्यामधील भाजीतील जीवनसत्त्व पूर्णपणे वाया जाते. त्यामुळे नावडत कारल आठवड्यातून एकदा तरी खावे, कारण ते शरीरासाठी उत्तम असते. चला तर जाणून घेऊया.

बऱ्याचदा कावीळ झाल्यास ती दूर व्हावी याकरता घरगुती उपाय केले जातात. अशावेळी कारले देखील उत्तम उपाय आहे. कावीळ झाल्यानंतर ताज्या कारल्याचा रस काढून तो सकाळ, संध्याकाळ घेतल्यास कावीळ दूर होते.

यकृताच्या सर्व विकारांमध्ये कारले एक रामबाण उपाय आहे. यामुळे यकृताच्या सर्व विकारांमध्ये कारल्यचा रस फायदेशीर ठरतो.

लहान मुलांना जंताचा त्रास बऱ्याचदा होण्याची तक्रार असते. अशावेळी पोटात जंत झाल्यास कारल्याचा रस फायदेशीर ठरतो.

बऱ्याचदा हिवाळ्यात सर्दी, खोकला आणि दम्याचा त्रास चाळवतो. अशावेळी कारल्याचा रस आणि तुळशीच्या पानांचा रस एकत्र करुन त्यात मध मिसळून महिनाभर घेतल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

कारल्यामध्ये इन्सुलिनसारखे संयुग पॉलिपेप्टाईड-पी असून, नैसर्गिकरीत्या मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यासाठी फायदेशीर आहे. नियमितपणे २००० मिलिग्रॅम या प्रमाणात कारले आहारात असल्यास टाइप-२ प्रकारच्या मधुमेहींच्या रक्तातील शर्करेचे मात्रा कमी होण्यास मदत होते.

कारल्यातील वनस्पतिजन्य इन्सुलिनचा टाइप-१ मधुमेहामध्येही फायदा होतो. कारल्यातील लोह आणि फोलिक आम्लामुळे हृदयरोग, पक्षाघात यांचा धोका कमी होतो. पोटॅशिअमचे प्रमाण भरपूर असल्याने, ते शरीरातील अतिरिक्त सोडियमचे शोषण करते. त्याचा फायदा रक्तदाब स्थिर ठेवण्यात होतो.

# मुलायमसिंग, उत्तर प्रदेश आणि इंग्रजी...





मुलायमसिंग यादव गेले .१९९२ च्या सुमारास मुलायमसिंग यादव यांचे नाव प्रकाशझोतात आले. अयोध्या, कारसेवक याने एक काळ भारावलेला होता. त्या काळात ते उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री होते. अयोध्येत कारसेवेच्या वेळी त्यांनी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली होती. परिंदा भी पर नही मार सकता अशी त्यांची घोषणा होती. अर्थात कारसेवा झाली. अनेक कारसैनिक शहीद झाले. पुढे मुलायमसिंग सरकारही गेले. मुलायमसिंग फार दीर्घ काळ मुख्यमंत्री नव्हते. पण ते उत्तर प्रदेश या देशातील सर्वात मोठ्या राज्याचे मुख्यमंत्री होते. असे राज्य जिथून नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, संजय गांधी, सोनिया गांधी, वाजपेयी, मोदी निवडून गेले. हे सारे पंतप्रधान होते, अपवाद फक्त सोनियाजीचा. अर्थात त्यांचे सरकारमधील स्थान मध्यवर्ती होते . स्वाभाविकच मुलायमसिंग यांच्या मनात पंतप्रधान होण्याची इच्छा होती. देवेगौडा होऊ शकतात तर मुलायमसिंह का नाही ?


इंग्रजी विरोध दक्षिण भारतात तामिळनाडूमध्ये हिंदीला विरोध केला जातो. नव्वदच्या दशकात एकेकाळी मुलायमसिंग यादव यांनी इंग्रजीला विरोध केला. त्यामुळे महाविद्यालयीन तरुणांमध्ये लोकप्रिय होते .असाच प्रयोग बिहारमध्ये ऐशीच्या दशकात झाला होता .मुलायमसिंग यांनी त्यावेळी संगणकालाही विरोध केला होता. गम्मत म्हणजे संगणकीकरणाला कम्युनिस्ट, संघ परिवारातील कामगार संघटना यांचाही विरोध होता. आज भाजप सर्वात टेक्नोसेव्ही राजकीय पक्ष आहे. हाईट म्हणजे २०१२ मुलायमसिंग यांच्या तेक्नोसेव्ही मुलाने, अखिलेश यादवने मुख्यमंत्री असताना ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना ल्यापटोप वाटले. हेच ल्यापटोप अन्य राजकीय पक्षांनी त्यांच्या प्रचारात वापरले कालाय तस्मै नमः

कॉंग्रेस अध्यक्ष पदाची निवडणूक

सध्या कॉंग्रेस अध्यक्ष पदाची निवडणूक होते आहे. यापूर्वी लक्षात राहिलेली निवडणूक म्हणजे सीताराम केसरी, शरद पवार आणि राजेश पायलट या तिघांमध्ये ही निवडणूक झाली होती. त्यावेळी उत्तर प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष जितेंद्र प्रसाद यांनी सीताराम केसरी यांना पाठींबा दिला होता. उत्तर प्रदेशमध्ये कॉंग्रेसचा एकच आमदार आहे. पण पक्षातील अंतर्गत निवडणुकीत तेथे सर्वाधिक मतदार आहेत. त्यामुळे उत्तरप्रदेशच्या बळावर सीताराम केसरी जिंकले होते. हि आहे उत्तर प्रदेशची महती आणि संगमनेर कालच्या लोकसत्तातील बातमीनुसार कॉंग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत नगर जिल्ह्यात आकरा मतदार आहेत. त्यातील पाच संगमनेरमधील आहेत. म्हणजेच सत्ताबदल झाला तरी संगमनेरचे महत्व कायम आहे .

(लेखक राजकीय सामाजिक विश्लेषक आहेत)

श्रीनिवास भोंग, ९४२३७८३२३५








श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

आधुनिक केसरी

अ) गणिताची मुलभूत संकल्पना : अंकाची दर्शनी किंमत व स्थानिक किंमत सारणी क्रमांक : 02



ब) गणिताची मुलभूत संकल्पना प्रश्नसंच.
1) 59876 या संख्येतील प्रत्येक अंकाची दर्शनी किंमत किती ?
2) 432014 या संख्येतील प्रत्येक अंकाची स्थानिक किंमत किती ?


१७) सांगा पाहू...
जीचे समान भाग करतात
तिला भाज्य म्हणतात.
जेव्हडे भाग करायचे
तिला भाजक म्हणतात.
जेवढ्यांना समान वाटणी मिळाली.
त्याला भागाकार म्हणतात.

क) उखाणाः 1) वल्लरी शब्दाचा समानार्थी शब्द आहे लता, संख्येतील अंकाची स्थानिक किंमत काढताना त्या अंकापुढे जेवढे अंक आहेत, तेवढे शुन्य दिली जातात. 2) साह्याद्री शब्दाचा अर्थ आहे सह्यपर्वत, एकक स्थानाकडून जसजसे डावीकडे जातात, तसतशी अंकाची स्थानिक किंमत दहाच्या-दहापटीत जाते वाढत. ड) कविता :क्रमांक 17

---

**तुकारामनीती**
**भाग 30**

# तुका म्हणे आतां करीं माझे हित ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मानवाच्या प्रवाही असण्याचे लक्षण काय? याची अनेक उत्तरे जो तो आपआपल्या सैद्धांतिक पद्धतीने देईल. माझ्या मते जो माणूस नित्य विचार करतो, लिहितो, बोलतो आणि त्याच अनुषंगाने कार्य करत राहतो तोच खरा प्रवाही माणूस! मानवाच्या सर्वांगीण उन्नतीचे अवलोकन केले असता बरीच माणसं प्रवाह पतित होतांना दिसतात आणि नंतर ती कालौघामध्ये लोप पावतात. असं जर असेल तर मग माणसाच्या उन्नतीची दिशा कोणती असली पाहिजे? तर ती दिशा ऊर्ध्वगामी असली पाहिजे, जेणेकरून त्याचे पतनाऐवजी उत्थान होईल! याच उद्देशानं सगळी महत्कार्य चालत आहेत आणि चालणार आहेत! संत तुकोबारामांच्या विविध अभंगांचे विश्लेषण करताना आपल्याला त्यांच्या याच उर्ध्वगामी जीवन लहरी समस्त विश्वाला व्यापण्याच्या नव्या उमेदीचे धुमारे फुटतांना प्रेरित करतात! माणसाला जीवनाच्या विविध प्रकारच्या आनंद आणि मर्यादांची जाण झाली तेंव्हा पासून त्याने आपल्यासाठी विविध वस्तू जमा करायला सुरुवात केली. माणसाला वस्तूंचा संग्रहच सुख देतो (?) या अशाश्वत, मृगजळरुपी लोभाची जाण झाली आणि लगेच माणूस संग्रहाच्या पाठीमागे धावू लागला.**

याच अनुषंगाने जगप्रसिद्ध कथाकार लिओटॉलस्टॉय यांची ‘माणसाला किती जमीन लागते?’ ही जगप्रसिद्ध कथा लिहिली आहे. या कथेतील पाहोम नावाचा व्यक्ती खूप गरीब असतो. तो कष्ट करून थोडी जमीन विकत घेतो. त्या जमिनीत अहोरात्र मेहनत करून तो आणखी शेती घेतो. त्याचा एका सुंदर मुलीसोबत विवाह होतो. तो सर्व सुख-सोयीनिशी असणारे एक घर बांधतो. आणखी मेहनत करून आपल्या पत्नीला दागदागिने करतो. शेजारच्या गावात आणखी जमीन विकायला निघाल्यामुळे तो आपल्या पत्नीचे दागिने विकून आणखी शेती घेण्यासाठी आपले घर, पत्नी, सर्व संपत्ती तिथेच ठेवून काही मैलावर शेती खरेदी करायला जातो. तिथली सपाट, सुपीक जमीन पाहून तो अक्षरशः वेडा होतो. त्या गावाचा मुखिया येऊन पाहोमला म्हणतो, “पन्नास रुपये हेक्टर या भावाप्रमाणे तुला हवी तेव्हढी जमीन तू घेऊ शकतोस. फक्त अट एकंच आहे, ती अशी की; तू जेवढी जमीन चालत जाशील आणि पुन्हा परत येशील तेव्हढीच जमीन तू घेऊ शकतोस.” हे ऐकून पाहोम अक्षरशः वेडाच होतो! आपली सगळी संपत्ती आपल्या नौकराकडे सोपवून तो सपाट जमिनीवर लगेच चालायला लागतो. अगोदर दम लागला की; पाणी पितो, थोडा थांबतो. नंतर तो बरंच अंतर कापून जातो. दुपार होते. आज तो रोजच्यासारखी विश्रांती घेत नाही. दुपारचे जेवण चालत चालतच करतो. नंतर त्याच्याजवळचे पाणी संपते. तो खूप दूर चालत गेलेला असतो. तोपर्यंत दुपारचे चार वाजून गेले असतात. आता तो परत फिरतो. येतांना खूप जोरात चालत तर कधी पळतपळत चालतो. त्याच्या जवळचे पाणी संपलेले आहे. आता त्याला आणखी भूक लागलेली असते. प्रचंड थकवा आलेला असतो. त्याला आरामाची नितांत आवश्यकता असते. तरीही तो चालतच राहतो. त्याच्या प्रारंभाचे ठिकाण अगदी जवळ आलेले आहे. आज तो जवळपास दोन-तीन हजार एकर सुपीक जमिनीचा मालक होणार आहे. तो प्रचंड थकलेला असतांना त्याचे अंतिम ठिकाण शंभर पावलांवर आलेले असतांना तो कोसळतो. निपचित पडतो. सगळे लोक त्याची वाट पाहत असतात. त्याचा नौकर पळत पळत त्याचाजवळ जातो, त्याला उठवण्याचा प्रयत्न करतो, मात्र त्याची प्राणज्योत मालवलेली असते. तो गतप्राण होतो. त्या गावाचा मुखिया, पाहोमचा नौकर आणि तिथे जमलेले सगळे लोक हळहळ व्यक्त करतात. तिथेच एक खड्डा खोदला जातो आणि त्यात त्याला दफन केले जाते. घर, पत्नी, सर्व सुविधा असणारा माणूस आणखी हव्यासापायी आपले सर्वस्व गमावून बसतो. किती जमीन लागते माणसाला? इथे हा प्रश्न अत्यंत कळीचा आहे.

त्याच अनुषंगाने तुकोबाराय हा अभंग लिहितांना दिसतात. संसार हा सरणारा म्हणजे संपणारा आहे. हा अशाश्वत असणारा संसारच आपण शाश्वत समजून त्यावर जीवापाड प्रेम करत आहोत. परंतु तुकोबा इथल्या बेगडी लोक व्यवहाराला प्रचंड वैतागले आहेत. त्यांना या प्रपंचाचा अक्षरशः वीट आलेला आहे. त्यामुळे रात्रंदिवस भजनात आणि कीर्तनात रममाण असणारे तुकोबाराय देवाकडे देवाचीच मागणी करतांना त्यांची अवस्था किती दयानीय झाली आहे( ?) याचे वर्णन करतांना हा अभंग लिहिते झाले असावेत. नाही सुख मज न लगे हा मान । न राहे हें जन काय करूं ॥ १ ॥
देहउपचारे पोळतसे अंग । विषतुल्य चांग मिष्टान्न तें ॥ ध्रु. ॥
नाइकवे स्तुति वाणितां थोरीव । होतो माझा जीव कासावीस ॥२॥
तुज पावें ऐसी सांग कांही कळा । नको मृगजळा गोवूं मज ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां करीं माझे हित । काढावें जळत आगीतूनि ॥ ४ ॥ (शा.अ.गाथा अ.क्र.५४६)
व्यवहारातील लौकिक बाबी जसे की मानपान आणि लोकव्यवहार याचा त्याना प्रचंड कंटाळा आला आहे. आपल्या देहाच्या संबंधी त्यांच्यात पूर्णतः स्थितप्रज्ञता आली असून त्यांना शरीराच्या उपचाराने पोळते आहे. कोणताही सोपस्कार त्यांना नकोसा झाला आहे. एवढेच काय, कुणी मिष्टान्न दिले, ते सुद्धा विषाप्रमाणे लागते आहे. त्यांना कुणाकडूनही स्तुती अथवा मोठेपणा ऐकावा वाटत नाही, उलट असं कुणी करत असलेले पाहून त्यांचा जीव कासावीस होतो! याचे कारण म्हणजे या सगळ्या बेगडी सोपस्कार-लोकव्यवहारातून साध्य काहीच होणार नाही. यातून मला तू भेटणार आहेस का? असा सरळ, सुटा सवाल ते स्वतःतील ईश्वराला करतात आणि याचे उत्तर जर नाही असेल तर मग मला या मृगजळामध्ये न अडकवण्याची विनंती करतात. या सगळ्या संस्कार-सोपस्कारातून देवाने त्यांना बाहेर काढून सुखरूप करावे अशी रोखठोक आणि जाहीर विनंती शेवटी



तुकोबाराय देवाला करतांना दिसतात.


खरंच मित्रांनो, आज आपण जर आपल्या भोवताल सुरु असलेले लोकव्यवहार पहिले तर मन विषन्न व्हायला लागते. कोण कुणावर किती खरं प्रेम करतोय? कोण कुणाचा किती निष्ठावंत आहे? कोण कुणाची किती मनाभावातून स्तुती करतोय? कोण कुणाचा किती जिवलग आहे? या सगळ्याच प्रश्नांची जर मनातून उत्तरे दिली, तर सगळ्यांनाच हसायला येईल अथवा भावनिक माणसांना वेड लागल्याशिवाय राहणार नाही. आज माणसांचे सगळेच व्यवहार अत्यंत बेगडी आणि खोटेपनाचे झाले आहेत. जो तो सत्ता, संपत्ती, यश, कीर्ती याच्या मागं धावतांना त्याचे दैनंदिन जगणं मात्र तो हरवून बसला आहे. एका महिन्याला महागडा मोबाईल, सहा महिन्याला गाड्या बदलणारी आणि आलेशान बंगल्यात राहणाऱ्या माणसांना अन्न पचनाच्या, रक्त पातळ व्हायच्या आणि झोपेच्या गोळ्या घेतल्याशिवाय एअर कंडीशन खोलीत झोप येत नाही. त्यांच्याकडे सगळं काही असून काहीच नाही. त्यांची अवस्था रस्त्यावरच्या भिकाऱ्यापेक्षाही बत्तर झाली आहे. रस्त्यावरच्या भिकाऱ्याला कुठेही झोप येते. त्याला कोणतही अन्न पचन होतं. मग खरा श्रीमंत कोण? असे एक ना अनंत प्रश्न आज लोकांसमोर उभे असतांना त्या सर्वच प्रश्नांवर रामबाण औषध म्हणजे जगद्‌गुरू तुकोबांचा हा अभंग आहे.

कोणताच मान किंवा लोकव्यवहार माणसाला खरं सुख देवू शकत नाही. यामुळेच बोधिसत्व गौतम बुद्धांनी राजवाडा सोडून ध्यानाचा मार्ग अवलंबला! सर्वसंग परीत्यागाच्या मार्गानेच त्यांना शाश्वत सुख काय असते( ?) याचा प्रत्यय आणून दिला. शरीर अनुषंगिक सुख अथवा मिष्ठान्न हे क्षणिक आहे. स्तुती-मोठेपणा ही माणसाच्या खऱ्या सुखाला लागलेला गंग्रीन आहे. यापासून माणसाने नेहमी दूरच असावे. हे विष आहे. यातून आपला घात होण्याची दाट शक्यता असते. हे सर्वच जळत्या आगीची छुपी रूपं असून यातून मानवाला परमानंद प्राप्ती केंव्हाच होणार नसल्यामुळे तुकोबाराय या आगीतून काढण्याचे आव्हान ईश्वराला म्हणजेच स्वतःच्या मनाला करतांना दिसतात. आज आपण सुद्धा देह उपचार, स्तुती, मानपान, मोठेपणा, उदोउदो या सर्वच ज्वलनशील पदार्थांपासून दूर राहिले पाहिजे. याच्या सहवासात आलेली माणसं नेहमी आगीतच असतात, तेंव्हा आपण सर्वानीच या लौकिक-व्यावहारिक बाबींपासून दूर राहून आपले दैनंदिन जीवन आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करावा. आपल्या आवाक्या बाहेरील किंवा कुणाला तरी त्रास देऊन, कुणाला तरी लुबाडून अथवा मनाला मारून जर आपण एखादी गोष्ट अथवा साधन हस्तगत करत असू तर ते साधन म्हणजेच अक्षरशः आग घरी आणण्यासारखेच आहे! तेंव्हा चला मित्रहो, माझ्यासह आपण सगळेच तुकोबांच्या या अभंगावर सखोल चिंतन करूयात आणि आपले दैनंदिन कार्य आणि जीवन यापरती एकनिष्ठ राहून इमानेइतबारे आपले नेमून दिलेले काम करूयात! हीच थोर भक्ती आहे! हेच महान कार्य! हीच तुकोबांची आणि पांडुरंगाची खरी सेवा आहे! त्यासाठी आपल्याला कोणतेही अवडंबर अथवा कुठेही भ्रमंती करण्याची आवशकता नाही! असे होणे म्हणजेच या तुकाराम नीतीचे आणि संत तुकोबांनी सांगितलेल्या मुलभूत समाजसुधारणा उपायांचे फलित होणे आहे! जय तुकोबाराय!

---

# ‘उंचाई’ चित्रपटातील अमिताभच्या पहिल्या कॅरेक्टर पोस्टरचे केले अनावरण!

## बिग बींच्या ८० व्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला राजश्री प्रॉडक्शनकडून एक अनोखे सरप्राईज




मुंबई प्रतिनिधी
रमाकांत मुंडे

अमिताभ बच्चन यांच्या ८० व्या वाढदिवस सोहोळ्याची सुरुवात राजश्री प्रॉडक्शनने अनोख्या पद्धतीने केली आहे. प्रख्यात अभिनेते धर्मेंद्र आणि अमिताभ गेल्या पाच दशकांहून अधिक काळ एकमेकांचे चांगले मित्र आहेत. अमिताभ आणि धर्मेंद्र वास्तव जीवनातील मित्र तर आहेतच त्यांनी रुपेरी पडद्यावरही अनेक चित्रपटांमध्ये मित्रांची भूमिका साकारत मैत्री साजरी केलीय. रुपेरी पडद्यावर ये दोस्ती हम नहीं तोडेंगे म्हणणारे हे दोघे आज पुन्हा एकत्र आलेत. आणि त्याचे कारण आहे राजश्रीचा नवा चित्रपट ‘उंचाई’. धर्मेंद्र यांनी त्यांच्या शोलेतील या सह-कलाकाराचे बहुप्रतिक्षित चित्रपट ‘उंचाई’मधील कॅरेक्टरचे पोस्टर प्रदर्शित करीत अमिताभ यांना वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा दिल्या. महावीर जैन फिल्म्स आणि बाउंडलेस मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राजश्री प्रॉडक्शन निर्मित, ‘उंचाई’ हा बिग बींचा त्यांच्या ८०व्या वर्षातील रिलीज होणारा पहिला चित्रपट असणार आहे. सूरज आर. बडजात्या दिग्दर्शित, ‘उंचाई’ ११.११.२२ रोजी प्रदर्शित होणार आहे.
प्रतिष्ठित राजश्री प्रॉडक्शनचा ‘उंचाई’ हा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी चित्रपट आहे. या चित्रपटाबाबत बिग बी यांनी त्यांच्या अत्यंत लोकप्रिय अशा ऑनलाइन ब्लॉगवर सर्वाधिक वेळा ब्लॉग लिहिलेला आहे. काही दिवसांपूर्वी साजरा करण्यात आलेल्या फ्रेंडशिप डेच्या दिवशी ‘उंचाई’ चित्रपटाचे पहिले पोस्टर रिलीज करण्यात आले होते. या पहिल्याच पोस्टरने चित्रपटात मित्रांची कथा मांडण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून आले. पोस्टरची टॅगलाइन - मैत्री ही त्यांची एकमेव प्रेरणा होती अशी आहे. चित्रपटाची मैत्रीची हीच थीम पुढे नेत, राजश्रीने अमिताभ यांना वाढदिवसानिमित्त हे एक अनोखे सरप्राईज दिले. मैत्री हा धागा असल्यानेच शोलेतील वीरूने ‘उंचाई’मधला जयचा लूक जगासमोर सादर केला!
‘उंचाई’च्या पहिल्या कॅरेक्टर पोस्टरसह, या शतकातील सर्वात मोठ्या सुपरस्टारच्या दोन विरोधाभासी छटा प्रेक्षकांसमोर आल्या आहेत. एकीकडे अमिताभ बच्चन ग्लॅमरस दुनियेतील चपखल अवतारात दिसत आहेत. तर दुसरीकडे, चित्रपटातील त्यांच्या व्यक्तिरेखेची एक अत्यंत विरोधी प्रतिमा जी बर्फाच्या पर्वतामध्ये, बर्फाने भरलेल्या त्वचेसह, डोळ्यांत आशा आणि महत्त्वाकांक्षा घेऊन पाहताना दिसत आहे.
राजश्रीने बॉलीवूडमध्ये गौरवशाली ७५ वर्षे पूर्ण केली आहेत. त्यानिमित्ताने २०२२ मधील सर्वात मोठा चित्रपट म्हणून ओळखला जाणारा, ‘उंचाई’ प्रेक्षकांसमोर घेऊन येत आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठे आणि उत्कृष्ट कलाकार प्रथमच या चित्रपटाच्या माध्यमातून एकत्र पडद्यावर दिसणार आहेत. अमिताभ बच्चन, अनुपम खेर, बोमन इराणी, सारिका, नीना गुप्ता आणि परिणीती चोप्रा यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या, ‘उंचाई’त डॅनी डेन्झोंपा आणि नफिसा अली सोधी यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. मैत्रीच्या अविस्मरणीय प्रवासासह एक दृश्यात्मक अनुभव घेण्यासाठी तयार राहा. ‘उंचाई’ ११.११.२२ रोजी तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# लासूर स्टेशनसह ग्रामीण भाग गुटख्याच्या विळख्यात

## अन्न व औषध प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष - तरुणात व्यसनाधीनता वाढली

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशनसह परिसरातील ग्रामीण भागात राज्यात बंदी असलेला गुटखा व तंबाखू जन्य पदार्थांची खुलेआम किराणा दुकान, पानटपरी, चहाचे दुकान व छोट्या मोठ्या टपऱ्यात गुटख्याची अवैध विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असून अन्न, व औषध प्रशासनसह पोलिसांचे याकडे दुर्लक्ष झालेले दिसून येत आहे. राज्यात गुटखा बंदी आसताना सुद्धा मोठ्या प्रमाणात अवैधरित्या गुटख्याची विक्री सुरू आहे औरंगाबाद शहरासह कसाबखेडा, शिऊर, गारज, वैजापूर, तर नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर, कोपरगाव, गुटखा माफियाकडून ग्रामीण भागापर्यंत गुटखा पुरवठा केला जातो. यातून दररोज लाखोंची उलाढाल होत असून यामुळे मात्र अल्पवयीन तरुण व्यसनाधीन होत आहे. या गावात समृद्धी महामार्गने अवैध वाहतूक करून गुटखा,दारूची वाहतूक ही मध्यरात्री ते सकाळ पर्यंत केली जाते म्हणुन अवैध धंद्यासाठी समृद्धी महामार्ग खुश्किचा मार्ग बनत चालला आहे कारण हा रस्ता वाहतुकीस खुळा झाला नसल्याने पोलीस अथवा कोणताही अधिकारी या वाहनाना हटकत नाहीं त्याचा फायदा हे अवैध धंदायावले घेत आहे.

औरंगाबाद शहरात ९ एप्रिल रोजी औरंगाबादच्या वाहतूक शाखेने छापा टाकत तीन पिकअप वाहनातुन शहरातील गुटका विक्रेत्यांच्या दुकानासह गोडाऊन मधून एकूण ३५ लाखाचा प्रतिबंधीत गुटखा व मुद्देमाल पकडला होता. या कारवाई मुळे शहरात गुटखा विक्रेते हादरले होते तर दी. २३ मे रोजी कन्नड तालुक्यातील करंजखेडा येथे



अवैध रित्या गुटख्याची बनावट पॅकिंग करून विक्री करत असलेल्या तीन आरोपीच्या दुकानात व घरावर पिशोर पोलीस व अन्न औषधी प्रशासन अधिकाऱ्यानी छापा मारून गुटखा पॅकिंग करण्याचे मशीन व इतर साहित्य जप्त करून तीन आरोपी विरुद्ध दी २४ मे रोजी पिशोर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे.

यामुळे काही काळ जिल्ह्यात व गंगापूर तालुक्यातील ग्रामीण भागात गुटखा विक्री थांबली होती मात्र आता पुन्हा गुटखा माफियानी आपले कारभार जोरात सुरू केल्याचे दिसून येत आहे. नवरात्र उत्सवात भगर खाल्याने विषबाधा झाल्याने अन्न औषधी विभागाच्या पथकाने लासूर स्टेशन शहरात येऊन नावापुरती कारवाई केली होती मात्र अवैधरित्या सुरू असलेल्या गुटखा विक्री विरुद्ध कारवाई कधी करणार असा प्रश्न काही सामाजिक कार्यकर्ते,नागरिक उपस्थित करत असून उपविभागीय पोलीस आधिकारी प्रकाश बेले यांच्याकडे अवैध धंदे बंद करावे असे निवेदन नागरिक रणजित जाधव यानी दिले आहे.



# राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांची बाळापूर गावाला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र राज्याचे माजी जलसंपदा मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे धुळे दौऱ्यावर जात असताना त्यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव सुमित पवार यांचे मुळगाव असलेले धुळे तालुक्यातील बाळापुर गावाला भेट दिली. यावेळी सुमित पवार व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. व भव्य दिव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुमित पवार व त्यांचे मोठे बंधू अमित पवार व गावकऱ्यांकडून मिळालेले प्रेम व आपुलकीपणा पाहून जयंत पाटील भारावून गेले होते. तसेच त्यांनी बाळापूर गावाच्या समस्या व अडचणी समजून घेत ते सोंडवण्यासंदर्भात आश्वासन दिले व गावातील समस्या बाबत जयंत पाटील यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव सुमित पवार यांनी गावाकऱ्यांसमवेत निवेदन दिले. भेटी गाठी नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आपले पदाधिकाऱ्यांसह धुळ्याकडे मार्गस्थ झाले. कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा निरीक्षक अर्जुन टीळे अमित पवार सुरेश अहिरे सर माजी सरपंच प्रकाश मराठे, विनायक मराठे, भटू पाटील, प्रशांत पाटील, अरुण पाटील, रवी पाटील, विलास चौधरी, विजय वाघ कैलास, बापू काळे, अनिल भाऊ जगताप, उमेश मिस्त्री, अतुल पाटील, संजू पाटील, राजू पाटील व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना लाभली वाचनाची प्रेरणा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ. एजीजे अब्दुल कलाम यांच्या वाढदिवसानिमित्त छत्रपती विद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिवस कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचन प्रेरणा दिन संकल्पना शासनाकडून राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी विविध दैनिकातील वाचनीय कात्रणाचे संग्रह तयार केले होते त्या कात्रणाचे आज वाचन करून घेण्यात आले.तसेच गोष्टींच्या पुस्तकांचा वाचण्याचा आनंद लुटला. छत्रपती विद्यालय गारखेडा परिसर येथे भारतरत्न अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष सुभाष पाटील यांनी मार्गदर्शन केले.वाचनाच्या आवडीमुळेच आपणाला शाळेची आवड निर्माण झाली, असे पाटील यांनी सांगितले. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका निर्मला व्यवहारे यांनी डॉक्टर अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख पुस्तकावर भाष्य केले. पाटील यांनी बाल साहित्यावर आधारित पुस्तकाच्या ११ प्रती शाळेच्या ग्रंथालयात भेट दिल्या. व्यासपीठावर शालेय समितीच्या सदस्या सोनाली पाटील, प्रशालेचे सहशिक्षक रामदास वाघमारे,आण्णा आंधळे, लक्ष्मण पाटील, बबन पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन रामदास वाघमारे यांनी केले तर आभार आण्णा आंधळे यांनी केले.



# पिंपळगाव सुतार येथे विकासकामांचे लोकार्पण व उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** राजूर पासून जवळ असलेल्या पिंपळगाव सुतार येथील ग्राम पंचायत अंतर्गत विविध विकास कामासाठी दोन कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर झाला असून केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते विविध विकास कामाचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला. यावेळी बदनापूरचे आमदार नारायण कुचे, मुकेशजी पांडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तुकाराम जाधव, जिल्हा परिषद सदस्य गणेश फुके, भगवान तोडावत, संतोष लोखंडे, माजी पंचायत समिती सदस्य सोमीनाथ हराळ, मुकुंदराव मनोहर, सरपंच शारदाबाई मनोहर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बोलताना केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की ग्रामस्थांनी गावाच्या विकासासाठी एकत्र येऊन विकास कामे खेचून आणणाऱ्या व्यक्तीच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. माजी आमदारांनी २५ वर्षात जे केले नाही ते आम्ही अवघ्या दोन वर्षात करून दाखवले असा टोला दानवें यांनी माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्यावर लगावला. पिंपळगाव सुतार या गावाच्या विकासासाठी दोन



कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.भविष्यातही विकास कामासाठी निधी कमी पडून देणार नसल्याचे नामदार रावसाहेब पाटील दानवें यांनी सांगितले. मतदारसंघात गावातील विकास कामाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आपण नेहमीच तत्पर असतो याही पुढे विकास कामे केली जातील असे मत आमदार नारायण कुचे यांनी व्यक्त केले.

तर गेल्या २५ वर्षापासून पिंपळगाव सुतारची ग्रामपंचायत राष्ट्रवादीचे माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या ताब्यात होती.त्यादरम्यान ते बारा वर्षे सत्तेत आमदार होते. सत्तेत सहभागी असतांनाही गावकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी २५ वर्षात काहीच केले नसल्याचा आरोप माजी पंचायत समिती सदस्य सोमीनाथ हराळ यांनी केला.विरोधकांनी जे केले नाही ते आम्ही रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वातून १८ महिन्यात पूर्ण करून दाखवले असेही हराळ म्हणाले. यावेळी पिंपळगाव सुतार येथील ग्रामपंचायत कार्यालय, शाळा खोली, अंगणवाडी बांधकाम, घर तेथे ट्यूबलाईट, नळ कनेक्शन ,पळसखेडा दाभाडी ते पिंपळगाव सुतार पाईपलाईन दुरुस्ती,गावातील नदीवर तीन सिमेंट बांधारे, महादेव मंदिरासमोर सभामंडप, जनावरांसाठी पाण्याचा हौद व टाकी या कामाचे लोकार्पण व जलजीवन अंतर्गत नवीन वस्तीत पाणी टाकी बांधकाम, मातोश्री पाणंद रस्ता आदी कामाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी पिंपळगाव सुतार येथील सामाजिक कार्यकर्ते बबनराव चिंचोले, राजू आमले, भिका चिंचोले, आजिनाथ चिंचोले, रंगनाथ चिंचोले, नामदेव चिंचोले, बालू वनारसे या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी नामदार रावसाहेब पाटील दानवे आमदार कुचे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

याप्रसंगी कार्यक्रमासगटविकास अधिकारी सुरडकर, आत्माराम चिंचोले, ग्रामसेविका श्रीमती वाहुळे, मनोज तोडावत, ज्ञानेश्वर पुंगळे, आकाश सर, सुभाष जाधव, विलासराव नावले, विष्णुपंत गाडेकर, ज्ञानेश्वर गाडेकर, श्रीमंत शेजुळ, काकासाहेब शेजुळ, योगेश अंभोरे, शिवाजीराव खरात, केशवराव खरात, विठ्ठलराव चिंचोले, हरिदास दानवे, रमेशराव चिंचोले, सोनाजी चिंचोले, गणेश चिंचोले, पाराजी चिंचोले, नारायण चिंचोले, विष्णू आम्ले, संदीप आम्ले, आत्माराम वनारसे यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



# क्रीडा शिक्षक संघटनेतर्फे क्रीडा शिक्षकांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** तालुका शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक संघटनेच्या वतीने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या निवृत्त क्रीडाशिक्षकांचा सत्कार गटशिक्षण अधिकारी शेख साहेबांच्या हस्ते शाल व बुके देऊन करण्यात आला. तालुका क्रीडा स्पर्धा नियोजन बैठकीनंतर सत्कार समारंभ घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षण अधिकारीशेख होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर सुवर्णकार, नांदूरकर, क्रीडास्पर्धा समन्वयक दत्ता देवकते उपस्थित होते.

या प्रसंगी माजी मुख्याध्यापक शिवकुमार निर्मळे, माजी मुख्याध्यापिका सुरेखा खंडाळे, माजी उपमुख्याध्यापिका मंगला लोखंडे, माजी पर्यवेक्षक रमण सोनवळकर, वसंत ढगे यांचा सेवा निवृत्ती निमित्त गटशिक्षण अधिकारी व विस्तार अधिकार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मंगला लोखंडे, शिवकुमार निर्मळे, रमण सोनवळकर, सुरेखा खंडाळे, विस्तार अधिकारी नांदूरकर यांची भाषणे झाली. गटशिक्षण अधिकारीशेख यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक दत्ता देवकते यांनी केले.


# माधव भंडारी लिखित पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** साहित्य निर्मितीतून राष्ट्रभक्तीचा संचार मनावर व्हावा, राष्ट्रीय विचारांची घुसळण होऊन साहित्य रसिकांचे प्रबोधन व्हावे या हेतूने साहित्य प्रेमी वाचकांसाठी लेखक माधवजी भंडारी (मुंबई) लिखित "डाव्यांचा खरा चेहरा" या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयात स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात दिनांक 16 ऑक्टोबर 2022 रोजी, सकाळी 11 वाजता करण्यात आले आहे. मागील चार दशकांपासून साहित्य क्षेत्रामध्ये मराठी साहित्यातून राष्ट्रभक्ती निर्माण व्हावी या हेतूने मराठवाडा साहित्य मंच कार्यरत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा हे मान्यवर उपस्थित राहणार असून टी.बी. गिरवलकर अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांच्या हस्ते "डाव्यांचा खरा चेहरा" या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न होणार आहे. या प्रसंगी पुस्तकाचे लेखक माधवजी भंडारी यांचे व्याख्यान होणार आहे. तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संयोजक प्रवीणजी सरदेशमुख यांची देखील प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तरी सर्व साहित्य प्रेमींनी या पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन मराठवाडा साहित्य मंच बीडचे जिल्हा संयोजक माजी प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे तसेच जिल्हा सहसंयोजक डॉ.निशिकांत पाचेगावकर यांनी केले आहे. सदरील कार्यक्रम हा खोलेश्वर महाविद्यालयातील स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहामध्ये संपन्न होणार आहे.

# सांस्कृतिक मंचच्या सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्षपदी ज्योती पवार

आधुनिक केसरी न्यूज



**सिंधुदुर्ग :** ज्योती पवार यांच्या साहित्य कला, सामाजिक, शैक्षणिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातील कामाची आवड पाहून आणि साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध समस्या सोडवण्याबाबत दिलेल्या योगदानाची दखल घेवून भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच तथा फ्रिडम स्टोरी या संघटनेच्यावतीने सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्षपदी ज्योती पवार यांची निवड करण्यात आली आहे व त्याचे नियुक्ती पत्र नुकतेच ज्योती पवार यांना देण्यात आले आहे. त्यांच्या निवडीबद्दल आम्हास अभिमान वाटतो असे मंचचे अध्यक्ष विशाल सिरसट तथा उपाध्यक्ष विजय जायभाये व कार्याध्यक्षा शिल्पा मुसळे यांनी सांगीतले. भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच तथा फ्रिडम स्टोरी या संघटनेच्या यापूर्वी त्या उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होत्या. आपल्या कुशल नेतृत्वाने शुभ कार्याचा जागर जिल्ह्यात असाच तेवत राहावा, अशी आशा करून आपण ही जबाबदारी घेऊन पार पाडाल तथा साहित्य व सांस्कृतिक योगदानास सहकार्य करून कार्याचा शुभारंभ करावा ही नम्र विनंती करीत आहोत असेही त्यांनी सांगीतले. या निवडीबाबत सिंधुदुर्ग साहित्य क्षेत्रात सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.

# संगणक परिचालकावर कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** तालुक्यातील रांजणगाव पोळ येथील ग्रामपंचायत कार्यालयात संगणक परिचालक म्हणून श्रीमती निर्मला कुकलारे या रुजू असून त्यांच्या जागेवर त्यांचे भाऊ नामदेव कुकलारे हे मात्र रांजणगाव पोळ येथील ग्रामपंचायत कार्यालयातील परिचालकाचा कारभार हाकत असल्याचा आरोप विद्यार्थी काँग्रेसचे हन्शीं भाई यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी यांना निवेदनाद्वारे केला आहे.
सदरील व्यक्ती नामदेव कुकलारे हे सिंधी सिरसगाव येथे परिचालक म्हणून रुजू असुन दोन्ही ठिकाणच्या ग्रामपंचायत कार्यालयात परिचालकाचा गाडा हाकत असल्याने नामदेव कुकलारे या व्यक्तीस निलंबित करून त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अन्यथा जनआंदोलन उभारण्याचा इशारा विद्यार्थी काँग्रेसचे हन्शीं भाई यांनी दिला आहे.

# नाशिक बस अपघातास कारणीभूत असणाऱ्यांवर कारवाईची मागणी



आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** औरंगाबाद हायवे नांदुर नाका येथील मिरची हॉटेल चौक चिंतामणी ट्रॅव्हल्सची बस (यवतमाळ ते मुंबई ) अशी प्रवास करीत होती, असे असताना पहाटे 05:00 च्या सुमारास भीषण अपघातग्रस्त झाली. सदरची बस ही ट्रकवर आदळल्याने झालेल्या अपघातामध्ये 38 जण हे जखमी झालेले असून 12 जणांचा जागेवरच होरपळून मृत्यू झाला होता. चिंतामणी ट्रॅव्हल्स कंपनीचे मालक गुड्डु जैस्वाल यांनी त्यांच्या मालकीची ही बस स्वतच्या आर्थिक फायद्यासाठी व सर्व ट्रैफिकचे नियम पायदळीस तुडवून बस मध्ये 30 जणांना बसण्याची परवानगी असताना त्यामध्ये 30 पेक्षा जास्त अतिरिक्त प्रवासी बसवून त्यांच्या जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो. याकडे दुर्लक्ष करून त्यांच्या मृत्यूस व अपंगत्वास कारणीभूत आहेत असे ह्या निवेदनात म्हटले. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच, सदरची बस ही परवान्यापेक्षा जास्त वाहतुक करीत असल्याची कोणीही दखल घेतलेली नाही. त्यात आर.टी. ओ . विभागाचा गलथानपणा दिसून येतो त्यामुळे संबंधित आर.टी.ओ. विभागाच्या अधिकाऱ्यावरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर गटाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष शशिकांत दारोडे यांनी पोलीस आयुक्त नाशिक यांना केली.

# प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांना पीएच.डी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आंतरविद्या शाखाअंतर्गत नाट्यशास्त्र विषयात पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नाट्यशास्त्र विभागातील संशोधन मार्गदर्शक डॉ. अशोक बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठी दलित रंगभूमीचा चिकित्सक अभ्यास' या विषयात त्यांनी संशोधन केले आहे . मुंबई विद्यापीठ लोककला अकादमीचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे बाह्य परीक्षक म्हणून उपस्थित होते तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. स्मिता साबळे अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या.



या यशाबद्दल माजी आमदार शिवाजीराव चोथे, प्राचार्य डॉ.आर. के. परदेशी, डॉ. संभाजी चोथे, विनायक चोथे, उपप्राचार्य प्रा. प्रमोद जायभाये, डॉ. राजू सोनवणे, गोरख चोथे, प्रा. दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, बलभीम तरकसे, प्रोफेसर डॉ. संजय जाधव, प्रा. गौतम गायकवाड, प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे, डॉ. दिनेश मोरे, डॉ. सतीश पावडे, डॉ. संजय पाटील, डॉ. मंगेश बनसोड, प्रा. किशोर शिरसाठ, डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ.अनिलकुमार साळवे, डॉ. संजीवनी साळवे,सिल्व्हर ओक फिल्म अँड एंटरटेनमेंटचे निर्माता मनोज कदम, अमृत मराठे,डॉ. वैशाली बोदेले, प्रा. गजानन दांडगे, आबासाहेब वाघमारे, प्रा.एस. एल. देशमुख, डॉ. धनंजय वडमारे, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, प्रा. रमेश धोंडगे, डॉ. संजय पाईकराव,रानबा गायकवाड,बाजीराव धर्माधिकारी, चंदुलाल बियाणी, ए.तु. कराड, प्रदीप भोकरे, प्रा. विलास रोडे, गोपाळ आंधळे, मोहन व्हावळे, सिध्दार्थभाऊ हत्तीआंबीरे, अमर हबीब, डॉ. राजेश इंगोले, पत्रकार अविनाश मुडेगावकर, डॉ. गणेश मुडेगावकर, मुरली फड, अमोल अरगडे,डॉ. प्रवीण खरात, प्रा. विनोद लांडगे, प्राचार्य डॉ. अरुण दळवे, डॉ. मुंजाभाऊ धोंडगे, डॉ. बळीराम पांडे, डॉ. गणेश शिंदे, बा. सो. कांबळे, सिद्धेश्वर इंगोले, प्राचार्य अरुण पवार, डॉ. राजकुमार यल्लावाड, प्रा.डॉ. माधव रोडे, अनंत मुंडे, केशव कुकडे, प्रा. संजय आघाव, प्रा. डॉ. चंद्रकांत जोगदंड, गोविंद मुंडे, दत्ताभाऊ सावंत, दत्ता लांडे, ब्रम्हानंद कांबळे, दिवाकर जोशी, आसिफ अन्सारी, डॉ. सय्यद अमजद, प्रा. रवींद्र जोशी, भगवान साकसमुद्रे, अॅड. दिलीप उजगरे, प्रा.विक्रम धनवे,डॉ. रमेश इंगोले, बालासाहेब इंगळे, दादासाहेब कसबे, संतोष पोटभरे, डॉ. बबन मस्के, प्रा.शंकर सिनगारे,महादेव गोरे, शशिकांत कुलथे, मदन ईदगे, डॉ. संतोष रणखांब, सुनील जावळे,किशोर दहिवाडे, विकास वाघमारे यांचेसह विद्यार्थी, साहित्यिक, पत्रकार, कलावंत आदींनी प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे यांचे अभिनंदन केले आहे.



# महामार्गावर गुरे चरत असल्याने प्रवाशांचा जीव धोक्यात

## वाहतूक पोलीस व महामार्ग प्राधिकरण विभागाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सोलापुर- धुळे राष्ट्रीय महामार्गाच्या दुभाजकावर गुरे चारण्याचे प्रमाण सध्या वाढले आहे. यामुळे अपघात होऊन प्रवाशांचा जीवही जाऊ शकतो. सध्या महामार्गाची दुभाजकावर पावसामुळे गवत झाल्याने पशुपालकांमध्ये गुरे चारण्याची रस्सी खेस सुरू झाली आहे. असा प्रकार टापरगाव पासुन बोरगाव, फतियाबाद या ठिकानी दिसुन येत आहे. केव्हा केव्हा चालक गाडी चालवत असतांना गुरे अचानक रोडवर येतात. यातून मोठी घटना तसेच अपघात घडु शकतो याकडे गांभीर्याने लक्ष दयावे लागेल. भरधाव असलेली वाहने जनावरांना घडकून अपघात होण्याची सतत भीती असते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महामार्ग पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचे या मार्गाने जाणाऱ्या वाहनधारकांचे म्हणणे आहे. एरवी रस्त्याच्या सुरक्षेच्या नावाखाली वाहनधारकांची कसून चौकशी करून वसुली करणारे महामार्ग पोलिस या प्रकाराकडे सर्रास दुर्लक्ष करत असल्याने वाहनधारकांत नाराजी आहे. सोलापुर धुळे या राष्ट्रीय महामार्ग वरील कन्नड औरंगाबाद या रस्त्यावर टापरगाव पासून ते फतियाबाद पर्यंत दुभाजकावर जनावरे चारण्याचे प्रमाण अधिक आहे. या कडे महामार्ग पोलिस व महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी लक्ष देणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# किसान सभेच्या तालुका अध्यक्षपदी बापू गवळी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** भारतीय किसान सभेच्या तालुका अध्यक्षपदी बापू शांताराम गवळी व सचिवपदी अप्पाराव बोडके यांची निवड करण्यात आली किसान सभेचे जिल्हा सचिव प्राध्यापक डॉक्टर बाबासाहेब झिरपे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत किसान सभेचे नूतन कार्य करणे जाहीर करण्यात आली बैठकीच्या आधी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार टाकून अभिवादन करण्यात आले. उपाध्यक्षपदी संजय वामनराव जिते, संदिप सारंगधर पवार यांची निवड करण्यात आली.सहसचिवपदी मोहन जारवाल, अंकुश जाधव, कार्याध्यक्ष पदी शिलाबाई नागरे, कोषाध्यक्ष समाधान आहेर, सोशल मीडिया अध्यक्षपदी युसूफ पठाण, यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी विठ्ठल जाधव, कडूबा राठोड, मनुराम चव्हाण, अंकुश सोनवणे, सुरेंद्र राहणे आदिंची निवड करण्यात आली.



# एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषि मंत्री अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतील मोहीम माझा एक दिवस माझ्या बळिराजासाठी अंतर्गत सोयगांव तालुक्यातील दुर्गम भागात दस्तापूर येथे सोयगाव कृषी विभागाच्या वतीने कर्मचारी जाऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी गावकारींना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या विविध समस्या जाऊन घेतल्या. शेतकरी वर्गाशी संवाद साधताना विवध पिकातील किड व रोग नियंत्रण, खतांचे व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, महाडीबीटी योजनेची माहिती, शेतकरी गट माहिती तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आजच्या कार्यक्रमात पौष्टिक तृणधान्य वर्षनिमित्त राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानअंतर्गत ज्वारी बियाण्याचे शेतकरी याना वाटप करण्यात



आले. आजच्या कार्यक्रमास प्रामुख्याने तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ, कृषि पर्यवेक्षक एच. बी. देशमुख, कृषि सहाय्यक जे. एन. वाघ, पी. व्हि. जाधव व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए. एस. महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील प्रगतशील शेतकरी यांची उपस्थिती होती.अशी माहिती कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख यांनी दिली.

# भाजपा जिल्हा सचिव डॉक्टर संजय गव्हाणे यांच्या हस्ते डस्टबिनचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील ताडपिंपळगाव येथे दिनांक १४ ऑक्टोबररोजी भाजपा जिल्हा सचिव डॉ. संजय गव्हाणे आणि सजग फाऊंडेशन मित्र मंडळ यांच्यावतीने ज्यांनी ऑनलाइन नोंदणी केलेली आहे अशा 650 नागरिकांना मोफत डस्टबिनचे वाटप करण्यात आले. तसेच आयुष्यमान भारत कार्ड योजनेअंतर्गत, मोफत १२०० नागरिकांना गोल्डन हेल्थ कार्ड काढण्यासाठी ऑनलाइन नोंदणी प्रोसेस सुरू केली आहे. ४० महिला बचत गटाला मार्गदर्शन व लोनबाबत माहिती दिली. याप्रसंगी भाजपा जिल्हा सचिव डॉ संजय गव्हाणे, सौ मंगलाताई असावर, प्रमोद गुळे, सरपंच प्रभू जाधव, भाजपा तालुका सरचिटणीस किशोर भाऊ दिवेकर, ज्ञानेश्वर बोर्डे, भाजपा युवा मोर्चा तालुका सरचिटणीस भास्कर गायकवाड, माळी महासंघाचे तालुका अध्यक्ष कार्तिक मामा सोनवणे, सरपंच अरुण सोनवणे सर, उप सरपंच सतिष शेळके, भाजपा नेते अभिमन्यू मगरे, कडू आण्णा पवार, दगडू आण्णा पवार, माळी समाज अध्यक्ष साहेबराव शेठ सोनवणे, कडू आण्णा सोनवणे, बूथ अध्यक्ष सुनिल काळे, नंदू मुंजाळ, नितीन सोनवणे, रामहरी पवार, सतीश कांबळे मोठया संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.





# उच्च शिक्षणात स्त्रियांचे प्रमाण कमी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र द्वारा संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी आयेशा खान यू. एस. कॅन्सलटन्ट जनरल, मनाव्यशाखा अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रशांत अमृतकर यांची पाहुणे म्हणून उपस्थिती होती. लोकसेवा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. लियाकत शेख तसेच प्राध्यापक डॉ. परवेज शेख व डॉ. काझी नवीद यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थान प्रा. डॉ. मेहरुनींसा पठाण यांनी भूषविले. प्रा. डॉ. अमृतकर यांनी स्पष्ट केले की स्त्रिया अनेक क्षेत्रात पुढे येत आहेत. शालेय पटावर मुला मुलींची शिक्षणातील संख्या सध्या समान स्वरूपात दिसत असली तरी देखील उच्च शिक्षणात स्त्रियांचे प्रमाण कमी आहे हे आकडेवारीतून स्पष्ट होते. इतर विविध स्वरूपात होत असलेले अत्याचार दूर होणे व त्या अर्थाने स्त्री मुक्तीच्या दिशेने जाण्याची आवश्यकता आहे असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. याप्रसंगी शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये घेण्यात आलेल्या 'स्त्रीमुक्तीः संधी व आव्हाने' या विषयावर घेण्यात आलेल्या चर्चासत्रातील लेखसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी मोरे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. मेहरूनिसा पठाण यांनी केला. तर आभार प्रदर्शन डॉ. सोनाली म्हस्के यांनी केले. ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातील डॉ. निर्मला जाधव, सतीश बोलकर, डॉ. सविता बहिरट, श्री. संतोष लोखंडे, डॉ. विकास टाचले, संजय पोळ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने याप्रसंगी उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# उद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते दांडिया स्पर्धेचे बक्षीस वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील माळीवाडा येथे रेणुका माता शारदा मंडळ भव्य दांडिया स्पर्धा आयोजक करण्यात आल्या होत्या त्याचा बक्षीस वितरण सोहळा उद्योजक मनोजभाऊ पवार व त्यांच्या सुविद्य पत्नी उर्मिला पवार यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेस प्रथम, द्वितीय तृतीय येणाऱ्या संघास बक्षीस प्रथम २१००० हजार प्रथम बक्षीस द्वितीय बक्षीस ११००० हजार रुपये तृतीय बक्षीस ५००० हजार रुपये हि सर्व बक्षिसे उद्योजक मनोजभाऊ पवार यांच्या वतीने देण्यात आले असून कन्नड शहर व ग्रामीण भागातील संघांनी सहभाग नोंदवून विजेत्याला बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर माळी पंच कमिटी अध्यक्ष रामभाऊ काळे, मनोज देशमुख सिध्दार्थ निकाळजे, संदेश पवार, कारभारी शेरतोडे, जगन्नाथ क्षीरसागर, सुखदेव थोरात, माणिकदादा करवंदे, भारत शिरसे, बाबूलाल काळे, मन्सबराव तुकाराम जाधव,लक्ष्मण दाबके, प्रा. बाळासाहेब जाधव, योगेश पाटील, सतीश खिल्लारे, सोमनाथ दाभाडे,शंकर राऊत आदित्य देशमुख, मयूर मोतीयाळे, बंटी जाधव, नितिन शेलार यांची उपस्थिती होती.

# योगेश्वरी शिक्षण संस्थेने केला संस्थापक सदस्याचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** योगेश्वरी शिक्षण संस्था अंबेजोगाई येथे काल दिनांक 14 ऑक्टोबर 2022 रोजी योगेश्वरी महाविद्यालयातील नवनिर्मीत आयसीटी च्या भव्य हॉलला शिवाजीराव चौसाळकर कक्ष असे नामकरण करून आपल्या संस्थापक सदस्यांच्या स्मृती कार्य कर्तुत्वाचा आणि समर्पणाचा यथार्थ सन्मान केला. या अत्यंत हृदयस्पर्शी व भावनोत्कट कार्यक्रम प्रसंगी कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध विचारवंत, ज्येष्ठ समाजसेवक व साहित्यिक डॉ.सुनील कुमार लवटे हे उपस्थित होते व कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाले यांनी भूषविले.

डॉ. लवटे यांनी आपल्या अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शनपर व्याख्यानात सांगितले की संस्थेने आपल्या पूर्वसूरींचा केलेला हा यथार्थ गौरव अतिशय योग्य असून एका अर्थाने त्यांच्या स्मृती जागृत करून आपण त्यांच्या विचारांचे शिवधनुष्य उचलले आहे व आपल्या सर्वांपुढे, आगामी काळात त्यांच्या विचारांच्या पावलावर चालणे हे आपल्याला क्रमप्राप्तच व अनिवार्य आहे असे सांगून शिक्षकांनी व संस्थाचालकांनी आधुनिक जगामध्ये चालू असलेल्या शिक्षण क्रमातील बदलांचा जागरूकपणे अभ्यास करावा व योग्य बदल आत्मसात करावेत असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे माजी विद्यार्थी तथा शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील निवृत्त राज्यशास्त्र विभागप्रमुख व सुप्रसिद्ध राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेने आंबेजोगाई 1918 मध्ये अतिशय प्रतिकूल परिस्थितीत, राष्ट्रीय विचाराने प्रेरित,



योगेश्वरी नूतन शाळा सुरू झाली व पहिले तीन वर्षे शाळा शिवाजीराव चौसाळकर यांनी दिलेल्या आपल्या गोडाऊनच्या जागेमध्ये भरत असे व त्यानंतर योगेश्वरी मंदिर परिसरातील विद्यमान जागा शिवाजीराव चौसाळकर यांनी संस्थेला उपलब्ध करून दिली व वेळोवेळी भरीव आर्थिक मदत करून ते संस्थेच्या पाठीशी उभे राहिले असे सांगितले. संस्थेच्या शतकोत्तर प्रगतीचा चौफेर आढावा घेऊन संस्थाचालकांचे अभिनंदन केले.

अध्यक्षीय समारोप करताना माननीय डॉ.सुरेश खुरसाले यांनी संस्थेच्या स्थापनेपासूनचा 1918 पासूनचा संपूर्ण इतिहास कथन केला व आपल्या पूर्वजांनी राष्ट्रीय शिक्षणाविषयी दाखविलेल्या प्रेमामुळे व कठोर परिश्रमामुळेच संस्था आज यशो शिखरावर पोचली आहे असे गौरवाने सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे कार्यकारी उपाध्यक्ष श्री कमलाकर चौसाळकर यांनी केली तर सूत्रसंचालन प्रा. गणेश पिंगळे यांनी केले. माझे आजोबा कै. शिवाजीराव चौसाळकर (बप्पा) यांच्या स्मृतींचा संस्थेने सन्मान केला याबद्दल चौसाळकर परिवाराच्या वतीने संस्थेचे मनापासून आभार व्यक्त करतो.

# औरंगाबाद – सोयगाव बससेवा सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** औरंगाबाद – सोयगाव -औरंगाबाद बससेवा सुरु करावी अशी अनेक वर्षापासून मागणी होती. सोयगाव तेसंभाजीनगर मधील अंतर १२५ किलोमीटर आहे. संभाजीनगरहून कामे आटोपल्यानंतर एकही थेट बस दुपारी १२वाजेनंतर नव्हती. घराकडे परतण्यासाठी जळगाव, भुसावळ मुक्ताईनगरकडे जाणारी गाडीने फर्दापूर गाठावे लागते. सगळ्यात मोठे दुर्दैव म्हणजे फर्दापूर पोचल्यानंतर सोयगावला येण्यासाठी ना बस असते, ना रिक्षा, ना एखादे खाजगी भाडोत्री वाहन, काहीही व्यवस्था होत नसल्याने प्रवाशांची फार मोठी कुचंबणा होते. म्हणून अनेक वर्षापासून सोयगाव प्रवासी संघटना, सोयगाव तालुका पेन्शनर्स असोशिएशन, सोयगाव तालुका पत्रकार संघटना आणि जनतेमधून एकच मागणी होती छ.संभाजीनगर येथून सोयगावला परतण्यासाठी एकतरी थेट बस हवीच. संबंधित आगारप्रमुख ठाकरे यांनी सोयगाव येथून संभाजीनगर येथे जाण्यासाठी पहिली बस सकाळी ०८:३० आहे. ती तशीच कायम ठेऊन पहिली संभाजीनगरसाठी थेट सोयगाव येथून सकाळी ०५:३० वाजता सुटते, ती संभाजीनगर येथे ०९:०० वाजता पोहचते ही बस लगेच निघते आणि दुपारी १२:०० वाजता सोयगावला पोचते. परत पुन्हा हीच बस दुपारी ०२:०० वाजता सोयगाव येथून संभाजीनगरसाठी रवाना होईल ही बस सायंकाळी ०५:३० वाजता पोचून लगेच परत सोयगावसाठी सायंकाळी ०५:३० निघेल आणि रात्री ०९:०० वाजता सोयगावला पोचेल.

# आमदार फारुक शाह यांचा विकासकामांचा धडाका



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरांमध्ये दिवसेंदिवस आमदार डॉक्टर फारुक शाह यांनी विकास कामांचा धडाका लावला आहे. व त्यांचे कौतुक धुळेकरांकडून मन भरून ऐकिवात येत आहे. नागरिकांच्या समस्या लक्षात घेत आमदार फारुक शाह त्या समस्यांचा तातडीने निराकरणही करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर नागरिकांची समस्या लक्षात शहरातील प्रभाग क्रमांक बारा मध्ये अपनी हॉटेल ते मदरसा फलाह दारैन पर्यंत मूलभूत सोयी सुविधा योजनेअंतर्गत आमदार फारुख शाह यांच्या प्रयत्नातून एकूण वीस लाख रुपये निधीतून रस्ता काँक्रिटीकरण कामाचा आज शुभारंभ करण्यात आला आहे. या उद्घाटनाप्रसंगी एमआयएम पक्षाचे नगरसेवकांसहित पदाधिकारी कार्यकर्ते स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच या विकास कामासंदर्भात स्थानिक नागरिकांनी आमदार फारुक शाह यांचे आभारही मानले आहे.

# पांढऱ्या सोन्याला मातीमोल भाव, वेचणाऱ्याला मोठा भाव

## ऐन दिवाळीत शेतकऱ्यांवर आली सक्रांत; लागवडीचा खर्चही निघणे झाले मुष्कील

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शासनाच्या हमी भावाला व्यापाऱ्यांकडून फाटा हमी भावापेक्षा कमी भावात व्यापाऱ्यांकडून खरेदी तर अजून जिनिंगही बंद गेल्या चार वर्षापासून शेतकरी अस्मानी सुल्तानी संकटाचा सामना करीत असून कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळाने तो होरपळ असतांना या वर्षी पडलेल्या अधिकच्या पावासाने खरीपाची सर्व पिके हातची गेली त्यात मुग उडीद ही पिके तर अधिकच्या पावसामुळे दिसली देखील नाही. मात्र काही अंशी कपासी आली तर तिचेही परतीच्या पावसाने भोंडे काळे पडले तर काही ठिकाणी बोंडे सडली कापसाच्या वाती झाल्या तो काळाही पडला. मात्र आता सर्वत्र पहिल्या पहिल्या वेचण्या सुरु मात्र या कापसाला सध्यातरी ४ हजार ते ४ हजार ३ शे रुपये भाव असून या पांढऱ्या सोन्याला मिळत असलेली ही किरकोळ किमत बघून शेतकरी हतबल झालेला आहे.त्यातच शासनाने अवलबिंत केलेल्या शेतकरी धोरणाला व्यापाऱ्यांनी फाटा देत हमी भावाची थट्टा केली जात असल्याचे चित्र आहे एकीकडे शासनाच्या ११ ,८२५ रुपयाने कापुस खरेदी करा अशा सूचना असतांना व्यापारी मात्र ८ हजार ते चांगला कापुस ७५०० हजार रुपयाने खरेदी करीत असल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले. याबाबत व्यापाऱ्यांना विचारले असता वरतीच भाव कमी असल्याचे ते सांगतात. तर त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट कोलमडले असून उधारीवर



घेतलेली बिजवाई खत तथा निंदन कुरपण्याचा खर्च या तुटपुंज्या किंमतीवर भागवायचा कसा या प्रश्नाने शेतकरीराजा पुर्णताः खचला असुन अजुन जिनींग ही बंद असल्याने त्यांच्या चिंतेत भर पडली आहे. गतवर्षी दिवाळीच्या तोंडावर कापसाला यावर्षी या तुटपुंज्या दरावर शेतकरी नाराज असुन लावलेला पैसातरी फिटेल का हा प्रश्न सोयगाव परिसरातील शेतकऱ्यांना पडलेला आहे.सोयगाव परिसरातील शेतकरी दरवर्षी मोठ्या प्रमाणात कपाशीची लागवड करतात तसेच यावर्षी देखील कापसाला चांगला भाव राहील यामुळे असंख्य शेतकऱ्यांनी यंदा कपाशीची लागवड केले पावसाळ्या तोंडी पावसाने उत्तम प्रकारे साथ दिली त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या आऊंदाचे साल चांगले उत्पन्न होईल या दृष्टिकोनातून त्यांना कपासीची मोठ्या प्रमाणात लागवड केली होती मात्र नंतर तिन महीने सारखा पाऊस पडत राहीला व ऐन खरीपाचे पिके बहरत असतांना पावसाने पिकांची नासाडी केली यामुळे उत्पादन घटले यात उडीद मुग तर वाहुनच गेला उरले सुरले सोयाबीनच्या शेंगा भरत असतांना अधिकच्या पावसामुळे त्यात दाने भरु शकले नाही तर मकाचेही हीच हालत झाली ऐन दान्यांनी कणीस भरत असतांना पावसाचा जोर वाढलेला होता मात्र परतीचा पाऊस जोरदार स्वरुपाचा पडत होता यामुळे सोयाबीन तथा मका यासह खरीपाच्या पिकांचे आतोनात उत्पादन घटले. परतीचा पाऊस उघडल्यानंतर त-हाडी परिसरात सर्वत्र एकदमच कापुस फुटल्याने मजुरांना भाव आलेला असुन दुर्गम भागातील जरंडी, बनोटी, फर्दापूर, जामठी, घाणेगांव तांडा, नादागांव, देव्हारी व सावळदबारा,,तर तालुक्यातील दुर्गम भागातील विविध गावातुन कापुस वेचणीला मजुर आणल्या जात असुन हे कापुस वेचणारे ३५ धड्याने म्हणजे ८ ते ९ रुपये किलोने कापुस वेचतात तर त्यांना ने आण करण्यासाठी शेत मालकाला वेगळे गाडी भाडे द्यावे लागतात तरी देखील कापुस वेसणीस मजुर मिळेना अशी गत झालेली असल्याने अनेक ठिकाणी कापसाची पहीलीच वेचणी राहील्याने कापुस वाळत चालला असल्याने त्याचे वजन घटत आहे.यात कपाशीची लागवड करणारा मालक नाराज मात्र कापुस वेचणारे खुष असे चित्र दिसत आहे.

मी तिन एकर कपाशीची लागवड केली होती मात्र यातील एक एकर कपाशी प्रमाणापेक्षा जास्त पडलेल्या पावसामुळे वाया गेली पावसामुळे शेत चिभडले त्यात काहीच हाती आले नाही तर बाकीच्या दोन एकरात पहील्या वेचणीत १५ क्विंटल कापुस झाला तर हा कापुस विचणीसाठी क्विंटलामागे वेचणारांनी हजार रुपये घेतले आणि त्याला लागवडीपासुन ते आत्ता पर्यंत किमान २० हजार रुपये खर्च झाला असावा आज तो विकावा तर आठ हजार रुपये भावाने व्यापारी मांघत आहे मात्र इतक्या कमी भावात विकण्याचे मन होत नाही .उधारी पाधारीवर औषधी खरेदी केलेली आहे तर वेचणारांचेही पैसे देणे आहे मात्र भाव वाढ होण्याची वाट पहात आहे .काय कराव काहीच सुचेनाअसे झाले आहे .

**विजय काळे शेतकरी तथा पत्रकार सोयगाव**

सुरुवाचीला समाधानकारक पाऊस पडल्याने यावर्षीच साल गोड होईल या आशेने पाच एकर सरकी लावली होती मात्र सर्व परीश्रमावर पाणी फिरल अतिवृष्टीने पिके वाया गेली शेतात अल्प प्रमाणात कापुस फुटला तोही ओला झाल्याने त्याच्या वाती झाल्या ३५ धडा देऊनही मजुर मिळेना काय कराव काही सुचन नाहीये बाजारात कापसाला भाव नाही कशी लोकांचे व शासनाचे कर्ज फेडावे आणि कशी दिवाळी साजरी करावी चिंतेने जगाव कसं हेच सुचत नाहीये

**मो .रफिक मो .शब्बीर कपाशी लागवड करणारे शेतकरी सावळदबारा ता सोयगाव**

# भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी राहुल लोणीकर

## धन्यवाद मोदीजी या उपक्रमाच्या माध्यमातून ५० लाखांपेक्षा अधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणार : प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** येथील भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात आज भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष माजी मंत्री आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपा प्रदेश महामंत्री तथा युवा मोर्चा प्रभारी विक्रांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता युवा मोर्चाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली या बैठकीत भारतीय जनता युवा मोर्चाचे विद्यमान प्रदेश महामंत्री राहुल लोणीकर यांची भाजयुमो महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राहुल लोणीकर यांची भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड करत असले बाबतची घोषणा केली यावेळी मार्गदर्शन करताना बावनकुळे म्हणाले की भारतीय जनता युवा मोर्चाचा प्रत्येक



कार्यकर्ता हा सक्षम आणि सजग असला पाहिजे तळागाळातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत घटकापर्यंत पोहोचून शेवटच्या घटकापर्यंत भारतीय जनता पार्टीचे काम पोहोचविण्यासाठी त्याने प्रयत्नशील असावे युवा वॉरिअरच्या माध्यमातून १८ ते २५ वयोगटातील तरुणांना भारतीय जनता पार्टी कडे आकर्षित करण्यासाठी त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन युवा वॉरिअरच्या शाखा उघडण्याबाबत भर द्यावा त्याचप्रमाणे मोदीजींच्या योजना महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना यावेळी भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. युवा वॉरियर्स ही १८ ते २५ वयोगटातील तरुणांची एक निपक्ष पातळीवर काम करणारी फळी असून त्या युवकांना भारतीय जनता पार्टीचे कार्य समजावून सांगत नवयुवकांची मोठी फळी उभारणार असल्याचे यावेळी राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले भारतीय जनता पार्टी ही सर्वसामान्य कार्यकर्त्याची पार्टी असून काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या पक्षात न्याय मिळतो अशा भावना भाजपा प्रदेश महामंत्री तथा युवा मोर्चा प्रभारी विक्रांत पाटील यांनी व्यक्त केली. केंद्रीय नेतृत्व आणि राज्यातील पक्ष नेतृत्व श्री देवेंद्रजी फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील यांच्या नेतृत्वात मला प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा मिळाली असून मी नक्कीच तळागाळातील प्रत्येक कार्यकर्त्यापर्यंत पोहोचून त्याला न्याय देण्याचा सदैव प्रयत्न करेल त्याचबरोबर केंद्रीय आणि राज्यातील पक्ष नेतृत्वाने माझ्यावर दाखवलेला विश्वासने सार्थ ठरवेल अशी प्रतिक्रिया देखील यावेळी राहुल लोणीकर यांनी दिली. युवा वॉरियरच्या माध्यमातून महाराष्ट्रभरातील १८ ते २५ वयोगटातील युवकांची मोठी फळी भारतीय जनता पार्टी च्या बाजूने उभारली जाणार असून त्याचबरोबर केंद्रातील मोदी सरकारच्या विविध योजना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करणार असून ज्या लाभार्थ्यांना केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळाला आहे त्या सर्व लाभार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन मोदीजींचे आभार व्यक्त करणारे ५० लाखापेक्षा अधिक पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवले जाणार असल्याचे यावेळी राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले

# नेहरू महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

आधुनिक केसरी न्यूज

**नेर :** येथील नेहरू महाविद्यालयात महान वैज्ञानिक माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून विविध उपक्रम राबवून महाविद्यालयाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागांतर्गत 'वाचन संस्कृतीने देश घडतो' या विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. यावेळी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस. बनसोड, प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ प्राध्यापक डॉ. एम.डी. वडते आणि मुख्य वक्ते पत्रकार, माजी ग्रंथपाल प्रा. एस. एम. नरोटे तसेच ग्रंथपाल प्रा. एस.के. इंगळे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रवीण बनसोड यांनी, डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम तसेच राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सांगून वाचनाने मन आणि मेंदू बळकट होते, असे सांगितले. जगातील सर्व मोठी माणसे वाचनामुळे घडली असून समाज आणि माणसाचे जगणे पुस्तकामुळे सुंदर होते असे सांगितले. प्रमुख वक्ते प्रा. एस.एम.नरोटे. यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांचे वाचनासंबंधी अनुकरण करून एम.पी.एस. सी.व यु पी. एस.सी. परिक्षा उतीर्ण कराव्यात व प्रशासकीय सेवेत समावेश करून देश सेवा करावी. आव्हांतर वाचन



करावे असे सांगितले. याप्रसंगी विविध उपक्रमांतर्गत बुके नव्हे बुक, विद्यार्थ्यांनी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्याबद्दल मनोगत व्यक्त करून आवडणारे पुस्तक आणि आवडणारे लेखक यांच्याबद्दल सांगितले. यामध्ये गुणरत्न कांबळे, साक्षी राठोड व वैणवी चव्हाण या विद्यार्थ्यांनी सहभागी होवून आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा.एस.के.इंगळे यांनी केले तसेच भिलार या पुस्तकाच्या गावाबद्दल माहिती सांगितली तर कार्यक्रमाचे संचालन प्रा.पी.एच. चव्हाण आणि आभार प्रदर्शन कु. बी.आर.देवतारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता ग्रंथालयीन कर्मचारी श्री.आर.पी. ढगे, श्री.एन.के.सिरसाठ तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले.

# गंगापुरात औरंगाबाद विभागाच्या ज्युनिअर व्हॉलिबॉल संघाची निवड चाचणी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथे होणाऱ्या दि.१७ ते १९ ऑक्टोबर दरम्यान होऊ घातलेल्या १८ वर्षाआतील राज्यस्तरीय ज्युनिअर स्पर्धेकरीता औरंगाबाद विभागाची निवडचाचणी स्पर्धा गंगापूर येथील इनग्राऊंडस स्पोर्ट्स ऍकॅडमीच्या मैदानावर घेण्यात आली. विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी व हिंगोली या चार जिल्ह्यातील खेळाडूंनी जवळपास ७० मुले व मुलींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला निवडचाचणी स्पर्धेचे आयोजन औरंगाबाद विभागीय सचिव तथा अध्यक्ष औरंगाबाद जिल्हा व्हॉलिबॉल असोसिएशन डॉ.आबासाहेब शिरसाठ यांनी केले. या प्रसंगी हिंगोली जिल्हा सचिव मोहम्मद बारी, औरंगाबाद जिल्हा उपाध्यक्ष विश्वजित चव्हाण, वरिष्ठ खेळाडू नईम शेख सर यांची प्रमुख उपस्थिती होती. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रमोद महाजन करण खोमणे,महेमुद पठाण, अली बकोदा, लोकेश ठाकरे, अभिजीत गणोरकर मुख्तार शेख, जुनेद शेख, प्रविण बर्फे, आमीन



पटेल जयेश निरफळ कृष्णा डोळस यांनी विशेष प्रयत्न केले, या प्रसंगी डॉ. आबासाहेब शिरसाठ, विश्वजित चव्हाण यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन प्रमोद महाजन यांनी केले व महेमद पठाण यांनी आभार मानले. निवडलेला संघ पुढील प्रमाणे मुले :- शुभम पंडीत, आदित्य पाटील, नरेश गंगुले, कार्तिक संमेवार, धीरज बडे, प्रेम जाधव, शेख उस्मान, ओम सातपुते, विनायक गहिरे, कार्तिक नजन, विवेक राऊत, रोहित पाटील, वैभव धोंडगे, रेहान पठाण, मुली :- वनिता बामणे,अंकिता तुपे, मधुरा डोंगरे, श्रुती पाटील, श्रावणी पळसवाडीकर

# नुकसानग्रस्त पिकांच्या पंचनाम्याचे तहसीलदारांनी आदेश देऊनही दुर्लक्ष



आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** तालुक्यातील बालमटाकळी, सुकळी शेकटे, बाडगव्हाण, मुरमी यासह शेवगाव तालुक्यातील पूर्व भागातील बहुतांशी गावात सततच्या पडत असलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसान झालेल्या शेती पिकांचे तात्काळ पंचनामे करावे या मागणीसाठी शेतकऱ्यांनी शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे यांच्या नेतृत्वाखाली बालमटाकळी येथील तलाठी कार्यालयात जाऊन तलाठी बाबासाहेब अंधारे यांना पंचनामे करण्यासंदर्भात विचारणा केली. मात्र मला अधिकृत पंचनामा करण्याचे अद्याप आदेश नसल्याचे तलाठी यांनी सांगताच ग्रामस्थात व तलाठ्यामध्ये शाब्दिक चकमक झाल्यानंतर तहसीलदारांनी फोनवर तलाठी अंधारे भाऊसाहेब यांना तात्काळ पंचनामे करण्याचे सूचना दिल्यावरच संतप्त झालेले शेतकरी यांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले. परंतु येत्या सोमवार पर्यंत पंचनामे न झाल्यास अचानकपणे तलाठी कार्यालयापुढे असंख्य शेतकऱ्यांना सोबत घेऊन ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देखील यावेळी शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे यांनी दिला आहे. दरम्यान तलाठी बाबासाहेब अंधारे व कृषी सुभाष बारगजे यांनी लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे शेती पिकांचे पंचनामे करण्यात येतील असे लेखी आश्वासन दिल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले. यावेळी शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे, बालमटाकळी सेवा संस्थेचे चेअरमन हरिचंद्रराजे घाडगे, अनिलशेठ डेरे, बालमटाकळी सेवा संस्थेचे माजी चेअरमन प्रशांत देशमुख, कुस्ती संघाचे तालुकाध्यक्ष विक्रम बारवकर, सुकळी गावचे सामाजिक कार्यकर्ते लहूराव भवर, छगनराव राजपुरे, गजानन देशमुख, पांडुरंग वैद्य, कृषी सहाय्यक सुभाष बारगजे, तलाठी बाबासाहेब अंधारे, मुरमीचे शेषराव वंजारी, रोहिदास भोगले, अनिल परदेशी, माणिकराव शिंदे, रंगनाथ वैद्य, बाळासाहेब जाधव, संदीप देशमुख, सुनील छाजेड, विष्णूपंत वाघुम्बरे, रमेश शिंदे, सुरेश बामदळे, शिवाजीराव हाकाळे, सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल शेख, गजानन देशमुख, भाऊसाहेब बामदळे, कासम शेख, जमादार शेख, पांडुरंग शिंदे, भारत गरुड यांच्या सह असंख्य शेतकरी बांधव यावेळी या ठिय्या आंदोलनात मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून द्या : कृषिमंत्री सत्तार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना वस्तुनिष्ठ पंचनामे करुन तात्काळ मदत मिळवून देण्याचे निर्देश कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी आज आढावा बैठकीत जिल्हा प्रशासनाला दिले. सिल्लोड, सोयगाव तालुक्यातील ग्रामीण पाणीपुरवठा व कृषी विभागाच्या आढावा बैठकीस जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पांण्डेय, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, महावितरणचे सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले याच्या सह सिंचन व पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी उर्वरित तालुक्यातील गावनिहाय नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश महसूल विभागाला कृषिमंत्र्यांनी दिले. तसेच फर्दापूर गावातील तसेच वाड्या वस्तीतील पाणीपुरवठा सूरळीत होण्यासाठी जल जीवन मिशन व जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने प्रयत्न करावेत. तसेच पाणी पुरवठ्यासाठी लागणारी वीज जोडणी तसेच वॉटर ग्रीडच्या कामाच्या निविदा लवकर पूर्ण कराव्यात. खेळणा पाणी प्रकल्पाचे काम, निझामकालीन बंधाऱ्याची दुरुस्ती आणि झकास पुष्प पठार विकासासाठी जिल्हा नियोजन विकास निधीत तरतूद करण्याचे निर्देश देखील यावेळी कृषिमंत्र्यांनी संबधित विभागाला दिले.